**Dr. Madhukarrao Wasnik**

**PWS Arts and Commerce College**

**Kamptee Road, Nagpur-26**

## Bibliometrics of the Publication During the year 2020-2021

| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 21. | Bhartiya Sanvidhan Ani Mahilanche Adhikar | Dr. Kamlakar Tagde | B. Adhar Multidisciplinary International Research Journal | Mar- 2021 | | | |
| 23. | Dr. B.R. Ambedkarancha Shaikshanik Drushtikon: Ek Samajshatriya Adhyayan | Dr. Kamlakar Tagde | Aayushi International Interdisciplinary Research Journal | April-2021 | | | |

## Bibliometrics of the Publication During the year 2021-2022


| Sr. No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 35. | Dr. Babasaheb Ambedkaranche Krushi Vishyak Vichar. | Dr. Kamlakar Tagde | Aayushi International Interdisciplinary Research Journal ISSN 2319-4766 | April 2021 | - | - | - |
| 36. | Aadiwasi samajatil samajik aandolan and Parivartan | Dr. Kamlakar Tagde | Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies Issue -57 | April- June 2021 | - | - | - |
| 37. | Jagatik Mahamaricha Manvi Manavar | Dr. Kamlakar Tagde | UPA National E-Journal Vol-VII Issue XI- | Oct 2021 | - | - | - |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | Zhalela Parinam | | ISSN 2455-4375 | | | | |

## Bibliometrics of the Publication During the year 2022-2023

| Sr.<br><br>No. | Title of the Paper | Name of the Author | Title of the Journal | Year of the Publication | Citation Index | Institutional Affiliation as mentioned in the Publication | Number of Citations excluding self-citations |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **21.** | Dr.Seema sakhare yancha shrichalvalitil Sangharsh | Dr. Kamlakar Tagde | Aadhar Publication<br>Adhunik Vidharbhachya mahila Shilpakar<br>978-93-91305-50-5 | 2022 | | | |

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| **22.** | Bhartiya Swatantrachya Chalvalimadhe Divasi Chaalvaliche yogdan | Dr. Kamlakar Tagde | Aadhar Publication<br>Bhartiya Swatantrachi 75 Year<br>978-93-91305-51-2 | 2022 | | | |
| **23.** | Samajik chalvalitil samaj sudharkanche yogdan | Dr. Kamlakar Tagde | Sidhhi publication<br>Worldwild International Inter Disciplinary Research Journal<br>( A peer reviewed)<br>ISSN : 2454-7905 | | | | |
| **24.** | Dr. Karmveer Bhaurao Patil Yanche Samajik Ani Shikshnic Yogdan. | Dr. Kamlakar Tagde | Ajanta Prakashan<br>Galaxy Link<br>An International Multidisciplinary<br>ISSN: 2319-8508 | | | | |



**Principal**

**Dr. Yeshwant Patil**

विदर्भातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास
1891-1970

ISSN - 2249-5134



# Perspectives

A National Interdisciplinary Annual Research Journal

Peer Reviewed Research Journal for Interdisciplinary Studies in Arts Commerce & SocialSciences

Vol. I
Special Issue (VIII)
2020

Dr. Madhukarrao Wasnik
PWS Arts and Commerce College
Kamptee Road, Nagpur - 26.
(Reaccreditated 'B' by NAAC)

Scanned with OKEN Scanner

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीचा इतिहास (1890 ते 19

विशेषांक संपादक

डॉ.महेंद्र गायकवाड,डॉ.चंद्रशेखर पाटील

सहायक संपादक

प्रा.आशिष थूल,प्रा.दिपाली सुरवसे

## Name of Peer Review Committee Member (Refereed Name)

1)मा.प्रा.डॉ.दीपक गायकवाड
माजी इतिहास विभाग प्रमुख
सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे

2) मा.प्रा.डॉ.संतोष बंसोड
अध्यक्ष( इतिहास अभ्यास मंडळ)
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती

3) मा.प्रा.डॉ.श्याम कोरेटी
अध्यक्ष( इतिहास अभ्यास मंडळ)
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ, नागपूर

4) मा.प्रा.डॉ. संगिता मेश्राम
माजी अधिष्ठाता मानव्यशास्त्रे व
इतिहास विभाग प्रमुख (पदव्युत्तर शिक्षण विभाग )
राष्ट्रसंत तुकडोजी महाराज,नागपूर विद्यापीठ, नागपूर

5) मा.प्रा.डॉ.बी.आर.मस्के
. इतिहास विभाग प्रमुख
वसंतराव नाईक शासकीय कला व
समाजविज्ञान संस्था,नागपूर

6) मा.प्रा.डॉ. ताराचंद गेडाम
प्राचार्य,डॉ.बाबासाहेब आंबेडकर कला,वाणिज्य
व विज्ञान महाविद्यालय, सुरतोली (लोहारा )जि
गोंदिया

7) मा.प्रा.डॉ.एस.बी. भगत
प्राचार्य
रामकृष्ण महाविद्यालय ,दारापूर
ता.दर्यापुर जि.अमरावती

8)मा.प्रा.डॉ. नलिनी टेंभेकर (चिमनकर)
सहसंचालक,
उच्च शिक्षण,नांदेड विभाग,नांदेड

9)मा.प्रा.डॉ.संदेश वाघ
इतिहास विभाग प्रमुख व अध्यक्ष इतिहास
अभ्यास मंडळ मुंबई विद्यापीठ,मुंबई

10)मा.प्रा.डॉ.यू.एस.सावंत
इतिहास विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय,नांदेड



Scanned with OKEN Scanner

19-20



## अनुक्रमणिका


| अ.क्र. | शोध पेपरचे शिर्षक | संशोधकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|---|
| | **विदर्भातील आंबेडकरी चळवळीचे शिलेदार** | | |
| 1 | विठोबा रावजी मुनघंडे यांचे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील योगदान | डॉ.विमल राठोड | 1 ते 4 |
| 2 | गुरूवर्य किसन फागोजी बन्सोड – दलित स्त्रियांचा उद्धार | डॉ.आनंद गणवीर | 5 ते 10 |
| 3 | श्री. किसन फागुजी बनसोड : विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील एक खंबीर नेतृत्व | डॉ. कैलाश फुलमाळी | 11 ते 12 |
| 4 | किसन फागूजी बनसोड यांचे लेखन चित्रणातून वंचितांच्या उध्दाराचे कार्य | प्रा.डॉ.प्रमोद बोधाने | 13 ते 14 |
| 5 | वंचीतांच्या अधिकारासाठी झटणारे समाजसुधारक : किसन फागोजी बनसोडे. | डॉ.गोपीचंद कठाणे | 15 ते 17 |
| 6 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत किसन फागूजी बनसोडेंचे वृत्तपत्रिय योगदान | डॉ. प्रदिप ढोले | 18 ते 20 |
| 7 | आंबेडकरी चळवळीतील देवाजी खोब्रागडे यांचे कार्य | डॉ.अविनाश फुलझेले | 21 ते 25 |
| 8 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील देवाजीबापू खोबरागडे यांचे योगदान | प्रा. डॉ. नरेश कवाडे | 26 ते 29 |
| 9 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील नेते नानासाहेब गवई यांचे सामाजिक, राजकीय आणि शैक्षणिक क्षेत्रातील कार्य | डॉ.राजू खरडे | 30 ते 32 |
| 10 | महात्मा कालीचरण नंदागवळी यांचे आंबेडकरी चळवळीतील योगदानाचे ऐतिहासिक विश्लेषण | प्रा. पंकज वामन मून | 33 ते 34 |
| 11 | डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा विदर्भातील सांगाती.रेवाराम विठोबा कवाडे | डॉ.यशवंत पाटील | 35 ते 38 |
| 12 | बाबू एल. एन. हरदास यांचे सायमन कमिशन व नागपूर डिप्रेस्ड क्लासेस मधील योगदान | प्रा. आशिष थुल | 39 ते 40 |
| 13 | "डॉ. अम्बेडकर के आंदोलनों में बाबू हरदास एल.एन. का योगदान" | प्रा. किशोर चौरे | 41 ते 44 |
| 14 | धम्मरक्षक ॲड.बाबू आवळे | डॉ.संजय गजभिये | 45 ते 53 |
| 15 | *हरिदास बाबू आवळे यांचे विदर्भातील समता सैनिक दलातील योगदान* | *डॉ.चंद्रशेखर पाटील* | 54 ते 59 |
| 16 | विदर्भातील आंबेडकर चळवळीत दशरथ पाटील यांचे योगदान | डॉ. अफरोज शेख | 60 ते 62 |
| 17 | गं. म. ठवरे यांचे विदर्भातील शैक्षणिक योगदान : एक अभ्यास | डॉ.लखपती गायकवाड | 63 ते 64 |
| 18 | बॅरिस्टर राजाभाऊ खोब्रागडे विदभातील एक राजकीय व सामाजिक नेतृत्व" | अरुण ज्ञानेश्वर बरडे | 65 ते 69 |
| 19 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील बॅ. राजाभाऊ खोबरागडे यांचे सामाजिक व राजकीय कार्य | .डॉ. अनिल बाभळे | 70 ते 73 |
| 20 | बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे यांचे विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील योगदान | रत्नदिप गणवीर | 74 ते 77 |
| 21 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत रामरतन जानोरकर यांचे योगदान | विनायक जामगडे | 78 ते 80 |
| 22 | दादासाहेब कुंभारे यांचे आंबेडकरी चळवळीत योगदान | डॉ. सुशांत चिमणकर | 81 ते 83 |
| 23 | आंबेडकरी चळवळीत दादासाहेब गवई यांचे योगदान | डॉ.मोहन वानखडे | 84 ते 87 |
| 24 | वैदर्भिय आंबेडकरी चळवळीतील एक ग्रंथप्रेमी शिलेदार श्री वसंत मुन | प्रा.गामिनी मेश्राम | 88 ते 90 |
| 25 | इतिहास संशोधक वसंत मुन | डॉ.लखन इंगळे | 91 ते 92 |
| 26 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील राजकीय व सामाजिक कर्मनिष्ठ नेतृत्व – ॲड. सखाराम एम. मेश्राम | डॉ.कमलाकर तागडे | 93 ते 95 |
| 27 | विदर्भिय आंबेडकरी चळवळीत डॉ. मधुकरराव वासनिक यांचे योगदान | डॉ. एन.लांडगे | 96 ते 100 |
| 28 | वामनराव गोडबोले यांचे धम्मदीक्षा सोहळयाचे वित्तीय व्यवस्थापन | प्रा.नरेंद्र सरोदे | 101 ते 102 |
| 29 | एक कर्तृत्ववान नेतृत्व मा. नाशिकराव तिरपुडे साहेब | प्रा.असंगवज्र मैत्रेय | 103 ते 104 |
| | **विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील रणरागिनी** | | |
| 30 | विदर्भातील आंबेडकरी महिलांची विसाव्या शतकातील सामाजिक चळवळ | डॉ. टी. जी. गेडाम | 105 ते 108 |
| 31 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत महिलांचे योगदान | प्रा. डॉ. प्रज्ञा बागडे | 109 ते 113 |
| 32 | विदर्भातील आंबेडकरी चळवळीत महिलांचे योगदान | डॉ. सुजाता गौरखेडे | 114 ते 117 |
| 33 | "विदर्भातील आंबेडकरी चळवळीत महिलांचे योगदान" | डॉ. ज्वाला भा. डोहाणे, | 118 ते 120 |




Scanned with OKEN Scanner

# विदर्भातील आंबेडकरी चळवळीतील राजकीय व सामाजिक कर्मनिष्ठ नेतृत्व – ॲड. सखाराम एम. मेश्राम

प्रा. डॉ. कमलाकर पी.तागडे
प्रमुख समाजशास्त्र विभाग
डॉ. मधुकरराव वासनिक
पी.डब्ल्यू.एस. महाविद्यालय नागपूर

**सारांश** –विदर्भातील आंबेडकरी चळवळीचा जेव्हा आपण सैध्दांतिक दृष्टिकोनातून विचार करतो तेव्हा आपणाला जाणीव होते की, कोणे एकेकाळी ज्या समाजाला चालण्याचा अधिकार नव्हता, बोलण्याचा अधिकार नव्हता, तो समाज आपल्या अधिकारापासून पूर्णपणे वंचित होता. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वामूळे विदर्भातील अस्पृश्य बांधवांचा स्वाभिमान व आत्मसन्मान जागृत झाला. डॉ. आंबेडकरांच्या प्रभावी आणि आत्मिय तळमळीमुळे दलित समाजाने आपली अढळ श्रध्दा त्यांच्या ठायी केंद्रित केली आणि त्यांनी सांगितलेल्या आत्मोध्दाराच्या प्रत्येक विचाराचे पालन करण्याचा ठाम निर्धार त्यांनी केला." [1] त्यामुळे डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे आपल्या चळवळीला सशक्त करण्याकरिता कर्मभूमि म्हणून नागपूरची निवड करतात. याच नागभूमिमधून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांसमवेत दलित बांधवांच्या उध्दाराकरिता रात्रंदिवस कार्य करण्याकरिता विदर्भातील अनेक दलित समाजातील कार्यकर्ते डॉ. आंबेडकरांना सहकार्य करतात.

विदर्भातील आंबेडकरी चळवळीना सक्रीय व सशक्त करण्याऱ्यापैकी ॲड. सखाराम मेश्राम हे एक आंबेडकरी विचारांचे कर्मनिष्ठ नेतृत्व. या नेतृत्वाने आपल्या कार्याचे प्रतिबिंब आंबेडकरी समाजामध्ये उमटविले. त्यांनी स्वत:ला समाजकारण व राजकारणाविषयी झोकून दिले. समता सैनिक दलात सक्रिय राहून, डॉ. बाबासाहेबांनी केलेल्या आंदोलनामध्ये तसेच सभा सम्मेलनामध्ये आवार्जून हजर राहीलेत. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावर पडलेला होता. डॉ. बाबासाहेबांच्या आदेशानुसार पुणेकरांच्या निषेधार्थ नागपूर येथील सत्याग्रहात आवळे बाबू, ठवरे, आर.व्ही. कवाडे, आर.आर. पाटील यांच्या समवेत ॲड. सखाराम मेश्राम यांनी भाग घेतला होता. मध्यप्रदेश कायदेमंडळात मजुरांचे प्रतिनिधी म्हणून स्व. मजूर पक्षातर्फे रा. ठवरे यांनी सखाराम मेश्राम यांना उमेद्वारी दिली. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या कार्यास नेहमीच पाठिंबा देत राहिले. ज्या लोकांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा विरोध केला त्या लोकांच्या सभा ॲड. सखाराम मेश्राम यांनी उधळून लाविल्यात. विदर्भातील आंबेडकरी आंदोलनात अतिशय प्रभावी होण्यामध्ये ॲड. सखाराम मेश्राम यांचे योगदान अतिशय महत्वपूर्ण आहे.

"भारतातील दलित चळवळ ही भारतीय समाजात खऱ्या अर्थाने लोकशाही प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करणारी चळवळ होती असे मत गेल आम्व्हेट यांनी मांडले आहे." [2] विदर्भातील आंबेडकरी चळवळीमध्ये ॲड. सखाराम मेश्राम यांचे महत्वपूर्ण योगदान आहे.

**शब्द संकेत** –महाडचा सत्याग्रह, समता सैनिक दल, मध्यप्रांतीय दलित परिषद,स्वतंत्र मजूर शेडशूल कास्ट विद्यार्थी फेडरेशन धम्म दिशा सोहळा

**अध्ययन पध्दती** – ऐतिहासिक अध्ययन पध्दतीचा उपयोग करून अन्वेषणात्मक किंवा परिचयात्मक संशोधन आराखड्याचा उपयोग करून प्राथमिक व द्वितीय स्तोत्रांचा उपयोग करण्यात आले आहे.

**प्रस्तावणा** –विदर्भातील आंबेडकरी चळवळ ही अतिशय वैचारीक आणि संघटनपूर्ण चळवळ होती. आंबेडकरापूर्वी दलित चळवळीचे जे स्थान होते. त्यापेक्षा अधिक क्रियाशिल आणि प्रभावी चळवळ ही डॉ. आंबेडकरांच्या नेतृत्वालने विकसित झाली.मतदान केंद्र बुधवारी विभागात होते. निवडणूकीतील परिस्थिती ही फार तंग होती. ॲड. सखाराम मेश्राम यांच्या वतीने अनेक पूरूष व महिला कार्यकर्त्या निवडणूक प्रचाराचे कार्य करित होत्या. रूईकरांना निवडणूकीत विजय मिळणे दुरापारच वाटत होते. मतदाराच्या वेळी भांडण होऊन पोलिसांनी



Scanned with OKEN Scanner

लाठीचार्ज (लाठीहल्ला) केला. सखाराम मेश्राम हे आपल्या कार्यकर्त्यांना वाचविण्याकरिता स्वतः समोर आले. पोलीसांनी त्यांच्यावरही लाठी चालविली तरीही सखारामजी डगमगले नाहीत. पुढे पोलिसांना गोळीबार करावा लागला. त्या गोळीबारामध्ये रामदास डोंगरे हे मृत्यूमुखी पडलेत. त्या निवडणूकीत रूईकर विजयी झाले

**महाडच्या सत्याग्रहात सहभाग**—२४ जाने. १९३२ रोजी महाडच्या सत्यग्रहात भाग घेऊन नागपूरला परतलेल्या समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांचे नागपूर रेल्वे स्टेशनवर स्वागत केले त्यावेळी त्यांच्या सोबत शंभर (१००) कार्यकर्ते उपस्थित होते. कस्तुरचंद पार्क येथे याच समता सैनिक दलाच्या कार्यकर्त्यांचा जाहीर सत्कार झाला त्यावेळीसुध्दा ॲड सखाराम मेश्राम उपस्थित होते.

**आंबेडकरी सभा—परिषदांमध्ये सहभाग व संरक्षण** —देवाजी खोब्रागडे यांच्या अध्यक्षतेखाली चंद्रपूर येथे आयोजित करण्यात आलेल्या मध्यप्रांतीय दलित परिषदेसाठी चोखामेळा वस्तीगृहातील विद्यार्थ्यासह हजर राहिले. २३ ऑगस्ट १९३२ रोजी तत्कालीन गव्हर्नर मॅटिग्यू व बॅटलर यांचा इंदोरा या ठिकाणी सत्कार घेण्यात आला होता. त्यावेळी या कार्यक्रमात हजर होते. १४ एप्रिल १९३३ रोजी चंद्रपूर येथील **'पूणे करार'** स्मृती दिवसाचा कार्यक्रमाच्या आयोजनासाठी पुढाकार व सहभाग होता. जाईबाई चौधरी यांनी स्थापित केलेल्या चोखामेळा मुलीच्या शाळेकरिता सुप्रिटेंटचे कार्य सांभाळले. २८ फेब्रुवारी १९३४ रोजी अकोला येथे आयोजित सर्वपंथीय संताच्या परिषदेकरिता उपस्थित राहिलेत. ४ नोव्हेंबर १९३४ रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हिंदू धर्माचा त्याग करण्याची घोषणा केली होती त्या घोषणेस पाठिंबा देण्यासाठी प्रचार व प्रसार सभेकरिता वस्तीगृहातील विद्यार्थ्यासह सहभाग घेतला होता. एल.एन. हरदास यांनी १९, २०, २१ मे, १९३५ रोजी कामठी येथे मेथडिस्ट स्कूल पटांगण या ठिकाणी म. प्रांत अस्पृश्य विद्यार्थी संमेलन आयोजित करण्यात आले होते त्या ठिकाणी ॲड. सखाराम मेश्राम आरमोरीचे प्रतिनिधी म्हणून उपस्थित होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष एम.बी. नियोगी होते.

०३/०९/१९३६ चा सत्याग्रह म्हणजे डॉ. बाबासाहेबांच्या आदेशानुसार पुणेकरांच्या निषेधार्थ, नागपूर येथील सत्याग्रहामध्ये आवळेबाबू, ठवरे, आर.व्ही. कवाडे, आर.आर.पाटील यांच्यासह ॲड सखाराम मेश्राम यांनी भाग घेतला. जेव्हा दलित पुढाऱ्यांना तुरूंगामध्ये डांबण्यात आले होते तेव्हा ॲड. निसार अली सोबत ॲड. सखाराम मेश्राम यांनी त्यांना सोडविण्याचे प्रयत्न केले. वर्ष १९४० मध्ये ॲड. सखाराम मेश्राम हे समता सैनिक दलाचे अध्यक्ष होते. त्याचबरोबर एक प्रसंग असा घडला की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे दलितांचे नेते नाहीत हे सांगण्यासाठी जे लोक डॉ. बाबासाहेबांचे विरोधी असणाऱ्या हरिजनांनी व्यंकटेश थिएटर येथे एक सभा आयोजित केली होती. ही सभा ॲड सखाराम एम. मेश्राम यांनी आपल्या सहकार्यांच्या मदतीने उधळून लावली. व चिटणीस पार्कच्या सभेत हजर राहून डॉ. बाबासाहेब दलितांचे नेते आहेत हे दाखवून देण्याचा प्रयत्न केला. विदर्भामध्ये पुढाकार घेऊन ॲड. सखाराम मेश्राम यांनी शे.का.फे. च्या विस्ताराकरिता अथक प्रयत्न केले आहेत. १९४२ ते १९४८ पर्यंत ते नागपूर नगर अध्यक्ष होते. १२/१२/१९४५ ला जेव्हा डॉ. बाबासाहेब आंबेडकर नागपूरला आले असता त्यांच्या स्वागताकरिता डी.पी. मेश्राम यांच्यासोबत ॲड. सखाराम मेश्राम रेल्वे स्टेशनवर हजर होते.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जेव्हा भंडारा मतदार संघात उमेद्वार म्हणून घोषित झाले तेव्हा त्यांच्या प्रचाराकरिता बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे, ॲड. बाबु आवळे, ॲड. सखाराम मेश्राम आणि पंजाबराव शंभरकर यांनी अथक प्रयत्न केले. कारण त्यांच्यावरती डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा प्रभाव होता. अशा या महान खंबीर नेतृत्वाचा अस्त ०७/०७/१९७४ ला मेयो हॉस्पीटल येथे सकाळी १०.३० वाजता निधन झाले. नागपूर महानगर पालिकेत त्यांच्या कार्याची दखल घेऊन सदर येथील अंजुमन कॉम्प्लेक्स जवळ ॲड. सखाराम मेश्राम यांचा पुतळा बसविला (२४/०१/१९७६) ला मुंबईचे मेअर श्री. मेहता यांच्या हस्ते व बॅ. खोब्रागडे यांच्या उपस्थितीत पुतळ्याचे अनावरण झाले. या चौकाला सखाराम मेश्राम चौक व इंदोरा चौका पर्यंतच्या रस्त्याला सखाराम मार्ग आणि मंगळवारी बगीचाला सखाराम मेश्राम पार्क असे नावं देण्यात आले. नागपूर डिस्ट्रिक्ट बार असोसिएशन च्या कार्यालयात त्यांचे छायाचित्र लावण्यात आले. अशा या महान कर्मनिष्ठ नेतृत्वाला निळा सलाम!



Scanned with OKEN Scanner

**मुल्यांकन** –शोधनिबंधावरून असे लक्षात येते की, ॲड. सखाराम मेश्राम हे एक कर्मनिष्ठ नेतृत्व आंबेडकरी चळवळीमध्ये सक्रिय असल्यामुळे आंबेडकरी समाजाला राजकिय, सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा लाभ मिळाला. त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा लाभ मिळाला. त्यांनी समाजाकरिता शैक्षणिक संस्था काढून समाजाला काहीतरी देण्याचा प्रयत्न केला. तसेच त्यांनी ३० वर्षे प्रॅक्टिस करून आंबेडकरी समाजाला कायदेविषयक मार्गदर्शन करून वकिली व्यवसाय सुरू केला. पैसे न घेता ही अनेक लोकांना न्याय मिळवून दिला. डॉ. बाबासाहेबांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्यावरती असल्याने त्यांनी समाजाकरिता स्वतःला समर्पित केले होते.१४ ऑक्टोबर, १९५६ मध्ये झालेल्या धम्मचक्र परिवर्तनाच्या सोहळ्यात सखाराम मेश्राम यांनी अतिशय महत्वाची जबाबदारी पार पाडली. दिक्षाभूमीवर येवू न शकलेल्या लोकांसाठी भैय्यासाहेब आंबेडकरांच्या हस्ते, कोराडी महादुला येथे महास्थविर चंद्रमणी यांच्या उपस्थित धम्म चक्र प्रवर्तन (दीक्षा) समारंभ आयोजित करण्यात आला. व कार्यक्रमाचे सखाराम मेश्राम व हंसराज गजभीये प्रमुख आयोजक होते. यावेळी भैय्यासाहेब आंबेडकर, श्री. मेश्राम यांच्या घरी येवून गेले. रिपब्लीकन पक्षाच्या स्थापनेपासून तर या पक्षाच्या विस्ताराकरिता तसेच या पक्षाच्या ऐक्याकरिता सखाराम मेश्राम यांचे योगदान महत्वाचे आहे. अशा या महान आंबेडकरी कर्मनिष्ठ नेतृत्वाने केलेल्या कार्याचा व्याप खूप मोठा आहे. त्यांच्या कार्याचा आलेख मोठा असल्याने संशोधकाने काहीच कार्याचा आढावा घेतला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नेतृत्वाचा त्यांना सहवास लाभला त्यामुळे त्यांनी आंबेडकरी समाजातील अस्पृश्य बांधवांच्या हिताकरिता निस्वार्थपणे कार्य केले. त्यांनी जर ठरविले असते तर दुसऱ्या ते ही कॉंग्रेसमध्ये जाऊन इतर रिपब्लिकन नेत्यासारखे मंत्री बनले असते. परंतु त्यांनी आंबेडकरी समाजासोबत प्रामाणिकता दाखविली.

**संदर्भ सूची**

१) कोसारे एच.एल. (१९८४):'विदर्भातील दलित चळवळीचा इतिहास'पेज नं. ८ नेहा प्रकाशन, नागपूर

२)Gail Omveat &"The Dalit Liberation movementPatankar Bharatin Colorial period Feb. 1979, Page No. 415

३) संपादक – खोब्रागडे सुनील :'जनतेचा महानायक' दैनिक वृत्तपत्र"कर्मनिष्ठ आंबेडकरी सेनानी स्मृतीशोध ॲड. सखाराम मेश्राम" या शिर्षकाअंतर्गत रविवार दि. ६ जुलै, २०१४, पेज नं.४

**सहायक संदर्भ सुची**

१.प्रा. बनसोड प्रवीण (२०१४)वंचितांना अधिकार देणारा महात्मा दैनिक देशोन्नती ११–०४–२०१४

२.डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४)डॉ. बाबासाहेब आंबेडकर :जीवन, कार्य एवं विचार' पेज नं. १९६,निरमय क्रिएटिव नागपूर.

३.डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४)डॉ. बाबासाहेब आंबेडकर :जीवन, कार्य एवं विचार' पेज नं. १८५,निरमय क्रिएटिव नागपूर

४.डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४)डॉ. बाबासाहेब आंबेडकर :जीवन, कार्य एवं विचार' पेज नं. १९

५.संपादक (१९९३)डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरवग्रंथ' महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृति मंडळ मुंबई – ४०००१

शासकीय फोटोझिंको मुद्रणालय पुणे – ४११००१ प्रथमावृत्ती : २५ डिसेंबर १९९३

६.डॉ. कराडे बी.एम. (२००९)भारतीय समाज प्रश्न आणि समस्या श्री मंगेश प्रकाशन नागपूर



Scanned with OKEN Scanner

Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar


Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

March -2021

ISSUE No- (CCLXXVI ) 276 - C

## Women's Rights : Status & Goal



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor:**
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**Editor:**
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

This Journal is indexed in :
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To : www.aadharsocial.com

Aadhar Publications

Scanned with OKEN Scanner

(SJIF) Impact Factor-7.675

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

Multidisciplinary International Research Journal

**March -2021**

**ISSUE No- (CCLXXVI) 276 ( C)**

# Women's Rights : Status & Goal



**Chief Editor**
Prof. Virag S. Gawande
Director
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Executive Editor**
Dr.Virendra K.Jumde
Principal
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

**Editor**
Dr.Archana D.Patil
Head, Dept. of Pol. Sci,
Dr.Haribhau Admane Arts &
Commerce College Saoner
Dist-Nagpur

## The Journal is indexed in:

Scientific Journal Impact Factor (SJIF)

Cosmos Impact Factor (CIF)

International Impact Factor Services (IIFS)

**Aadhar International Publication**

For Details Visit To : www.aadharsocial.com

Scanned with OKEN Scanner

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - ( (SJIF) -7.675, Issue NO, 276 (CCLXXVI) C
ISSN : 2278-9308
March, 2021

# INDEX


| No. | Title of the Paper | Authors' Name | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | महिलांच्या राजकिय सहभागा दरम्यान येणाऱ्या अडचणी | डॉ.अर्चना ज्ञा.पाटील | 1 |
| 2 | महिला सक्षमीकरणामध्ये प्रसार माध्यमांची भूमीका | डॉ.अल्पना देवकर | 5 |
| 3 | महिला सक्षमीकरण आणि सरकारी योजना | प्रा. होमराज टी. राठोड | 10 |
| 4 | आधुनिक समाजात महिला सक्षमीकरण | कु. स्वाती एम. उगेमुगे | 14 |
| 5 | महिलांचे हक्क व अधिकार | प्रा.पी.पी.सानप | 18 |
| 6 | स्त्री आत्मकथन आणि महिला सक्षमीकरण | प्रा. रेखा दिगंबर आढाव | 20 |
| 7 | स्त्री व राजकीय स्थिती | प्रा. डॉ. अतुल हणमंत कदम | 24 |
| 8 | स्त्रीयांचे अधिकार स्वरुप आणि वास्तव | डॉ. संजय म. अवघुत | 28 |
| 9 | महिला सक्षमीकरण व शासकिय धोरणे | प्रा. डॉ. प्रतिभा गडवे (दातीर) | 31 |
| 10 | भारतीय संविधान आणि स्त्रियांचे मानवाधिकार : एक अध्ययन | डॉ. कैलाश फुलमाळी | 37 |
| 11 | भारतातील स्त्रीवादी चळवळ | प्रा.संजय अंकुशराव जगताप | 43 |
| 12 | महिलांचे राजकीय सक्षमीकरण | राहुल जोंधळे | 46 |
| 13 | भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार | प्रा.डॉ.कमलाकर पी. तागडे | 50 |
| 14 | पंचायत राज व्यवस्थेत महिलांचे नेतृत्व | प्रा.डॉ.संतोष मिसाळ | 54 |
| 15 | ग्राम पंचायत प्रशासनातील महीलांचा सहभाग | प्रा.नरेश वा. पाटील | 56 |
| 16 | महिला सक्षमीकरणाचा मुलाधार : हिंदू कोडबिल | प्रा.डॉ. सौ. रिता धांडेकर | 62 |
| 17 | भारतीय संविधान व महिलांचे हक्क | डॉ. संजय गव्हाणे | 66 |
| 18 | स्त्री – पुरुष आणि सामाजिक समतो | सहा.प्रा.वसंता सिताराम वंजारी | 69 |
| 19 | महिलांच्या सक्षमीकरणात शासकिय योजनांचे योगदान | सहा.प्रा. विकास एन. अड्याळकर | 74 |
| 20 | ग्रामिण भागातील महिलांचे सक्षमीकरण | प्रा. सुहास उत्तमराव वाघमारे | 77 |
| 21 | भूमंडलीकरण के दौर में लैंगिक समानता एवं डॉ. राममनोहर लोहिया | डॉ. अनुप सिंह | 81 |




Scanned with OKEN Scanner

# "भारतीय संविधान आणि महिलांचे अधिकार"

प्रा.डॉ.कमलाकर पी. तागडे
समाजशास्त्र विभाग प्रमुख
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस. कॉलेज,नागपूर

**प्रस्तावना —**

भारतात पितृसत्ताक कुटुंबपध्दती आहे. कुटुंबामध्ये पुरूषांचे वर्चस्व असल्याचे दिसून येते. यानुसारच आपणाला भारतीय समाजामध्ये बऱ्याच बाबतीत स्त्री आणि पुरूषांमध्ये असमानता आढळून येते. लिंग असमानता ही एक सामजिक विषमता आहे. या विषमतेतील सामाजिक रूढी, परंपरा, मूल्ये, प्रमाणक यांना मान्यता प्राप्त झाली आहे. आज सुशिक्षित व सुधारलेल्या समाजामध्ये गर्भजल परीक्षण करून गर्भलिंग जाणून घेतले जाते व स्त्री लिंग आढळून आल्यास गर्भपाताची प्रक्रिया केली जाते. मुलीच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करून मुलाच्या शिक्षणाकडे विशेष लक्ष दिले. अर्थात समता या लोकशाही मुल्यांकडे दुर्लक्ष केले जात. समाजाच्या सर्वांगीण विकासाकरिता स्वातंत्र ही अत्यावश्यक बाब आहे. स्वातंत्र्याशिवाय व्यक्तीला मानवी अधिकार सुध्दा मिळू शकत नाही. विकास साधण्याचा हक्क प्रत्येकाला आहे. सर्व मानव जन्मत: स्वतंत्र व समान असतात असे मानवी हक्काच्या जागतिक जाहिरनाम्यात म्हटले आहे. स्त्रीला सुध्दा पुरूषांसारखेच समान अधिकार मिळावेत याकरिता काही समाजसुधारक, सतं, विचारवंत, इत्यादींनी आपल्या विचारांच्या आधारे जनजागरण करून चळवळी उभारल्या. भारतीय संविधानाने तर स्त्रियांना पुरूषांबरोबरचे अधिकार देऊन विषमतेच्या श्रृखंला तोडल्यात, एकीकडे आपण तंत्रज्ञान व डिजिटल युगाच्या गप्पा करायच्या व दुसरीकडे स्त्रियांना दुर्बल समजून समाजाने व्यवहार करायचा हे अतिशय लज्जास्पद आहे.

भारतीय समाजव्यवस्थेला विषमतेची किनार आहे. भारतीय संविधानाने ही विषमतेची किनार काढली असली तरी येथील काही प्रतिगामी शक्ती विभेदाचे कार्य करतात. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी हे स्पष्ट केले की "एखाद्या समाजाच्या प्रगतीचे मोजमाप मी त्या समाजाच्या स्त्रियांच्या प्रगतीवरून करणे" यावरून हे आपणाला लक्षात येईल की, स्त्रियांच्या उत्थानाकरिता डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानामध्ये किती महत्वाची भूमिका बजावली असेल हे लक्षात येते. भारतीय समाजव्यवस्थेतील असणारे अनेक विषमतामुलभ घटक मानवी हक्कांना पायदळी तुडवीत होते. **'सार्वजनिक सत्यधर्म'** च्या रूपाने महात्मा फुले यांनी मानवी **'स्वतंत्राचा जाहीरनामा'** लिहिला. भारतीय संस्कृतीमध्ये आपणाला स्त्रियांविषयी विरोधाभासाची भूमिका आढळून येते. एका बाजूला स्त्रियांचे धर्माधिष्ठित वर्णन केलेले आढळूनयेते व दुसऱ्या बाजूला समाजामध्ये प्रत्यक्षात दुय्यम स्थान आढळून येते. काही रूढी व परंपरा यांच्याद्वारे स्त्रियांवर अन्याय, शोषण, सामाजिक विषमता विभक्तीकरण झाल्याचे दिसून येते. स्त्रियांना सार्वजनिक जीवनामध्ये दुय्यम स्थान देण्यात आले. त्यामुळे स्त्रियांच्या न्याय व हक्काकरिता काही चळवळी, सक्रिय झाल्यात व आज स्त्रिया आपल्या अधिकारांविषयी आपला आवाज बुलंद करीत आहे. भारतीय संविधानाने स्त्रियांना विविध क्षेत्रात अधिकार देऊन त्यांना सशक्त केले आहे.

**स्त्री—पुरूष असमान भूमिका —**

तथागत बुध्द, शिवाजी महाराज, आई जिजाऊ, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्री फुले, शाहु महाराज, डॉ. बी. आर. आंबेडकर, राजा राममोहन रॉय आदि परिवर्तनवादी विचारांनी स्त्रियांना

आत्मसम्मान तथा समान अधिकार प्राप्त होण्याकरिता आपल्या पध्दतीने आंदोलने केलीत व स्त्रियांना समानता आवश्यक आहे हे पटवून दिले. स्त्री–पुरूष हे एकाच नाण्याचे दोन पैलू आहेत. स्त्री–पुरूष नाते हे समानतेचे असले पाहिजे. परंतु पुरूषी वर्चस्व असलेला समाज स्त्री व पुरूष समान आहे, हा विचार मानीत नाही. स्त्रियांमध्ये क्षमता असूनही केवळ रूढी–प्रथा परंपरेच्या आधारावर निर्माण झालेले गैरसमज स्त्रियांच्या क्षमतेवरती प्रश्नचिन्ह निर्माण करतात. स्त्री ही अबला आहे, पुरूषांनीच नेतृत्व करावे. प्रसिध्दी व किर्ती मिळवावी व पडद्यामागची कामे स्त्रियांनी करावी अशाप्रकारचे काही अलिखित नियम हे समाजानी ठरविले होते. परंतु वस्तुस्थिती ही फार आजच्या स्थितीला वेगळी आहे. आज स्त्रियां पुरूषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात कार्य करीत आहे.

**भारतीय समाजातील स्त्रियांच्या अवनतीची कारणे –**

वैदिक काळापासून ते स्वातंत्र्यप्राप्तीच्या काळापर्यंत स्त्रियांचा सामाजिक दर्जा हा एकसारखा घसरत गेला याचे कारणे खालीलप्रमाणे दिसून येतात.

१) स्त्री शिक्षणावर समाजाचे पूर्वीपासूनच प्रतिबंध घातले होते.

२) संयुक्त कुटुंब पध्दतीमुळे स्त्रियांचे कार्यक्षेत्र हे चूल आणि मूल ठरविल्या गेले.

३) आर्थिक स्थिती स्त्रियांना कुटुंबावरती अवलंबून राहावे लागत आहे.

४) विधवांच्या पुनर्विवाहास बंदी घातल्यामुळे त्यांची स्थिती दयनीय झाली होती.

५) बालविवाह, कुलीन विवाह, जरठ–कुमारी विवाह, हुंडा पध्दती हया कुप्रथांमुळे त्यांच्या अवनतीमध्ये अधिक भर पडली होती.

६) वेळोवेळी होणाऱ्या परकीय आक्रमणांमुळे स्त्रियांना संरक्षण लाभावे, त्यांचे अपहरण होऊ नये म्हणून स्त्रियांना घरांच्या चार भिंतीत डांबून ठेवल्या जात होते.

**भारतीय समाजातील स्त्रियांच्या अयोग्यतेचे स्वरूप –**

**(Nature of Women Disabilities in Indian Society)**

परंपरागत भारतीय समाजामध्ये स्त्रियांची स्थिती अत्यंत दयनीय होती हे आपल्याला वरील विवेचनावरून आढळून येते. परंतू आधुनिक काळात सुध्दा स्त्रियांच्या अयोग्यता कमी झाल्यास आपणास म्हणता येत नाही.

भारतीय समाजामध्ये ज्या अयोग्यता आहेत, त्याविषयी आपण थोडी चर्चा करू या

**सामाजिक नियोग्यता (अयोग्यता) –**

**१) शिक्षण –**

भारतात एकोणविसाव्या शताकाच्या मध्यापर्यंत जेव्हा आपण विचार करतो तेव्हा स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नव्हता. देशातील शिक्षण व्यवस्था केवळ नोकरी करण्यासाठीच आवश्यक समजल्या जात होती. स्त्रियांना नोकरी करणे उचित मानले जात नव्हते.

**२) नोकरी –**

स्वातंत्र्यपूर्व काळात नोकरीपेशामध्ये स्त्रियांची संख्या जगण्य होती. आज हा दृष्टिकोण बदलला असला तरी आपणाला फारसी संख्या वाढली असल्याचे दिसून येत नाही.

**३) समिती व संघटना –**

अलीकडे आपणाला महिलांच्या हक्कांकरिता चळवळी, स्वयंसहाय्यता गट, बचतगट, निर्माण होत आहे. परंतु स्वातंत्र्यपूर्ण समिती व संघटना स्त्रियांकरिता फार प्रमाणात नव्हत्या.

**आर्थिक निर्योग्यता (अयोग्यता) (Economic Disabilities)**

सन १९३७ पूर्वी स्त्रियांना संपत्तीविषयक कोणताही विशेष अधिकार नव्हता. संयुक्त कुटुंबाच्या सक्तीमध्ये तिला कुठलाही अधिकार नव्हता. अविवाहित मुलींचा सुध्दा कुटुंबाच्या


Scanned with OKEN Scanner

संपत्तीत कोणताच अधिकार नव्हता. विवाहित स्त्रियांना सुध्दा स्त्रीधन म्हणून मिळालेल्या संपत्ती व्यतिरिक्त कोणत्याही अन्य प्रकारचे अधिकार नव्हते. पृथक संपत्तीमध्ये मुलींचा अधिकार हा मुले व विधवा यांच्या नंतर होता. डॉ. बी. आर. आंबेडकरांनी संसदेत मांडलेल्या हिंदू कोड बिलानंतर स्त्रियांना वडिलांच्या व पतीच्या संपत्तीमध्ये अधिकार मिळू लागले.

**कौटुंबिक निर्योग्यता (अयोग्यता) (Familiar Disabilities)**

कौटुंबिक जबाबदारी निभावण्यामध्ये महिलांचा सिंहाचा वाटा राहिला असला तरी तिला त्या मोबदल्यात कुटुंबामध्ये व समाजामध्ये पाहिजे त्या प्रमाणात स्वाभिमान व आत्मसम्मान प्राप्त झाला नाही. परिणाम असा झाला की कौटुंबिक जीवनाच्या संबंधात अनेक प्रकारच्या अयोग्यतेची शिकार बनली. मुलीला भार समजून आईवडिल लवकर लग्न करून देतात. संपूर्ण आयुष्यच ती आईवडिलांकडे व पतीच्या घरी सेवाच करीत असते. विधवा मातांची अवहेलना करणे हे तर भारतीय कुटुंबाचे सामान्य वैशिष्टय आहे. तिला अपमानित करणे, तिला मारझोड करणे, अन्याय अत्याचार करणे, या सर्व गोष्टीमधून तिचे सुरक्षा कवच म्हणजे भारतीय संविधान होय. भारतीय संविधानाने आज पुरूषांबरोबर समान अधिकार देऊन तिला आत्मसम्मान व स्वाभिमान प्राप्त करून दिला आहे.

**राजकीय निर्योग्यता (अयोग्यता) (Political Disabilities)**

सन १९१९ पर्यंत स्त्रियांना मताधिकाराचा अधिकार सुध्दा पूर्णत: प्राप्त झाला नव्हता. १९१९ च्या सुधारणा योजनामध्ये ब्रिटिश पार्लमेंटने स्त्रियांना मताधिकार देण्याचा प्रश्न प्रांतीय परिषदेसमोर ठेवण्यात आला. सन १९३५ च्या कायद्यात सुध्दा याविषयी काही विशेष सुधारणा करण्यात आली नाही आणि स्त्रियांना मतदानाचा अधिकार केवळ स्त्रियांचे शिक्षण, पतीची स्थिती, सांपत्तिक स्थिती इत्यादी आधारांवर देण्यात आला. परंतु भारतीय संविधानाने आज पुरूषांप्रमाणेच स्त्रियांना सुध्दा राजकीय क्षेत्रात पूर्ण अधिकार बहाल केले आहेत.

**हिंदू कोड बिल आणि महिलांना सुरक्षितता –**

स्त्रियांच्या अधिकाराला खऱ्या अर्थाने कुणी बळकट केले असेल तर ते म्हणजे भारतीय संविधानाने स्त्रियांना वेगवेगळया प्रकारचे अधिकार देऊन तिला पुरूषाप्रमाणेच समान अधिकार बहाल केलेत. प्राचीन भेद भावाच्या संकल्पनांना मुठमाती देऊन आधुनिक, प्रगत व पुरोगामी विचारसरणीनुसार समाज व्यवस्थेची बांधणी करणे, स्त्रियांना पुरूषाप्रमाणे समान अधिकार देऊन स्त्री–पुरूष असमानता नष्ट करण्याच्या दृष्टिकोनातून डॉ. आंबेडकरांनी हिंदू कोड बिल निर्माण केले. डॉ. आंबेडकरांनी तयार केलेले हिंदू कोड बिल ९ भागात १३९ कलमामध्ये आणि ७ परिशिष्टात विभागले गेले. त्यामध्ये प्रामुख्याने पुढील सुधारणा रेखांकित करण्यात आल्या.

१) स्त्रियांना घटस्फोट अधिकार
२) पतीने घटस्फोट दिल्यास पोटगी मिळावी
३) व्यक्ती एकविवाह कायदेशीर असल्यास दुसरा विवाह करण्यासाठी योग्य कारण नसल्यास तो विवाह अवैध ठरवून स्त्रियांना स्थैर्य देणे.
४) स्त्रियांना दत्तक घेण्याचा व दत्तक जाण्याचा अधिकार
५) स्वत:च्या मिळकतीवर स्त्रियांना अधिकार.
६) वडिलांच्या मिळकतीत मुलांच्या बरोबरीने मुलांना समान अधिकार.
७) मुलींना वारसा होण्याचा अधिकार.
८) आंतरजातीय विवाहास मान्यता.
९) स्त्रीला स्वत:चा वारसा निश्चित करण्याचा अधिकार

अशाप्रकारे हिंदू कोड बिलाद्वारे महिलांना पुरूषांबरोबरीचे अधिकार देण्यात आहे होते.



Scanned with OKEN Scanner

**निष्कर्ष –**

वरील शोधनिबंधाच्या आधारे संशोधनकर्त्याला असे आढळून आले की, भारतीय स्त्रियांच्या उत्थानाकरिता संविधानाने योग्य प्रकारची भूमिका निभावली आहे. भारतीय संविधानाने स्त्रियांच्या न्याय व समानतेकरिता पुरूषासारखेच स्त्रियांना अधिकार दिले आहे. एकेकाळी स्त्रियांना अबला समाजण्यात येत होते, परंतु आज काही प्रमाणात स्त्रियांना जो आत्मसम्मान व स्वाभिमान प्राप्त झाला आहे. तो म्हणजे भारतीय संविधानामुळेच. भारतीय संविधानाने स्त्रियांच्या विविध प्रश्नांना सोडविण्याकरिता वेगवेगळया प्रकारचे कायदे निर्माण केलेत व त्यांना सन्मानाने जीवन जगण्याचा मार्ग मोकळ करून दिला.

**संदर्भ सूची**

१. प्रा. बन्सोड प्रवीण (२०१४) वंचितांना अधिकार देणारा महात्मा दैनिक दैशोन्नत, ११/०४/२०१४.

२. डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन, कार्य एवं विचार, पेज नं. १९६, निरमय क्रिएटिव, नागपूर.

३. डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन, कार्य एवं विचार, पेज नं. १८५, निरमय क्रिएटिव, नागपूर.

४. डॉ. खांडेकर भालचंद्र (२०१४) डॉ. बाबासाहेब आंबेडकर जीवन, कार्य एवं विचार, पेज नं. १९५, निरमय क्रिएटिव, नागपूर.

५. संपादक (१९९३) डॉ. बाबासाहेब आंबेडकर गौरव ग्रंथ, महाराष्ट्र साहित्य आणि संस्कृति मंडळ, मुंबई–४००००१. शासकीय फोटोडिस्को मुद्रणालय, पुणे–४११००१.

६. डॉ. कराडे बी. एम. (२००९) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.




Scanned with OKEN Scanner

ISSN : 2349-638X
IMPACT FACTOR : 7.149

Aayushi International
Interdisciplinary Research Journal
E-mail : aiirjpramod@gmail.com Website : www.aiirjournal.com
Peer Reviewed & Indexed Journal

*Special issue No. 84*

# Dr. Babasaheb Ambedkar an Architect of India



**Vol. VI
Marathi**

***Chief Editor***
**Mr. PRAMOD TANDALE**

***Editor***
**Ms. MEGHAVEE G. MESHRAM**
**Mr. NARESH W. PATIL**

Scanned with OKEN Scanner

Impact Factor – 7.149 ISSN-2349-638x

# Aayushi International Interdisciplinary Research Journal (AIIRJ)

PEER REVIEWED & INDEXED JOURNAL

April - 2021

## Theme of the Special Issue

## Dr.Babasaheb Ambedkar : An Architect of India

Chief Editor

Pramod P. Tandale

Editor

Prof. Meghavee G. Meshram

Prof. Naresh W. Patil

IMPACT FACTOR

SJIF 7.149

For details Visit our website

www.aiirjournal.com

Scanned with OKEN Scanner

| Sr. No. | Name of the Author | Title of the Paper | Page No. |
|---|---|---|---|
| 289 | प्रा. कमलेश मानकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या हिंदु कोड बिलातील सशक्त स्त्री | 1359 |
| 290 | प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या विचारांचा मराठी साहित्यावरील प्रभाव | 1364 |
| 291 | प्रा. विणा शा. काकडे | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार आणि आजची शैक्षणिक अवस्था | 1369 |
| 292 | डॉ. सविता अशोक व्हटकर | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शिक्षण विषयक विचार व कार्य | 1372 |
| 293 | प्रा. डॉ. प्रशांत रा. देशमुख | डॉ.बाबासाहेब आंबेडकर आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराजाचा सामाजीक दृष्टीकोन एक विश्लेषनात्मक अध्ययन | 1376 |
| 294 | महादेव चै. चुंचे | भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा जीवन विषयक दृष्टिकोन | 1381 |
| 295 | डॉ. प्रियंका केवलदास अंबाडे (उके ) | स्त्री मुक्तीचे सुरक्षा कवच -हिंदू कोड बिल (विशेष संदर्भ -डॉ. बाबासाहेब आंबेडकर) | 1384 |
| 296 | प्रा. डॉ.सुनिल राजपूत | डॉ.बाबासाहेब आंबेडकर प्रणीत राजकीय पक्ष | 1389 |
| 297 | डॉ. विजया एच. राऊत | स्त्रीमुक्तीचा उद्गाता महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर | 1394 |
| 298 | डॉ. कमलाकर पी. तागडे | डॉ. बी. आर. आंबेडकरांची शैक्षणिक दृष्टीकोण: एक समाजशास्त्रीय चिंतन | 1399 |
| 299 | प्रा.प्रभाकर वसंत पगार | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कृषी विषयक विचार : वर्तमानातील उपयुक्तता | 1404 |
| 300 | प्रा. सतिश धवड | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ओबीसी करिता केलेले कार्य | 1409 |




Scanned with OKEN Scanner

# डॉ. बी. आर. आंबेडकरांची शैक्षणिक दृष्टीकोण : एक समाजशास्त्रीय चिंतन

**डॉ. कमलाकर पी. वाघे**
सहायक प्राध्यापक
पी.डब्लू. एस महाविद्यालय नागपूर

**सारांश :**

कोणतेही राष्ट्र तेव्हाच सशक्त व विकसित होऊ शकते जेव्हा की, या राष्ट्रामध्ये विषमता नसेल व समाजातील सर्व सदस्यांना शिक्षण मिळविण्यासाठी समान संधी असेल. डॉ. बाबासाहेव आंबेडकरांना समता, स्वातंत्र्य, बंधूता, न्याय ही मानवी मुल्यांनी समजलेली शिक्षण व्यवस्था उभारायची होती. एक स्वाभिमानी, परिवर्तनवादी, आधुनिक समाज निर्माण करायचा होता. शिक्षणाशिवाय आपण आपल्या जीवनाचे व राष्ट्राचे कल्याण करणे अशक्य आहे. "शिक्षण" हाच मानवी समाजाच्या क्रांतीचा मार्ग आहे. शिक्षणाच्या संदर्भात डॉ. आंबेडकरानी जे चिंतन केले आहे. ते अतिश्य महत्वाचे असून वास्तविक आहे. समाजातील सदस्यांना जर शिक्षण नाकारले जात असेल तर त्या राष्ट्राचा विकास होणे अशक्य आहे. जातीयव्यवस्थेमुळे व देशात काही मुठभर लोकांना शिक्षण घेता आले परंतु बहुजन समाजाला शिक्षण घेण्याकरिता बऱ्याच काळ वाट बघावी लागली. शिक्षण घेण्याचा प्रत्येक मानवाचा मुलभुत अधिकार आहे. हे भारतीय संविधानाने स्पष्ट केले आहे. शिक्षण हा सामाजिक बदलाचा पाया आहे. शिक्षणामुळे मानवाला मानसासारखे जीवन जगता येते. जातीव्यवस्थेमुळे या देशात माणसा माणसामध्ये विषमता निर्माण झाली व बहुजन समाजाला आपले जीवन सन्मानाने जगण्याकरीता उपक्षित रहावे लागले डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टीकोनामध्ये बहुजनसमाजाच्या परिवर्तनाची बीजे पेरल्या गेली आहेत. डॉ. आंबेडकरांचे विचार राष्ट्राच्या विकासाकरीता मुलगामी स्वरूपाचे विचार आहेत.

प्रमुख शब्द :सशक्त राष्ट्र विषमता, शिक्षण आधुनिक समाज भारतीय संविधान, मुलभुत अधिकार.

**उदिष्टये :**

१) डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टीकोनाचा परिचय करणे.

२) डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टीकोनाच्या व्याप्तीचा आढावा घेणे.

**संशोधन पध्दत :**

डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक विचाराला आढावा घेण्याकरीता संशोधकाने व्दितिकीय स्त्रोताचा उपयोग केला आहे.

**प्रस्तावना :**

शिक्षण हे समाजपरिवर्तनाचे एक महत्वाचे साधन व माध्यम आहे. शिक्षणाव्दारे मनुष्यास ज्ञान संपादन करून तो निसर्गातील परिस्थितीचा योग्य प्रकारे उपयोग करून स्वतःच्या जीवनामध्ये परिवर्तन करून एक जवाबदार व कर्तव्यदक्ष नागरीक होता येते. म्हणूनच सर फ्रॉन्सीस बेकन या विचारवंताने "नॉलेज इज पावर" असे म्हटले आहे बेन कारसने म्हटले आहे की, हे जैम ्मल जींज नदसववो 'सस जीम क्ववते खरंच वास्तविक आहे. मागासवर्गीय बहुजनसमाजाच्या कल्याणाकरीता शिक्षणापासुन वंचित असलेल्या दलितांकरीता पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. शिक्षणाच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांनी जे चिंतन केले होते. त्या चिंतनामध्ये वास्तविकता होती. ज्ञान अर्थात शिक्षण जर समाजातील लोकांना हे सहजरित्या मिळत असेल तर त्या व्यक्तिचा, समाजाचा व राष्ट्राचा का विकास होऊ शकतो. व्यक्तिला शिक्षण मिळायलाच पाहिजे हे संविधानाने दिलेला अधिकार आहे. डॉ. आंबेडकरांनी अन्न, वस्त्र, निवारा हया मानवाच्या प्राथमिक व महत्वाच्या

गरजा आहे तो त्या बरोबरच शिक्षण सुध्दा व्यक्तिला त्याच्या अस्तित्वाकरीता आवश्यक आहे. म्हणून डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाला, प्राथमिक, मुलभूत अधिकाराच्या कक्षेत समाविष्ट केले. समता, स्वातंत्र्य, बंधुता व न्याय या मानवी मुल्यांचा समाजामध्ये प्रसार झाला पाहिजे त्याकरीता त्यांनी शिक्षणाला अधिक महत्व दिले. "शिक्षण हे खऱ्या अर्थाने जीवनाच्या प्रगतीकरीता महत्वाची बाब होय." डॉ. आंबेडकरांच्या दृष्टीकोन हा बहुआयामी आहे. यामध्ये काही विवाद नाही. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाच्या संदर्भात जो परिभाषा केली ती म्हणजे व्यक्तीला जाणीव देते ते शिक्षण शिक्षणामुळे प्रत्येक व्यक्तीला त्यांच्या अस्तित्वाची जाणीव होते. एकदा जर त्या व्यक्तीला जाणीव झाली की तो आपले पाऊल परिवर्तनाच्या दिशेने टाकतो व आपली प्रगती करून घेतो. या देशातील जाती व्यवस्थेने इथल्या अस्पृश्य समजल्या जाणाऱ्या जातींना अनेक प्रकारची बंधने लादली. त्यांचा जगण्याचा अधिकारच नाकारला होता. परंतु इथे इंग्रज आल्यामुळे ज्योतीबा फुले, सावित्रीबाई फुले, शाहु महाराज, डॉ. आंबेडकर, डॉ. पंजाबराव देशमुख, कर्मवीर भाऊराव पाटील, इ. समाजसुधारकांच्या कार्यामुळे मागासवर्गीय समाजाला शैक्षणिक सुविधांचा लाभ घेता आला. डॉ. आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून बहुजन समाजामध्ये परिवर्तन करण्याच्या दृष्टीकोनातून आटोकाट प्रयत्न केला घटनेमध्ये त्यांनी दिलेले अधिकार हे प्रत्येकाचे सुरक्षा कवच आहे. शिक्षण व शिक्षणक्षेत्रे हे डॉ. आंबेडकरांचे विशेष आवडीचे क्षेत्र होते. "सरकारी नौकरीत आणि सैन्यात कनिष्ट श्रेनीतील ज्या जागांची दलितवर्गाकरीता डॉ. आंबेडकरांनी मागणी केली होती. त्या जागा बहुजन वर्गाच्या जीवन श्रेणीत वाढ करण्यास असमर्थ होत्या." डॉ. आंबेडकरांच्या शिक्षण विषयक दृष्टीकोण हा अतिशय व्यापक व अनुकरणीय आहे. "शिक्षण घेण्याचा प्रत्येक मानाचा मुलभुत अधिकार आहे. अस्पृश्यामध्ये खरी जागृती व प्रगती शिक्षणामुळेच होऊ शकणार असल्यामुळे शिक्षण हा सामाजिक बदलाचा पाया आहे. शिक्षणामुळे मानवाला माणसासारखे समानतेचा पायावर आधारित जिवन जगण्याची संधी देण्यात येते व पशुत्व नाहीसे करता येते. म्हणून मानवी जीवनात शिक्षणाचे महत्व अन्य आधार आहे."

डॉ. आंबेडकरांनी २० जुलै १९२४ ला सामाजिक परिवर्तन व प्रबोधनाच्या दृष्टीने बहिष्कृत हीतकारीणी सभा स्थापन करून तिचे ब्रीद वाक्य "शिका, संघटीत व्हा व संघर्ष करा" हे होते १९२८ मध्ये बहिष्कृत हितकारणीची सभा विसर्जित करून बहुजनांच्या शालेय शिक्षणाची भक्कम पायावर उभारणी करण्याच्या दृष्टीने बहिष्कृत वर्गामध्ये शिक्षणाचा प्रसार करण्यासाठी "भारतीय बहिष्कृत शिक्षण प्रसारक मंडळाची स्थापना केंली."

ब्राम्हणवादाने या देशांमध्ये जातीव्यवस्थेची बिजे खोलवर रोवून मानवतेची हत्याचा करण्यात आली. मागासवर्गीयांना शिक्षण घेण्यास बंदी होती. "शुद्राने ज्ञानसंपादन करू नये त्याला शिक्षण देणे, हे पाप आहे." असे हिंदुचे धर्मशास्त्र सांगते. इंग्रजांच्या राजवटीमध्ये शिक्षणाची सुरूवात झाली. महात्मा फुले या थोर समाजसुधाकराने व त्यांच्या अर्धांगी सावित्रीबाई फुले यांनी मागासवर्गीयांसाठी शिक्षणाची व्दारे खुली केलीत व आपले आयुष्य या बहुजन समाजाच्या कल्याणाकरीता खर्च केले. आजही बहुजन समाजाचे शिक्षणाच्या संदर्भात हे वास्तव आहे की, दारीद्रयामुळे व्यवसाय व नोकरीचा अनिश्चिततेमुळे मुलांना शिक्षणाकरीता शाळेत पाठविले जात नाही. ग्रामीण आणि आदिवासी क्षेत्रात शिक्षणाचे वास्तव भयानक आहे जेव्हा की आपणाला स्वातंत्र्य मिळून ७४ वर्ष लोटले आहे. घराच्या आर्थिक, हालाकीच्या परिस्थितीमुळे आपले शिक्षण अर्ध्यावरच सोडून देतात त्यामुळे शैक्षणिक मागासलेपणा व बेरोजगारी या दोन्ही समस्या बहुजन समाजामध्ये दिवसेंदिवस वाढत आहे. मागासवर्गीयांच्या जीवनामध्ये बदल करावयाचा होता म्हणून डॉ. आंबेडकरांनी मुंबईमध्ये सिध्दार्थ कॉलेजची स्थापना केली व औरंगाबाद येथे मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. या वरून त्यांच्या शैक्षणिक चळवळीचा परिचय होतो. डॉ. आंबेडकरांना असे वाटत होती की, प्राथमिक शिक्षण सक्तिचे केले तर ते मोफत ठेवण्याची आवश्यकता नाही. जे लोक फी देऊ शकतात त्यांच्याकडून घ्यावी व जे देऊ शकत नाही त्यांच्याकरीताच प्राथमिक शिक्षण हे मोफत स्वरूपात उपलब्ध करून द्यावे.

**उच्चशिक्षणाच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोन :**

शिक्षणाच्या विषयी डॉ. आंबेडकर आपले विचार व्यक्त करीत असतांना तो स्पष्ट करतात की, १६ विद्यार्थ्यांनी भाराभार ग्रंथ वाचून संग्रहण करण्याची शक्ती पाहिजे. नवनवीन कल्पना सुचल्या पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आणि समाजाच्या उध्दाराकरीता अधिकाअधिक लक्ष देणे अतिश्य महत्वाचे आहे. प्राध्यापकाने केवळ आपल्या भौतिक सुखाकडे अडकून न राहता त्याने स्वतःला समाजाच्या हिताकरीता वाहून जायला पाहिजे. शिक्षणाशिवाय आपणाला मोक्याच्या आणि महत्वाच्या जागा काबिज करता येणार नाही. पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनाही शिकावे. डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टीकोनाचा प्रभाव असा पडला की, बऱ्याच शैक्षणिक संस्था या देशात निर्माण झाल्यात त्यांच्यामध्ये जी विद्वता होती त्या विद्वतेला साऱ्या विश्वाने वंदन केले आहे. प्र. के. अत्रे म्हणतात डॉ. आंबेडकरांसारखा प्रचंड बुध्दीचा, विव्दतेचा आणि कर्तृत्वाचा दुसरा एकही महाराष्ट्रीयन माणूस आज आम्हाला दिसत नाही. शिक्षण हे शिलाशिवाय पवित्र होऊ शकत नाही. मनुष्याला या विश्वामध्ये काहीच साध्य करता येणार नाही. आयुष्यभर डॉ. आंबेडकर स्वतःला विद्यार्थी मानले. सतत वाचन आणि चिंतन करत समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेच्या कक्षा विस्तारीत ठेवल्या व्यक्तीगत स्थानापेक्षा समाजहिताला अधिक प्राधान्य द्यायला पाहिजे. मागासवर्गीय समाजातील अनेक लोकांनी आपल्या पाल्यांना शिक्षणाकरीता औरंगाबादला पाठवायचे तिथे मुलांना स्कॉलरशिप मिळायची हेतु हाच कर्ज हलाखीच्या परिस्थितीमुळे जी मुले शिक्षण घेऊ शकत नाही त्यांनी शिकून आपल्या कुटुंबाचा, समाजाचा व राष्ट्राचा विकास करावा डॉ. आंबेडकरांनी आपल्या अधिकाराने काही विद्यार्थ्यांना विदेशात पाठविले होते. "दलितांच्या, बहुजनांच्या सर्व सामाजिक दुखण्यावर उच्च शिक्षण हे एकमेव औषध आहे अशी डॉ. आंबेडकरांची धारणा होती." त्यांनी उच्च शिक्षणाकरीता १९४५ साली २० विद्यार्थ्यांना अमेरीका, इंग्लडला पाठविले होते. त्यांनी शिक्षणाच्या संदर्भात जे विचार मांडले आहेत अतिश्य दुरगामी स्वरूपाचे आहेत. डॉ. आंबेडकर लिहीतात "शिक्षण म्हणजे व्यक्तीचा मानसिक व बौध्दीक विकास घडवून आणणारे, सामाजिक गुलामगिरी नष्ट करण्याचे, आर्थिक विकास साधण्याचे व राजकीय स्वातंत्र्य मिळविण्याचे शस्त्र आहे." उच्च शिक्षण ही काही एकाच वर्गाची मिरासदारी नाही "ज्या ठिकाणी शाळा असेल तेथील लोकांनी मुला-मुलीस शिक्षण दिलेच पाहिजे."

**प्राथमिक शिक्षणाविषयक डॉ. आंबेडकरांचे विचार :**

"प्राथमिक शिक्षण हा राष्ट्रीय दृष्टीकोनातून अतिश्य महत्वाचा प्रश्न आहे. प्राथमिक शिक्षण सक्तीचे करावे. तसेच शिक्षणावर स्थानिक स्वशासन संस्थेपेक्षा प्रांतिक सरकारचा ताबा असने इष्ट व आवश्यक आहे असे त्यांचे मत होते."

"६ मे १९२९ रोजी महाबळेश्वर येथे मुंबई सरकारचे त्यावेळचे शिक्षणमंत्री नामदार मौलवी रफिउदीन अहमद यांनी प्राथमिक शिक्षणाच्या प्रसाराबाबत आस्था असणाऱ्या निरनिराळ्या जाती धर्माची व जिल्हयातील व्यक्तींची एक परिषद बोलविली होती त्या परीषदेला डॉ. आंबेडकर उपस्थित होते व त्या प्रसंगी ते म्हणाले "प्राथमिक शिक्षणाचा प्रश्न राष्ट्रीयदृष्ट्या अत्यंत महत्वाचा आहे. प्राथमिक शिक्षणाचा सार्वत्रिक प्रसार सर्वांगीण प्रगतीच्या इमारतीचा पाया आहे." डॉ. आंबेडकरांना असे वाटत होते की, प्राथमिक शिक्षण सक्तीचे केले तर ते मोफत ठेवण्याची आवश्यकता नाही. जे लोक फी देऊ शकताता त्यांच्याकडून घ्यावी व जे देऊ शकत नाही त्यांच्याकरीताच प्राथमिक शिक्षण हे मोफत स्वरूपात उपलब्ध करून द्यावे.

**उच्चशिक्षणाच्या संदर्भात डॉ. आंबेडकरांचा दृष्टीकोन :**

शिक्षणाच्या विषयी डॉ. आंबेडकर आपले विचार व्यक्त करीत असतांना ते स्पष्ट करतात की, विद्यार्थ्यांनी भाराभर ग्रंथ वाचून रस ग्रहण करण्याची शक्ती म्हणजे नवनवीन कल्पना सुचल्या पाहिजे. विद्यार्थ्यांनी स्वतःच्या आणि समाजाच्या उध्दाराकरीता अधिकाधिक लक्ष देणे अतिश्य महत्वाचे आहे. प्राध्यापकाने केवळ आपल्या भौतीक सुखाकडे अडकून न राहता त्याने स्वतःला समाजाच्या हिताकरीता वाहून जायला पाहिजे. शिक्षणाशिवाय आपणाला मोकयाच्या आणि महत्वाच्या जागा काबिज करता येणार नाही. पुरूषाप्रमाणेच स्त्रियांनाही शिकावे डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक दृष्टीकोनाचा प्रभाव असा पडला



Scanned with OKEN Scanner

की, बऱ्याच शैक्षणिक संस्था या देशात निर्माण झाल्यात त्यांच्यामध्ये जी विदवता होती त्या विदवतेला साऱ्या विश्वाने वंदन केले आहे. प्र. के. अत्रे म्हणतात डॉ. आंबेडकरासारखा प्रचंड बुध्दिचा, विव्दतेचा आणि कर्तृत्वाचा दुसरा एकही महाराष्ट्रीयन माणूस आज आम्हाला दिसत नाही. शिक्षण हे शिलाशिवाय पवीत्र होऊ शकत नाही. मुनष्याला या विश्वामध्ये काहीच साध्य करता येणार नाही. आयुष्यभर डॉ. आंबेडकरांनी स्वतःला विद्यार्थी मानले. सतत वाचन आणि चिंतन करीत समाज परीवर्तनाच्या प्रक्रियेच्या कक्षा विस्तारीत ठेवल्या व्यक्तीगत स्वार्थापेक्षा समाज हिताला अधिक प्राधान्य द्यायला पाहिजे.

**शिक्षणाचे सार्वत्रीकरण आणि डॉ. आंबेडकरांची भूमिका :**

शिक्षणाच्या सार्वत्रीकरणाच्या संदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात शिक्षणाचा खरा फायदा उच्चवर्णीयांनी घेतला आहे. परंतु बहिष्कृत वर्गातील विद्यार्थ्यांनी उदासीनता दाखविली आहे. कारण त्यांच्या घरातील आर्थिक परिस्थितीमुळे मुलांना शिकता आले नाही. हे जरी खरे असले तरी डॉ. आंबेडकरांना वाटते की ज्या आपल्या शरीराला योग्य आपल्या शरीराला योग्य आहार मिळाला नाही तर शरीर अल्पायुषी ठरते त्याचप्रमाणे मनुष्य जर शिकला नाही तर तो निरबुध्द बनून जीवंतपणीच दुसऱ्याचा गुलाम बनतो. अल्प आर्थिक उत्पन्नामुळे पालक शिकवित नाही परंतु स्वतःचा उधर करण्याकरीता ज्ञानाशिवाय दुसरे कोणतेच महत्वाचे साधन मनुष्यांजवळ नाही. आपल्या समस्या सोडविण्याकरीता आपल्यामध्ये क्षमता निर्माण करणे आवश्यक आहे. सतत प्रयत्नशील रहा एकदिवस निश्चितच मुक्ती मिळेल.

**शैक्षणिक संस्थाची स्थापणा व डॉ. आंबेडकर :**

डॉ. आंबेडकरांच्या शैक्षणिक कार्याचा आढावा घेतांना आपणाला असे दिसून येते की, त्यांनी विद्यार्थ्यांना प्राध्यापकांना व समाजाला शिक्षणाविषयीची जी तळमळ व व्यक्ती केली त्या तळमळीतूनच डॉ. आंबेडकरांनी शैक्षणिक संस्थाची निर्मिती केली व यामुळे सिध्दार्थ महाविद्यालय, मिलींद महाविद्यालय अश्या महाविद्यालयाची स्थापणा करण्यात आली. संशोधकाला मुंबईच्या प्रा. उल्हास गेडाम या अधिव्याखता सोबत पिपल्स एज्युकेशन सोसायटी विषयी चर्चा करतांना ही माहिती मिळाली की, या शैक्षणिक संस्थेच्या अंतर्गत २६ ते २८ महाविद्यालय कार्यरत आहेत. यामध्ये काही वैद्यकीय महाविद्यालयांचाही समावेश आहे. शिक्षणाची फळे हा मसजातील सर्व घटकांना मिळाली पाहीजेत १९२७ साली डॉ. आंबेडकरांनी सरकारच्या शैक्षणिक अर्थसंकल्पावर विचार व्यक्त करतांना म्हटले की शिक्षणाच्या बाबतीत सरकार फार उदासिन दिसते. सरकारने दलितांना विशेष सवलती द्याव्यात व त्यांना इतरांच्या बरोबरीने आणून शैक्षणिक समाता स्थापित करावी. शिक्षण हे प्रत्येक व्यक्ती पर्यंत पोहोचले पाहिजे त्या करीता शिक्षण हे महागडे करायला नको. समाजभिमुख शिक्षण असावे. कोणत्याही एका विशिष्ट घटकांचा प्रभाव नसावा विद्यापीठाने विद्यार्थ्यांच्या व्यक्तित्वाचा, मानसीक व बौध्दीक क्षमता कश्याप्रकारे विकसीत केल्या जाऊ शकतात याचा विचार करावा हाच दृष्टीकोन लक्षात घेऊन २० जून १९४६ ला पीपल्स एज्युकेशन सोसायटीची स्थापना करून त्या अंतर्गत मुंबईमध्ये सिध्दार्थ महाविद्यालय स्थापण केले. तसेच औरंगाबाद येथे १९५० मध्ये मिलींद महाविद्यालयाची स्थापना केली. त्यांनी मिलींद महाविद्यालयाची व संस्थेचे नाव हे इतिहासीक आधारावर का ठेवले असेल या वरून आपनाला त्यांच्या समाजविकासाचा दृष्टीकोन लक्षात येतो. तथागतांनी आपले आयुष्य मानवी मुल्ये न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुता याकरीता खर्च केली. बुध्दाच्या तत्वज्ञानाने प्रेरित होऊन डॉ. आंबेडकरांनी भारतीय घटनेमध्ये या मानवी मूल्यांचा समावेश केला आहे. त्यांनी आपल्या शैक्षणिक संस्थामधून विद्यार्थ्यांना अध्ययन प्रक्रियेवर अधिकधिक भर कश्याप्रमाणे देता येईल या विषयी त्यांनी नेहमीच प्रयत्न केला आहे.

**धर्मातर आणि आंबेडकर :**

जतीय व्यवस्थेच्या अनेक निर्बधामुळे कनिष्ठ समस्यांचा जाणाऱ्या जातींना शिक्षणाचा, बालण्याचा, रस्त्यावरून विशिष्टवेळीच चालण्याचा, विशिष्ट व्यवसाय करण्याचा इत्यादी प्रकारचे बंधने लादण्यात आली. त्याबरोबर काही सामाजिक व



Scanned with OKEN Scanner

धार्मिक बंधने सुध्दा त्यांच्या वरीती लादण्यात आली. एकंदरीत माणसाचे माणूसपण या जातीय व्यवस्थेने हरवीले डॉ. आंबेडकरांच्या दूरगामी शैक्षणिक विचाराने १४ ऑक्टोंबर १९५६ नागपूरच्या दिक्षाभूमीवर ५ लाख लोकांना बौध्द धम्माची शिक्षा दिली. नागपूर ला जे ऐतिहासीक धर्मांतर झाले त्या धर्मांतराच्या माध्यमातून मागासवर्गीयांना त्यांच्या हक्काची व अधिकाराची जाणीव झाली. डॉ. आंबेडकरांनी जेव्हा जेव्हा सभा संमेलनामध्ये मार्गदर्शन केले तेव्हा त्यांनी शैक्षणिक मागासले पण कशाप्रकारे दूर होईल व हा मागासवर्गीय या देशाचा शासनकर्ता कसा बनेल व जीवन जगतांना वैज्ञानिक दृष्टीकोन कशा प्रकारे बाळगेल या विषयी मार्गदर्शन केले असल्याचे आढळते. धर्मांतर, महाडचा सत्याग्रह, नाशिकचा काळाराम मंदिर इ. गोष्टीवरून डॉ. आंबेडकरांच्या शैक्षिणिक दृष्टिकोनाची उंची किती उंच होती हे आपणाला लक्षात येते. शिक्षणाच्या आधारावर बुध्दिवादी वर्गाची निर्मिती झाली पाहिजे. शिक्षित वर्गापेक्षा त्यांना बुध्दीवादी वर्गाला अधिक महत्वाचे मानले बुध्दीवाद्यांचा वर्गाने समाजाला विकासाच्या उंच मार्गावर न्यावे. बुध्दीवादी वर्गाच्या संदर्भात डॉ. आंबेडकर म्हणतात There is no exaggeration in saying that the entire destiny of country depends open its intellectual class if the intellectual class is honest independent & disinterested. It can be trusted to take the initiative and give a proper lead when a crisis arises.

### निष्कर्ष :

प्रस्तुत संशोधनात्मक लेखनातुन संशोधकाने डॉ. आंबेडकरांचा शैक्षणिक दृष्टीकोन या विषयाचा शोध घेतला असता असे लक्षात येते की, डॉ. आंबेडकरांच्या विचारांची उंची किती उंच आहे. त्यांच्या विचारामध्ये प्रगल्बता आहे. सतत वाचन, सतत समाज परीवर्तनाची कास, नेहमीच हातामध्ये पुस्तक हे एखादाच व्यक्ती करू शकतो यात काही शंका नाही. परंतु ज्या व्यक्तीला जातीव्यवस्थेने इतके छळले तरी पण न डगमगता डॉ. आंबेडकरांनी तितक्याच ताकदीने व परीवर्तनाच्या संदर्भात वेगवेगळ्या पैलुवरती अध्ययन केले. या पेक्षा शैक्षणिक दृष्टीकोण हा अतिश्य महत्वाचा सर्वांचे हित ज्या गोष्टीमध्ये जोपासला जाईल अशा अर्थांना डॉ. आंबेडकरांनी आपल्या ज्या आधारावर देशाचे भवितव्य टिकुन राहील व हा देश सशक्त राष्ट्र कशा पध्दतीने निर्माण होईल या विषयाचा त्यांनी आपल्या दृष्टीकोनाचा विचार केला असल्याचे जाणवते. व्यक्ती, समाज व देश या तिन्ही गोष्टी करीता प्रगतीच्या दिशेने वाटचाल करण्याकरीता डॉ. आंबेडकरांचे शिक्षणविषयक विचार अतिश्य महत्वाचे आहे असे दृष्टीस पडते.

### संदर्भ :

१) डॉ. डाहाट धनराज "धम्मचक्र प्रवर्तन दिन विशेषांक - २०१३ डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक विचार- पान क्र. ४७"
२) बनकर एम.एम. सम्राट "दैनिकवृत्तपत्र" दि. ८ जून २००५, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार पान क्र. ४
३) बनकर एम.एम. सम्राट "दैनिकवृत्तपत्र" दि. ४ जून २००५, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शैक्षणिक विचार पान क्र. ४
४) डॉ. कऱ्हाडे बी. एन. "भारतीय समाज प्रश्न आणि समस्या" पान क्र. ५५ पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर
५) डॉ. डाहाट धनराज "धम्मचक्र प्रवर्तन दिन विशेषांक" २०१३ पान क्र. ४९



Scanned with OKEN Scanner

# भारतीय स्वातंत्र्याची @ ७५ वर्षे



– संपादक –

**डॉ. अनंत आत्माराम रिंढे**

Scanned with OKEN Scanner

# भारतीय स्वातंत्र्याची @ ७५वर्षे

संपादक
डॉ. अनंत आ. रिंढे
इतिहास विभाग प्रमुख
यशवंत महाविद्यालय सेलू, जि. वर्धा

आधार नॅशनल पब्लिकेशन, अमरावती.



Scanned with OKEN Scanner

| | | |
|---|---|---|
| 11 | मा. सौ. सरीताताई गाखरे यांच्या क्रांतीकारी आरोग्य विषयक कार्याचे : ऐतिहासिक सिंहावलोकन प्रा.डॉ. तिर्थनंदन रामचंद्र बन्नगरे | 72 |
| 12 | स्वातंत्र्य आंदोलनातील क्रांतीकारी नेतृत्व पं.कानडे शास्त्री डॉ.नामदेव वामनराव ढाले | 78 |
| 13 | भारतीय स्वातंत्र्य चळवळ आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज डॉ. प्रशांत सूर्यवंशी | 89 |
| 14 | भारतीय स्वातंत्र आंदोलनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे योगदान प्रा. डॉ. प्रज्ञा कामडी | 96 |
| 15 | टिळकांचे स्वातंत्र्य आंदोलनातील राष्ट्रीय कार्य प्रा. डॉ. रफीक बा. शेख | 110 |
| 16 | भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील महिलांचे अनभिज्ञ योगदान डॉ. वैशाली मलवार-डूके | 113 |
| 17 | भारतीय स्वातंत्र्य आंदोलनात राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांचे साहित्यिक योगदान प्रा. प्रमोद नारायणे | 122 |
| 18 | भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये आदिवासी चळवळीचे योगदान प्रा.डॉ.कमलाकर पी. तागडे | 131 |
| 19 | विदर्भातील १९४२ चा क्रांतीलढा आणि राष्ट्रसंत तुकडोजी महाराज प्रा. डॉ. राजेन्द्र मुंढे | 137 |
| 20 | भारतीय स्वातंत्र चळवळ आणि महिलांची भूमिका प्रा.डॉ.गजानन नत्थुजी कळंबे | 142 |
| 21 | भारतीय स्वातंत्रचळवळ आणि सरदार भगतसिंग डॉ. सुनील श्री. बोरकर | 148 |
| 22 | आझाद हिंद सेना आणि भारतीय स्वातंत्र्य चळवळ : एक ऐतिहासिक अध्ययन डॉ. कैलाश फुलमाळी | 156 |




Scanned with OKEN Scanner

# भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये आदिवासी चळवळीचे योगदान

प्रा.डॉ.कमलाकर पी. तागडे
प्रमुख समाजशास्त्र विभाग
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर
मोबा. ९४२३६३४६५०
Email : kptagde123@gmail.com

---

**प्रस्तावना**

भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये आदिवासी चळवळीचे योगदान या शीर्षका अंतर्गत शोधकर्ता आपले विचार स्पष्ट करण्याचा प्रयत्न करतो आहे. आपल्या देशामध्ये १८१८ मध्ये ब्रिटिशांनी आपल्या राजवटीला सुरूवात केली. आदिवासी समाज हा भारतीय स्वातंत्र्य जनजीवनापासून फार अलिप्त असल्याचे दिसून येते. या समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण खूपच कमी आहे. ग्रामीण आणि नागरी समाजापेक्षा या आदिवासी समाजातील जनजीवन हे वेगळया स्वरूपाचे आहे. या देशाचा हा प्रथम समाज म्हणजे हा आदिवासी समाज होय. संपूर्ण भारतातील आदिवासी चळवळीची संख्या ३६ इतकी सांगितल्या जात होती. Anthropological Survey of India यांनी केलेल्या १९७६ च्या सर्वेक्षणानुसार ही आदिवासी चळवळीची संख्या सांगितली जाते. भारतीय स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये आदिवासी चळवळीचे जेव्हा आपण अध्ययन करतो तेव्हा असे लक्षात येते की, ब्रिटिशांनी भारतीय लोकांना जीवन जगतांना स्वतंत्रेचा श्वास घेता येत नसल्यामुळे तसेच अनेक बाबतीत ब्रिटिशांनी भारतीय लोकांना त्रस्त केले होते. त्यातच काही स्वार्थी लोक हे ब्रिटिशांना सहकार्य करीत होते. त्यांचे खरे रूप हे भारतीय समाजाला कळले नाही. परंतु आदिवासी समाजातील काही व्यक्तींनी आदिवासी इंग्रजांना शरण जायचे नाही म्हणून त्यांनी त्यांच्याशी संघर्ष करण्याचे ठरविले. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी श्रमिकांना, दुर्बल घटकातील लोकांना, आदिवासींना जाणीवपूर्वक अलिप्त ठेवल्याचे आढळून येते. इंग्रजांविरूध्द सर्वप्रथम शस्त्र जर कुणी



Scanned with OKEN Scanner

उचलले असतील तर तो समाज म्हणजे आदिवासी समाज होय. या आदिवासी समाजामध्ये ज्या चळवळी झाल्या त्या चळवळीचे स्वातंत्र्याच्या लढयामध्ये महत्वपूर्ण योगदान आहे. त्यांनी फार त्याग केला असल्याचे दिसून येते. परंतू इतिहासकारांनी ज्या प्रकारे लक्ष वेधायला पाहिजे त्या प्रकारे त्याची नोंद केल्या गेली नाही. संथाल व मुंडा या आदिवासींनी १८५५–५६ मध्ये ब्रिटिशांच्या राजवटी विरूध्द रक्त सांडविले असल्याचे दिसून येते. संथाल व मुंडाचे बंड मोडून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी आपली शक्ती, बळ पूर्ण ताकदीने उभे केले. आदिवासींच्या चळवळी हया त्यांना न्याय, हक्क व स्वातंत्र्य प्राप्त व्हावे याकरिता उभ्या करण्यात आल्या होत्या. देशाच्या स्वातंत्र्य लढण्यामध्ये आदिवासी चळवळीचे मोठे सहकार्य अनेक प्राणांची आहूती दिली आहे.

आदिवासी क्रांतीचे मेरूमनी शंकरशहा रघुनाथशहा यांनी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ उभी केली, तसेच शंकरशहा, क्रांतीवीर बाबुराव शेडमाके, उमेद वसावा, बिरसा भगवान मुंडा यासारख्या काही आदिवासी लोकांनी पूर्ण देशाला स्वातंत्र्य मिळालेच पाहिजे या दृष्टिकोनातून आपल्या चळवळी उभ्या केल्याउ व शेवटपर्यंत इंग्रजाविरूध्द लढत राहिले. या स्वातंत्र्य लढया दरम्यान अनेक आदिवासी लोकांना मरण पत्करावे लागले आहे. त्यांनी केलेल्या कार्याला व त्यालागा आपण स्मरण केले पाहिजे व नवीन पिढीला त्यांच्या चळवळीविषयी माहिती देणे महत्वाचे ठरते.

**देशाच्या स्वातंत्र्य लढयामध्ये आदिवासी चळवळीचे योगदान :**

जेव्हा जेव्हा या देशाच्या स्वातंत्र्याचे नाव घेतले जाईल तेव्हा तेव्हा आपणाला आदिवासी चळवळीचे नाव घ्यावेच लागेल. कारण की त्यांनी भारताला स्वातंत्र्य मिळविण्याकरिता जे योगदान दिले आहे त्या योगदानाला आपणाला विसरता येत नाही. अनेकांनी आपल्या प्राणांची आहूती दिली आहे. देशाच्या हिताकरिता वेळोवेळी त्यांनी जे सहकार्य केले आहे त्या सहकार्याला आपण सलाम केलाच पाहिजे. त्यांनी केलेल्या कार्याचा धावता आढावा संशोधकांनी येथे घेण्याचा अल्पसा प्रयत्न केला आहे. आदिवासी क्रांतीचे मेरूमणी शंकरशहा रघुनाथशहा यांनी भारतीय स्वातंत्र्याची चळवळ उभारली. शंकरशहानी आपल्या मुलाला इंग्रज सैन्यात भरती करून



Scanned with OKEN Scanner

स्वतः आदिवासी समाजाचे नेतृत्व करीत होता. रघुनाथशहा इंग्रजांविरूध्द गोंडी भाषेत वडिलांना समाचार कळवित होता. त्यांनी गोंडी भाषेत कविता लिहून आदिवासी समाजाचे मन जिंकून घेतले. या दोन बापलेकांना १८ सप्टेंबर १८५७ ला तोफेच्या तोंडावर बांधून त्यांना इंग्रजांनी उडवून दिले. सन १८५७ च्या स्वातंत्र्य लढयामध्ये गडचिरोली जिल्हयातील घोटचे वीर बाबूराव शेडमाके यांनी इंग्रजांविरूध्द उठाव करून स्वातंत्र्य चळवळ उभी केली. त्याबद्दल इंग्रजांनी २१ ऑक्टोबर १८५७ ला चंद्रपूरचा गोंड राजाचा किल्ला असलेल्या परिसरात पिंपळाच्या झाडाला लटकवून फाशी दिली. देशाच्या स्वातंत्र्य लढयाच्या चळवळीमध्ये हो, मुंडा, संथाल, भिल्ल, नागा इत्यादि जमातींनी आपले योगदान दिले असल्याचे देशाच्या इतिहासावरून याची साक्ष पटते.

उमेद वसावा या भिल्लाने सन १८७३ ते १८८२ या काळामध्ये राजपिपला स्टेटच्या पाचडोंगरी जिल्हयामध्ये आदिवासी चळवळ उभी केली. १८५७ च्या स्वातंत्र्य लढयात अनेक भिल्लांनी तात्या टोपेंना मदत केली असल्याचे आढळते. सन १८५७ मध्ये आदिवासींच्या शोषणाविरूध्द भगवान बिरसा मुंडा यांनी जी चळवळ उभी केली त्या चळवळीचे योगदान देशाच्या स्वातंत्र्य लढयात एक महत्वपूर्ण चळवळ ठरली. ब्रिटिशांच्या विरोधामध्ये बंड करणे हे साधे काम नव्हते. परंतू आदिवासींनी इंग्रजांच्या शोषणाविरूध्द, अन्यायाविरूध्द, अत्याचाराविरूध्द कशाचीही तमा न बाळगता आपले आंदोलन सुरू ठेवले. ओरिसातील कोहान या विभागामध्ये सन १८९१ मध्ये आदिवासींनी जी चळवळ उभी केली होती त्या चळवळीपुढे इंग्रजांना माघार घेऊन आदिवासींकरिता कायदेशीर संरक्षण देण्याचे नियम तयार करावे लागलेत. या देशातील स्वातंत्र्य लढयामध्ये अनेक आदिवासी चळवळीने आपले योगदान दिले आहे. त्यापैकी काही चळवळींचा येथे विशेष उल्लेख करण्याचा प्रयत्न केला आहे.

**१) संथालाची चळवळ :**

संथाल व मुंडा या आदिवासी जमातींनी ब्रिटिश वसाहतवादाविरूध्द संघर्ष केला असल्याचे दिसून येते. त्यांनी फार मोठया प्रमाणात विद्रोह करून ब्रिटिशांना विचार करायला भाग



Scanned with OKEN Scanner

पाडले. वेळोवेळी त्यांना आपल्या प्राणाची आहूती द्यावी लागली. ब्रिटिशांनी त्यांचे आंदोलन दडपण्याचा प्रयत्न केला, त्यामध्ये अनेक आदिवासींना आपला जीव गमवावा लागला. इस्ट इंडिया कंपनीने जमीनदारी पध्दती सुरू केली होती. शतकानुशतके जंगलामध्ये स्थायी वस्ती करून राहणाऱ्या आदिवासींना व जमीन करणाऱ्या आदिवासींना जमिनीवरून हटविण्याचे अधिकार ब्रिटिशांनी जमीनदारांना दिले. त्यांच्या विरोधात हा उठाव झाला होता. आदिवासी समाज जी जमीन अथवा शेतजमीन सामुदायिक पध्दतीने करायचा त्या जमिनी आदिवासींना व्यक्तिगत मालकीच्या म्हणून मिळायला पाहिजेत होत्या. व्यक्तिगत स्वामित्व देण्याच्या विरूध्द हया चळवळी निर्माण झाल्या होत्या. ब्रिटिशांची मालकी, शेती करणारे जमीनदार आणि जो समाज या देशाचा प्रथम निवासी आहे त्या समाजाला या जमिनीपासून वंचित करणे अशाप्रकारे त्यांचा डाव होता. त्यालाच आदिवासींनी विरोध म्हणून आपली चळवळ उभी केली. त्याचप्रमाणे आदिवासी समाजाचे शोषण करणारे व्यापारी, सावकार व दलाल यांच्या विरोधात आदिवासी समाजाने आपल्या चळवळी निर्माण केल्यात. आदिवासींनी केलेले बंड एवढे प्रचंड होते की, ब्रिटिश सरकार हादरून गेले होते. या चळवळीची नोंद श्रमिकांच्या आंदोलनाला जागतिक मोठे रूप प्राप्त करून देणारा विचारवंत कार्ल मार्क्स यांनी घेतली होती. ब्रिटिशांनी आदिवासींच्या वनसंपत्तीवरील पारंपारिक हक्क संपुष्टात आणल्याने अनेक प्रकारच्या समस्या आदिवासी समाजामध्ये निर्माण झाल्या होत्या.

**२) बोडो चळवळ :**

बोडो आदिवासींनी कछाट पहाडाच्या पठारी भागावरती आपले वास्तव्य स्थापित केले. त्यांची राजधानी गुवाहाटी येथे होती. त्यांना मैदानी भागामध्ये जाण्यास भाग पाडले. खरे तर असे दिसून येते की, ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये बोडो आंदोलन हे आपल्या वेगळ्या राज्यांची मागणीकरिता उभारल्या गेले होते. ही चळवळ १९२७ मध्ये जे कछाटी युवक सम्मेलनाद्वारे सायमन कमिशनसमोर उभी झाली. त्यांनी स्वतंत्र रेजिमेंट बनविण्याची मागणी केली. बोडो लँडच्या मागणीकरिता अखिल बोडो छात्र परिषदेची स्थापना करण्यात आली. बोडो भाषेला संविधानाच्या आठव्या अनुसूचित



Scanned with OKEN Scanner

काळामध्ये नागा, मिर्झा, लुशाई, मिशिपी, मुंडा, कोल, खैरनार, गोंड, तसेच १८३२ मध्ये संभालांनी इंग्रजांच्या कारवायांना कडाडून विरोध केला. देशाच्या स्वातंत्र्य लढयामध्ये आदिवासी चळवळीचे महत्वपूर्ण योगदान प्राप्त झाले आहे. या स्वातंत्र्य लढयामध्ये अनेक आदिवासींना आपले प्राण गमवावे लागले, त्यामुळे भारताचा स्वातंत्र्य लढयामध्ये आदिवासी चळवळीच्या योगदानाचे स्वरूप व्यापक आहे. त्यांच्या योगदानाला सलाम.

**संदर्भग्रंथ सूची :**


१) डॉ. कराडे, बी. एम., (२०११). सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र, पिंपळापूरे ॲण्ड कं. पब्लिशर्स, नागपूर.

२) खरात, शंकरराव, (२००६), सामाजिक चळवळीचा इतिहास, इंद्रायणी साहित्य, २७३, पुणे.

३) डॉ. वैद्य सुमन, डॉ. कोठेकर, शांता, (१९९४), आधुनिक भारताचा इतिहास, श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर–१०.

४) डॉ. बोबडे, प्रकाश (२००५), कोलाज (आर्थिक विकास व समाजिक चळवळी), श्री मंगेश प्रकाशन, नागपूर.

५) डॉ. काळदाते, सुधा (२००८), 'सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी'.




Scanned with OKEN Scanner

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766

AN INTERNATIONAL PEER REVIEWED & REFEREED JOURNAL

# SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE,2021, VOL- 10, ISSUE-57

**Special Issue of Department of Sociology, Lokmanya Mahavidyalaya Warora, Dist. Chandrapur (MS)**

Date: 26 June 2021

# TRIBAL SOCIETY

## IN CONTEMPORARY INDIA : ISSUES , PROBLEMS & REMEDIES

**Chief Editor**


**Dr. Subodh Kumar Singh**

Principal

**Editor**

**Dr. Shrinivas Pilgulwar**

Head, Dept of Sociology



Book-3

Scanned with OKEN Scanner

IMPACT FACTOR (SJIF) 2021= 7.380 ISSN 2319-4766

An International Peer Reviewed & Refereed Journal

SCHOLARLY RESEARCH JOURNAL FOR INTERDISCIPLINARY STUDIES

APRIL-JUNE, 2021, VOL- 10, ISSUE-57

## Index


| SR. NO. | AUTHOR NAME | PAGE.NO. |
|---|---|---|
| 101 | नांदेड जिल्हयातील भिल्ल जमातीच्या शैक्षणिक प्रगतीचे समाजशास्त्रीय अध्ययन<br>*डॉ. श्रीनिवास नरहरी पिलगुलवार* | 605-614 |
| 102 | वनविषयक कायदे व आदिवासी<br>*डॉ. डी. जी. म्हशाखेत्री* | 615-620 |
| 103 | समकालीन भारतातील आदिवासी चळवळी<br>*डॉ. नागसेन नामदेव मेश्राम* | 621-629 |
| 104 | आदिवासी समाजातील लिंगभाव असमानता आणि आरोग्य प्रश्न<br>*डॉ कविता दि. मुनेश्वर* | 630-633 |
| 105 | आदिवासी समाजातील सामाजिक आंदोलने व परिवर्तन<br>*प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे* | 634-642 |
| 106 | आदिवासी समाजातील बालकामगारांच्या समस्यांचे समाजशास्त्रीय अध्ययन (विशेष संदर्भ : गडचिरोली जिल्ह्यातील आरमोरी तालुका)<br>*प्रा. डॉ. गजेंद्र माणिकराव कढव* | 643-650 |
| 107 | आदिवासींच्या विकासासाठी शासनाचे प्रयत्न<br>*प्रा. डॉ. दिपक एम. सुखदेवे* | 651-656 |
| 108 | आदिवासींची सामाजिक संरचना : प्रश्न आणि उपाय<br>*डॉ चंद्रकांत ध. कांबळे* | 657-666 |
| 109 | आदिवासी समाजातील स्त्रियांच्या आरोग्याची समस्या<br>*डॉ विलास चव्हाण* | 667-670 |
| 110 | आदिवासी स्त्री समस्या<br>*प्रा. रीता द. वाळके* | 671-673 |
| 111 | आदिवासींचे कुपोषण – एक समाजशास्त्रीय अध्ययन<br>*प्रा. डॉ. रविंद्र विठोबा विखार* | 674-680 |


Scanned with OKEN Scanner

Scholarly Research Journal For Interdisciplinary Studies SJIF2021=7.380 ISSN 2319-4766

# आदिवासी समाजातील सामाजिक आंदोलने व परिवर्तन

**प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे**

*प्रमुख समाजशास्त्र विभाग, डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस. कॉलेज, नागपूर*

*मोबा. ९४२३६३४६५० Email : kptagde123@gmail.com*

## गोषवारा

*बौध्दीक क्षमता असलेला मानव जेव्हा परिवर्तनाच्या कक्षामध्ये डोकावून बघतो. तेव्हा त्याच्या वाटयाला संघर्षच आलेला असतो. त्याच्या जिवनातील परिवर्तनाची पहाट ही संघर्षाची बिजे पेरूनच आलेली आहे. हे सुर्यप्रकाशाइतके स्पष्ट आहे. मानवी समाजाच्या परिवर्तनाची भ्रमंती अवस्था संपल्यानंतर तो कुठेतरी स्थिर होऊ लागला. याच अवस्थेमधून शेतीचा शोध लागल्यानंतर मानवाच्या जिवनाला थोडी स्थिरता लाभली. तो आजूबाजूच्या क्षेत्रामध्ये स्थिर होऊ लागला. या मानवी समाजामध्ये आदीवासी समाज हा एक महत्वाचा घटक आहे. भारतीय समाज या संकल्पनांचा जेव्हा आपण अध्ययन करतो तेव्हा आदिवासी समाजाचा अभ्यास केल्याशिवाय पूर्णत्वाय जाऊ शकत नाही. वरील विषयान्वये संशोधनकर्त्यांनि संशोधन केले असता आदिवासी समाजातील आंदोलनाच्या माध्यमातून प्रगत समाजासमोर त्या समाजाची वास्तविकता दिसून येते. या विश्वातील सर्वच देशामध्ये आदिवासी जमातीचे आपणाला अस्तित्व दिसून येते. जेव्हा आपण आदिवासींच्या आंदोलनांचा विचार करतो तेव्हा आपणाला असे दिसून येते की, या जमातीवरती प्रत्यक्ष, अप्रत्यक्षपणे अन्याय, अत्याचार, शोषण केले गेले. त्यांच्यावरती विविध पध्दतीने निर्बंध लादलीत. त्यांना शिक्षा, दंड देण्यात आले. स्वातंत्र्यापूर्व व स्वातंत्र्यानंतरही आदिवासी समाजावरती अन्याय, अत्याचार हे सावकार, महाजन, ब्रिटिश शासन, भारतीय शासन, पोलीस, ठेकेदार इत्यादिकडून करण्यात आले. विशेष म्हणजे जो समाज युगांयुगे जंगल, पहाडामध्ये, दुर्गम अशा क्षेत्रामध्ये शांतताप्रिय, समाधानकारक व कुणाचेही कसल्याही प्रकारे शोषण न करता आपले जीवन जगत आलेला आहे. परंतू जेव्हा या समाजाचा जगण्याचा अधिकार नाकारण्याचा प्रयत्न ब्रिटिशकालीन काळामध्ये करण्यात आल्यामुळे, एकंदरीत आदिवासी समाजाला वन्यामधून संपवायचे असे ब्रिटिश शासनाचे धोरण हे अध्ययनातून संशोधनकर्त्याला दृष्टिस पडले. त्यामुळे आदिवासी समाजाने आपले अस्तित्व टिकविण्याच्या दृष्टिकोनातून व अन्याय अत्याचाराचा विरोध करण्याकरिता आदिवासी समाजाने संघटीतपणे क्षेत्रावार आंदोलने केलीत . त्या विरोधात आदिवासी चळवळी उभ्या राहिल्यात. या आंदोलनामध्ये झारखंड आंदोलन, बोडो आंदोलन, संथाल आंदोलन, बिरसा मुंडाचे आंदोलन, भिलांचे आंदोलन आदि विविध प्रांतात आंदोलने इंग्रजांच्या विरोधात निर्माण झालीत व स्वातंत्र्यानंतर भारतीय शासनाच्या अंतर्गत काही शासकीय कर्मचारी व प्रगत समाजातील सावकार, महाजन, ठेकेदार आदि लोकांनी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेऊन शोषण केल्यामुळे आजही आदिवासी समाजामध्ये आंदोलनाचे अस्तित्व दिसून येते. स्वातंत्र्यानंतर काही आदिवासी नेत्यांनी व काही प्रगत समाजातील लोकांनी आंदोलने निर्माण करून आदिवासी समाजाला न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आला.*

***मुख्य शब्द*** *– आदिवासी समाज, आदिवासी आंदोलन, झारखंड आंदोलन, बिरसा मुंडा आंदोलन, शेतकरी आदिवासी*

## प्रस्तावना

सामाजिक आंदालनाचा संबंध हा परिवर्तनाशी आहे. वास्तविकपणे मनुष्या हा निसर्गाची निर्मिती आहे. प्रत्येक माणसाने दुसऱ्या माणसाशी मैत्रीच्या भावनेने वागावे. परंतु बौध्दीक क्षमता व संपदा असणारा माणूस जेव्हा स्वार्थी होतो. तेव्हा तो इतरांचे अधिकार नाकारून दुसऱ्यांना गौण समजतो. आदिवासी समाजाच्या बाबतीतही असेच झाले. ब्रिटिश अधिकारी, ख्रिश्चन धर्मप्रसारक, सावकार, महाजन व काही स्वार्थी नेते आदिंनी आदिवासींच्या अज्ञानाचा फायदा घेतला व त्यांना स्वाभिमानाचे व चांगल्या प्रकारचे जीवन जगण्यापासून दूर लोटले. या राष्ट्राच्या विकासामध्ये आदिवासी चळवळीचे फार मोठे योगदान आहे. बिरसामुंडा नावाचा परिचय व त्यांनी केलेले आंदोलन हे सर्वश्रुत आहे. संथाल, भिल्ल, हो, नागा, मिझो इत्यादी आदिवासींनी राष्ट्राच्या विकासामध्ये योगदान दिले आहे. तरी पण राष्ट्रीय चळवळीने आदिवासी समाजाचया योगदानाची पाहिजे त्या प्रमाणामध्ये दखल घेतल्या गेली नाही. देशाच्या



Scanned with OKEN Scanner

इतिहासामध्ये आदिवासी समाजाकडे दूर्लक्ष केले गेले. वास्तविकपणे इंग्रजांच्या विरोधात सर्वात प्रथम आदिवासींनी शस्त्र उचलले व स्वातंत्र्याच्या चळवळीमध्ये आदिवासींनी फार मोठा त्याग केला आहे. परंतू काही इतिहासकार याकडे दूर्लक्ष करतात.

संथाल व मुंडा आदिवासींनी १८५५–५६ साली ब्रिटिश व साहतवादाच्या विरोधामध्ये रक्त सांडले होते. संथाल व मुंडाचे बंड मोडून टाकण्यासाठी ब्रिटिशांनी आपले सर्व शक्ति पणाला लावली व यामध्ये कित्येक संथालांचा बळी गेला. आदिवासी चळवळीच्या संदर्भात संशोधनकर्त्याला या सर्व गोष्टींची माहिती प्राप्त झाली. ब्रिटिशांविरोधामध्ये दंड ठोकणे हे साधे काम नव्हते. अन्याय व पिळवणूक आदिवासी समाजाची फार मोठया प्रमाणामध्ये होत होती.

प्रचंड असंतोषाने पेटलेल्या संथालानी १८५५ मध्ये सरकारी नोकर, जमीनदार, सावकार व ब्रिटिश सरकार यांच्या विरोधात लढा उभा केला. आदिवासींच्या या बंडाने काही काळ ब्रिटिश सरकार हादरून गेले होते. या बंडाची नोंद कार्ल मार्क्सनी घेतली होती. रविन्द्रनाथ टागोरांनी या संथाल आदिवासींची स्तुती केली.

**संशोधनाचे उद्दिष्टये**

आदिवासी समाजातील सामाजिककर्त्यांने काही उद्दिष्टये लक्षात घेतली आहे, ही उद्दिष्टये खालीलप्रमाणे –

- आदिवासी आंदोलनाचा परिचय करणे.
- आदिवासी आंदोलनाच्या कारणांचा शोध घेणे.
- आदिवासी समाजातील आंदोलनाचा प्रभाव सांगणे.

**अध्ययनाचे महत्व**

संशोधनकर्त्याने आदिवासींच्या राज्या–राज्यामध्ये झालेल्या चळवळीविषयक माहितीचा शोध घेऊन आदिवासी आंदोलनाला राष्ट्रीय स्तरावरती कशा प्रकारचे महत्व प्राप्त होऊ शकते याचा शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला. देशाच्या विकासामध्ये आदिवासी चळवळींचा फार मोठा सहभाग राहिला आहे. नवीन पिढीला आदिवासी चळवळींच्या राष्ट्रीय कार्यांचा परिचय व आदिवासी समाजाचे शोषण करणारे शासनाचे धोरण यांचा परिचय करण्याचा दृष्टिकोनातून प्रस्तुत शोध निबंधाचे अध्ययन महत्वाचे आहे.

**अध्ययन पध्दती**

प्रस्तुत शोध निबंध हा गुणात्मक पध्दतीच्या आधारे रेखांकित करण्यात आलेला आहे.

**तथ्याचे संकलन**

शोधकर्त्याने या शोध निबंधाचे अध्ययन करतांना द्वितीय स्नाताचा उपयोग केला आहे.

**साहित्य समीक्षा**

डॉ. ए. आर. देसाई यांनी "Pesant Struggle in India" या ग्रंथामध्ये भारतातील चळवळीच्या विविध पैलूंचा अभ्यास केला असल्याचे दिसून येते.

**कामगार चळवळ** – संपादक प्रदिप गायकवाड यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांची भाषणे व लेख याचे संकलन केले असून या ग्रंथामध्ये श्रमिकांच्या श्रमाविषयी व वेठबिगारी, शासकीय उपाययोजनांच्या संदर्भात विवेचन केले असल्याचे आढळते.



Scanned with OKEN Scanner

**द. ना. धनागरे** – Pesant Movement in India. या ग्रंथामध्ये भारतातील चळवळींचा अभ्यास करून त्या चळवळीच्या विविध पैलूवर ते अध्ययन केले असल्याचे आढळते.

**Rao M. S. -** Social Movement in India या ग्रंथामध्ये भारतीय समाजातील विविध चळवळींचा अभ्यास केला असल्याचे आढळते.

**Singh K. S. -** Tribal Movement in India या ग्रंथामध्ये त्यांनी आदिवासी समाजातील चळवळींचा व चळवळींच्या कारणांचा शोध घेतला असल्याचे दिसून येते.

**डॉ. एस. जी. देवगावकर** – समाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन या ग्रंथामध्ये भारतातील विविध भागात निर्माण झालेल्या चळवळींचा अभ्यास कला असल्याचे दिसून येते.

**घनशाम शाह** – "भारतीय सामाजिक आंदोलन" या ग्रंथामध्ये त्यांनी या राष्ट्रातील उदयास आलेल्या सर्व समाजातील आंदोलनांचा अभ्यास केला असल्याचे आढळते.

ईस्ट इंडिया कंपनीच्या शासन काळापासून १९४७ पर्यंतच्या अर्थात सुमारे २०० वर्षांच्या कालखंडातील काही प्रमुख चळवळींचा परिचय खालील प्रमाणे सांगता येईल. आदिवासी समुदायातील हिंसक आंदोलनामध्ये झारखंड आणि बोडो या दोन आंदोलनाचा प्रामुख्याने उल्लेख करावा लागेल. या आदिवासींच्या प्रमुख आंदोलनामध्ये बिरसा मुंडा आंदोलन, संथाल आंदोलन, नागा आंदोलन या आंदोलनांना एक विशेष महत्त्व प्राप्त झाले. खालीलप्रमाणे या आंदोलनांना संक्षिप्त रूपामध्ये समजून घेऊ या.

**झारखंड चळवळ**

इ.स. १९५० मध्ये जमशेदपूर येथे झालेल्या अधिवेशनात झारखंड पार्टीची स्थापना झाली. तेव्हा त्यांचे नेते जयपाल सिंह होते." या झारखंड पार्टीला १९५२ च्या निवडणुकीमध्ये ३२ जागांवरती विजय प्राप्त झाला होता. परंतु इ.स. १९६२ मध्ये जयपालसिंह यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश केल्यामुळे त्यांच्या नेतृत्वामध्ये वेगवेगळे प्रश्नचिन्ह निर्माण झाले. एकत्रित आलेले मुंडा, हो, संथाल या आदिवासींनी आपआपले वेगवेगळे नेते निर्माण केले. इ.स. १९६८ मध्ये बिरसा सेवादलाने झारखंडची मागणी केली. जे सावकार व महाजन आदिवासी सहत असलेल्या प्रदेशातील भूमी बळकविण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांच्या विरोधामध्ये बिरसा आंदोलन अधिक सक्रिय झाले होते शिबू सोरेन यांनी इ.स. १९७३ मध्ये झारखंड मुक्ती मोर्चाची स्थापना केली. या आंदोलनाचा प्रमुख उद्देश म्हणजे आदिवासी समाजाचे शोषण करणाऱ्यांना बाहेर हाकलण्यासाठी हे आंदोलन करण्यात आले. आदिवासी समाज हा भूमी व जंगलाच्या बाबतीत निष्कासित झाल्याबद्दल, रोजगार व प्रशिक्षणापासून वंचित ठेवल्याबद्दल तसेच सांस्कृतिक सम्मीश्रण व असंकलीत विकास इत्यादिमुळे या आंदोलनामध्ये प्रमुख होते. "झारखंड निवासियांचे मुख्य लक्ष हे होते की, आर्थिक, सामाजिक, राजकीय व्यवस्थेमध्ये बदल करून सामाजिक उन्नती करणे." झारखंडची आदिवासी जमात इतकी जागरूक होती की, सामान्य जनजातींपेक्षा वेगळे दिसत होते. त्यांना असा विश्वास होता की, राजकीय आंदोलनाशिवाय त्यांना काहीही प्राप्त होऊ शकत नाही.

**संथालांचे आंदोलन**

जंगलामध्ये वस्ती करून शतकानुशतके आपला उदरनिर्वाह करण्यासाठी शेती करणाऱ्या आदिवासींना ब्रिटिशांनी त्या जमिनीवरून हटविण्याचे अधिकार जमीनदारांना दिल्यामुळे संथाल आदिवासींनी हे आंदोलन केले.

संथालांचे आंदोलन हे भारतातील कृषी करणाऱ्यांचे पहिले आंदोलन आहे. हे आंदोलन १८५५ मध्ये करण्यात आले. या आंदोलनाचा मुख्य उद्देश हा होता की, शोषकांच्या विरूध्द संघटीतपणे लढणे या उठावाचे नेतृत्व सीधु, कान्हु हे दोन बंधू करीत होते. या आंदोलनामागे अशी एक पार्श्वभूमी दिसून येते की, काही संथाल हे भूमिहीन होते. तर काही संथाल हे शेती करीत होते. संथाल लोक झूम प्रकारची शेती करायचे. पण इंग्रजांनी जंगल जमिनीची निगराणी कडक केल्याने हे लोक जमिनीवरून वंचित झाले. जमिनदार लोक संथाल लोकांवर अन्याय, अत्याचार करायचे. येथे वेठबिगाराची प्रथाही दिसून येत होती. महाजनांच्या शेतात संथाल लोक काम करूनही मजूरी देत नसत. डिंकूनी अनेक संभालांचे शोषण केले होते. सावकार लोक हे संथालांना कर्ज देत असत व व्याजाच्या नावाने आर्थिक शोषण करीत असत. रेल्वेच्या कामावरती युरोपियन ठेकेदार संथालांना फार अल्प मजूरी देत असत. शोषकाविरूध्द तक्रार केल्यानंतरही वसाहतीचे शासन (ब्रिटिश) त्याकडे लक्ष देत नव्हते. "भागलपूर व राजमहाल येथील रेल्वे व डाक संपर्क हा संथाल लोकांनी पूर्णपणे बंद केला. ढोलाच्या आवाजावरती १०,००० (दहा हजार) संथाल एकत्रित व्हायचे"

संथालांनी आपला दबदबा निर्माण केल्यामुळे महाजन, जमीनदार व सावकारांचे दमन झाले. १ ऑगस्ट १८५५ मध्ये संथाल व ब्रिटिशांमध्ये तुंबक लढाई झाली व या लढाईमध्ये ५०,००० संथाल मारल्या गेले. ब्रिटिशांनी संथाल नेत्यांना कैदेत टाकले व संथालाचा पराभव झाला. परंतू नंतर इंग्रजांनी आपले धोरण बदलले. "प्रे. वी. एस. उपाध्याय आणि डॉ. जी. पांडे यांनी संथालांच्या आर्थिक सामाजिक परिस्थितीचे वर्णन करतांना म्हणतात की, महाजन लोकांची शोषण करणारी वृत्ती तसेच शोषण करणाऱ्या इतरही बाबीमुळे संथाल आंदोलन प्रोत्साहित झाले." या संथाल आंदोलनामध्ये आपल्याला हे दिसून येते की, या आदिवासी समाजाने कोणत्याही जाती–जमातीच्या लोकांवरती अन्याय केला नसला तरी या जमातीवर ब्रिटिश, महाजन, पोलीस कमिश्नर इत्यादि लोकांनी त्यांच्यावर अन्याय केले असल्याचे आढळते, इंग्रज अधिकाऱ्यांनी तर माणुसकील किळस येईल अश काही घटना घडविल्या. "इंग्रज ठेकेदारांनी तीन महिला श्रमिकांचे अपहरण करून त्यांच्यासोबत दुष्कर्म केले. त्यामुळे संथालांनी या घटनेला विरोध करण्यासाठी इंग्रजावरती आक्रमण करून तीन इंग्रजांना यमसदनी धाडले व अपहरण करणाऱ्या महिलांची सुटका केली."

**बिरसा मुंडा आंदोलन**

हे आंदोलन बिरसा मुंडा यांच्या नावाने ओळखण्याचे प्रमुख कारण म्हणजे बिरसाला लोक भगवान मानायचे व बिरसाने ज्या पध्दतीने ब्रिटिशांना तसेच महाजन, सावकार, बाहेरील लोक यांच्या विरोधात ज्या पध्दतीने संघर्ष केला तो संघर्ष साध्या स्वरूपाचा नव्हता. बिरसा मुंडाला संपूर्ण मुंडा लोकांचे अधिकाराचे अस्तित्व टिकवायचे होते. बिरसा लोक आपल्या पोटाकरिता जंगलातील जमीन करायचे. या जमिनीवर ब्रिटिश, महाजन, सावकार व बाहेरील काही व्यक्ती आपले अधिकार सांगून त्यांना निराश्रीत करीत होते. तसेच त्यांच्यावर अन्याय, अत्याचार करीत रहायचे. १८९५ मध्ये बिरसाने अपल्या अनुयायासोबत संकल्प केला की, आपला भूतकाळ आपण वापस मिळवायचा. आपला भूतकाळ हा स्वर्णयुग होता. जिथे मुंडा लोक हे चांगल्या पध्दतीने व स्वाभीमानाने जीवन जगत होते. प्रामाणिकपणाने जीवन जगत होते. वृक्षांची लागवड, बागांची लागवड, नैसर्गिक झरनांना नियंत्रित करायचे व आपला उदरनिर्वाह कुणाचेही शोषण न करता करायचे. इंग्रजांच्या धोरणामुळे हासमाज अतिशय त्रस्त झाला होता. तसेच महाजन, खिश्चन मिशनरी, हिंदू भूस्वामी हया सर्वांना बाहेर काढून बिरसाच्या नेतृत्वामध्ये मुंडा राज निर्माण करायचे होते. बिरसाने आपले आंदोलन अन्याय, अत्याचाराच्या विरोधात अधिक तीव्र केल्याने इंग्रजांनी १८९५ मध्ये अटक करून २ वर्षे शिक्षा सुनावली. बिरसा मुंडा कारागृहातून सुटून आल्यानंतर त्यांनी आपले आंदोलन परत सक्रिय करून जमीनदार, महाजन यांच्या विरोधात रणशिंग फुंकले. मिशनऱ्यांच्याही विरोधात चर्चेवरती हल्ले करण्यात आले. बिरसाने या आंदोलनामधुन हे सिध्द केले की, आदिवासी लोक आपल्या अस्तित्वाची लढाई लढण्याकरिता सक्षम आहेत.



Scanned with OKEN Scanner

**शेतकरी आणि आदिवासींचे संयुक्त आंदोलन**

राजस्थान क्षेत्रातील मेवाडा भागामध्ये शेतकरी आणि आदिवासींचे संयुक्तपणे शोषण आणि अत्याचार पिढयानूपिढया सुरू होते. श्री. मोतीलाल तेजावत यांच्या नेतृत्वामध्ये हे आंदोलन उभे राहिले. शेतकरी आणि आदिवासींमध्ये जहागिरदारांच्या प्रशासनाविरूध्द असंतोष वाढत होता. 'इ.स. १९२१ मध्ये श्री. मोतीलाल तेजावत यांच्या नेतृत्वामध्ये चितोडगड येथे सुमारे १ लाख शेतकरी आणि आदिवासींचा मेळावा घेतला.'' या आंदोलनामध्ये अवाजवी कर, लादलेले कर, अर्ध–बटाई व वेठबिगारी पध्दत या गोष्टींच्या विरोधामध्ये आवाज उठविला. बदगणा या गावामध्ये जेव्हा दुसरा मेळावा आयोजित करण्यात आला तेव्हा सातशे भिल्ल आदिवासी आणि शेतकरी एकत्रित आले व त्यांनी या आंदोलनाला बिनशर्त पाठिंबा घोषित केला. हा समाज केवळ वन संपत्तीचाच आधार घेऊन आपले जनजीवन जगत असतो. ब्रिटिश काळात त्यांच्यावर विविध प्रकारचे कर लादून त्यांना त्रस्त करण्याचा प्रयत्न केला. आदिवासींच्या परंपरागत पंचायतीचा अधिकार समाप्त करणे, मिठाच्या किंमतीत वाढ, शिकारवरती प्रतिबंध घालणे अशा प्रकारचे अनेक बंधने आदिवासी समाजावरती ब्रिटिश प्रशासनाने लावले असल्याचे दिसून येते.

आदिवासी समुदायाने ब्रिटिश प्रशासनाला न जुमानता संघर्ष केला व त्यांच्याशी काही गोष्टींच्या संदर्भात करार करून आपले अस्तित्व अबाधित राखले. या आंदोलनामुळे आदिवासी समाजाला बेगार कार्यातून सूट मिळाली.

ब्रिटिशांच्या काळामध्ये मध्यप्रदेश येथील बस्तर भागातील आदिवासींनी स्वायत्त राज्य मिळावे म्हणून इ.स. १९१० मध्ये चळवळ उभी केली पण ती असफल ठरली.

महात्मा ज्योतिबा फुले यांच्या सत्यशोधक चळवळीचा प्रभाव ग्रामीण भागामध्ये इ.स. १९२० ते १९३० च्या सुमारास आढळून येत होता. उंबरे पाटील यांनी सत्यशोधक चळवळीचे वारे आदिवासी भागातही पसरविले. आदिवासींनी आपली धार्मिक कृत्य हे सत्यशोधक समाजाने सांगितल्याप्रमाणे करावीत असे ठरविण्यात आले.

**देवी चळवळ**

ही चळवळ महाराष्ट्र आणि गुजरात येथील आदिवासी जमातीमध्ये १९२२ मध्ये सुरू झाली. काही महिलांच्या अंगामध्ये देवी आल्याचे आढळले व देवीने त्या स्त्रियांना मांसाहार बंद करा, दारू पिऊ नका असे आदिवासींना सांगितले असल्याचे वाचणातून दिसून येते. आदिवासींनी पारशी लोकांच्या घरी कामे बंद केले कारण ते पारशी लोक मांसाहार व दारूही पीत असत. देवीच्या आदेशाचे पालन केले नाही तर कोप होऊन मृत्यूही होऊ शकतो. अशा प्रकारचा समज या जमातीमध्ये पसरला गेला.

**भगत चळवळ**

विसाव्या शतकातील एक सुधारणावादी महत्वाचे आंदोलन गोविन्द गिरी यांचे भगत आंदोलन होय. गोविन्द गिरी हे गोसावी जातीचे व भटक्या जमातीचे होते. डूंगपूरच्या दुष्काळामध्ये त्यांचे पूर्ण कुटुंब मृत्युमुखी पडल्यामुळे त्यांनी भिल्ल जमातीच्या उध्दाराचे कार्य स्वीकारले. 'भिल्ल' राज स्थापन करण्याची मागणी त्यांनी या आंदोलनामधून केली. त्यांनी ख्रिश्चन मिशनऱ्याविरूध्द आवाज उठवून धर्म परिवर्तन थांबविले. शैव पंथाचा प्रचार करून पशुपक्षांवर दया करण्याचा उपदेश केला. गरजे पुरतीच कमाई, सत्य बोलणे, ईश्वर पूजा करणे, मूर्ति पूजेला विरोध करणे, इत्यादी तत्वांचा त्यांनी उपदेश या आंदोलनाच्या माध्यमातून केला असल्याचे आढळून येते. अशा प्रकारची दुसरे एक आंदोलन आपणाला इ.स. १९३० मध्ये धुळे जिल्हयात 'गुल्या महाराज' यांच्या नेतृत्वामध्ये दिसून येते. ते स्वतः आदिवासी असून वारकरी संप्रदायातील संत होते. त्यांनी मांसाहार न करणे व त्यांनी दारू न पिणे असा प्रचार केला.



Scanned with OKEN Scanner

**स्वातंत्र्योत्तर कालखंडातील आदिवासी चळवळी**

स्वातंत्र्योत्तर काळामध्ये झालेल्या आदिवासी आंदोलनाची क्रमवारी सांगणे कठीण आहे. तरी पण ही आंदोलने ऐतिहासिक ठरली. त्यांच्या कार्यांचा आलेख हा खालीलप्रमाणे दिसून येतो.

**आदिवासी राज्याच्या निर्मिती संदर्भात चळवळी**

दुसऱ्या महायुध्दाला जेव्हा प्रारंभ झाला तेव्हा मध्य भारतातील गोंड व भिल्ल जमातींनी राजकीय स्वायत्ततेची मागणी केली होती. विदर्भ, रीवा, छत्तीसगढ, तेलंगणा या क्षेत्रामध्ये 'गोंड' जमातीच्या वस्त्या आहेत. गोंड राज्याच्या निर्मितीकरिता आदिवासींनी आपल्या संघटना स्थापन केल्यात. परंतू पाहिजे तसे यश हया चळवळींना आले नाही. स्वातंत्र्यानंतर ईशान्य भारतात आदिवासी राज्याच्या निर्मितीकरिता आदिवासी चळवळी निर्माण झाल्या. डॉ. पीझो, नागा आदिवासी नेते हयांना १९४७ मध्येच भारताप्रमाणे एक स्वतंत्र व सार्वभौम नागालँड राष्ट्र—राज्य निर्माण करायचे होते. परंतू त्यांच्या प्रयत्नांना यश आले नाही. नागा आदिवासींनी आपली चळवळ सुरूच ठेवली व आसामच्या गव्हर्नरला वाटाघाटी करावयास भाग पाडले.

लाल डेंगाच्या नेतृत्वाखाली मिझो आदिवासींनी स्वतंत्र व सार्वभौम राज्य निर्माण करण्यासाठी चळवळ सुरू केली. मिझो नेत्यांनी भारत सरकारशी बोलणी व वाटाघाटी करून मिझोराम प्रदेशाला संघराज्यातील केंद्रशासित प्रदेश असा दर्जा देण्याच्या अटीवर युध्दबंदी मान्य केली.

**जंगल व जमिनीशी संबंधीत चळवळी**

आदिवासी जमातीतील काही नेतृत्वांनी जंगलातील वनसंपत्तीवर मालकीहक्क असणे किंवा वनसंपत्ती गोळा करण्याच्या संदर्भात आदिवासींना मिळणे ही आदिवासींची मागणी २५० वर्षापासूनची आहे. या मागणीसाठी त्यांनी स्वातंत्र्यपूर्व काळात अनेक आंदोलने केलीत. आजही आदीवासी समाजातील नेते हे जमिनधारणा हक्क सुधारणा करण्याची मागणी करीत आहेत. जमीन सुधारणा हा नक्षलवादी चळवळीच्या उदयासाठी आणि त्या चळवळीच्या सातत्याकरिता महत्वपूर्ण ठरणारा एक घटक आहे. १९६७ मध्ये अंबरसिंह सूरतवंती या सर्वोदयी विचाराच्या कार्यकर्त्याने आदिवासींना संघटित करून जमिनीचे हक्क परत मिळविण्यासाठी आंदोलन सुरू केले होते. शेवटी महाराष्ट्र शासनाने १९७५ मध्ये एक अध्यादेश काढून आदिवासींच्या शेतजमिनी गैरआदिवासी लोकांना हस्तांतरीत होण्याच्या प्रक्रियेवर बंदी लागली. १९४० नंतरच्या काळामध्ये आदिवासींच्या नेते आणि समाजामध्ये जागृती झाल्याचे दिसून येते. विशेष म्हणजे मध्यप्रदेशच्या बस्तर भागातील गोंड आदिवासी जमिनीच्या हक्काविषयी जागृत झाल्याचे दिसून येते. स्वातंत्र्योतर काळामध्ये आदिवासी समाजाने जमिनी व जंगलावरील हक्कांसाठी अनेक आंदोलने केलेली आहेत. १९६७ च्या आंदोलनामध्ये प्रविणचंद्र भजदेव यांच्या नेतृत्वामध्ये झालेल्या आदिवासींनी पोलीस दलावर बाणांचा वर्षाव केला होता. या आंदोलनामध्ये पोलीस दलापेक्षा आदिवासीच लोक जास्त प्रमाणात शहीद झाले होते.

स्वातंत्र्योतर काळामध्ये महाराष्ट्रामध्ये आदिवासी क्षेत्रामध्ये ज्या चळवळी उदयास आल्यात त्यांची आपणाला प्रमुख तीन कारणे दिसून येतात.

- आदिवासींना जमीन हक्क मिळण्याकरिता.
- वेठबिगार पध्दतीपासून मुक्तता.
- प्रकल्पामुळे विस्थापित झालेले आदिवासींच्या चळवळी.



Scanned with OKEN Scanner

इ.स. १९५१ नंतर शासनाने आपले लक्ष कृषी क्षेत्राकडे लक्ष केंद्रित केले व शासनाने त्याकरिता प्रचंड खर्च केला. परंतू याच काळामध्ये शेतजमिनीचा व्यापार सुरू झाला. आदिवासींच्या अनेक जमिनी कायदेशीर बंधनाचे उल्लंघन करून गैरआदिवासींनी लुबाडल्या. त्या विरोधात महाराष्ट्रामध्ये एक मोठी चळवळ श्री. अंबरसिंग सुरतवनी यांनी सुरू केली होती. त्याचप्रमाणे श्री. काळूराम धोंडाडे व त्यांच्या इतर सहकाऱ्यांनी ठाणे जिल्हयाच्या पालघर विभागामध्ये आदिवासींना संघटीत करून चळवळी चालविण्यात आले व वेळोवेळी आंदोलन उभारण्यात आले.

**वेठबिगारी विरूध्द आंदोलने**

आदिवासी समाजामध्ये शिक्षणाचे प्रमाण हे पाहिजे तेवढया प्रमाणात नाही. त्यामुळे त्यांच्या अज्ञानाचा फायदा घेऊन सावकार, महाजन, शासकवर्ग त्यांचे शोषण करीत असतो. त्यांच्याकडून श्रम करवून घेऊन आर्थिक मदत ही नाहीच्या बरोबर असते. श्रमाची मजूरी ही दिली जात नाही. किती या बौध्दीक प्राण्याची कमाल मानावी लागेल. जो बौध्दीक प्राणी (मनुष्य) हा जमीनदार, सावकार हयांच्या घराण्यातील असेल. आपल्याच देशामध्ये देशांतर्गत राहत असलेल्या लोकांचे शोषण केले जाते. जो समाज हजारो वर्ष या देशाचा मुलनिवासी राहिलेला आहे. केवळ जेवण देऊन आदिवासींकडून जमीनदार, सावकार, वनविभाग, रेव्हेन्यू खाते, पोलीस खाते आणि स्थानिक अधिकारी आपआपली कामे बिगर पैशाने करून घेत असत. जानेवारी १९४५ मध्ये गोदावरी परूळेकर यांच्या नेतृत्वाखाली किसान सभा या अंतर्गत ठाणे जिल्हयातील टिटवाला गावामध्ये मोठे अधिवेशन घेण्यात आले होते. शासनाने वेठबिगार नष्ट करण्यासाठी बॉंडेड लेबर (ॲबॉलिशन) ॲक्ट १९७६ हा संमत केला. चंद्रपूर जिल्हयामध्ये श्री. नारायणसिंह उईके या आदिवासी नेत्याच्या नेतृत्वाखाली इ.स. १९५२ ते १९७२ या काळामध्ये आदिवासी समाजामध्ये जनजागृती करून चळवळी उभ्या केल्यात. गडचिरोली जिल्हयातील कुरखेडा–धानोरा या भागामध्ये जबरणजोत चळवळ सुरू केली गेली. श्री. सुखदेवबापू उईके यांनी नारायणसिंहच्या मृत्युनंतर आदिवासींना जमीन हक्क मिळण्याकरिता आंदोलन चालविले.

**शैक्षणिक आंदोलने**

आदिवासी समाज हा आजही अतिमागासलेला म्हणून समजण्यात येतो. आजही गडचिरोली जिल्हयातच नाही तर या देशातील काही दुर्गम भागामध्ये शिक्षणाच्या सोयींचा अभाव आपणाला दिसून येतो. आजही बऱ्याच दुर्गम भागातील आदिवासी भागामध्ये दिवाबत्ती, शाळा, आरोग्याच्या सोयी याचा अभाव दिसून येतो. गडचिरोली व चंद्रपूर जिल्हयातील बऱ्याच आदिवासी गावामध्ये शाळांची व शिक्षकांची वानवा आहे. शासनाचे प्रतिनिधी व शासन पाहिजे तेवढया प्रमाणामध्ये या आदिम समाजाच्या शैक्षणिक विकासामध्ये लक्ष देत नाही. गडचिरोली जिल्हयातील एटापल्ली व भामरागड या तहसिलमध्ये माडीया–गोंड ही अतिमागास जमात असून त्यांची वस्ती ८०–९५ टक्के पर्यंत आहेत. या ठिकाणी शाळा असून शाळेमध्ये शिक्षक नव्हते. संशोधनकर्त्याला शैक्षणिक आंदोलनाचा अभ्यास करतांना असे दिसून आले की, १९८४–८५ मध्ये एटापल्ली येथे जेव्हा शाळा सुरू झाली तेव्हा शासनाने शिक्षकांच्या भरतीच केल्या नव्हत्या. माडिया पालक अधिकाऱ्याकडे गेले तरी अधिकाऱ्यांनी काहीच केले नाही. आदिवासी पालकांनी एकत्र येऊन घंटानाद आंदोलन करून मोर्चे काढले. या आंदोलनामध्ये एटापल्ली येथील रहिवासी व आदिवासीमध्ये कार्य करणारे कॅ. कवडू नानाजी खापने यांनी या आंदोलनाच्या संयोजनामध्ये महत्वाची भूमिका बजावली. पोलीसांनी बॉम्बे पोलीस ॲक्ट अंतर्गत सर्व आदिवासींना पकडले. ही गोष्ट जेव्हा गडचिरोलीचे कलेक्टर (तेव्हाचे) आयु. मुन्शीलाल गौतम यांना माहित झाल्यानंतर प्रत्यक्षपणे गौतम यांनी पालकांशी व कार्यकर्त्यांशी संवाद



Scanned with OKEN Scanner

साधल्यानंतर शाळेची हकीकत त्यांना माहित झाली की ६ महिने शिक्षकच शाळेत नसल्यामुळे हे आंदोलन करण्यात आले होते. तेव्हा गौतम साहेबांनी पोलीस व अधिकारी यांना फैलावर घेऊन आदिवासींचे कौतु करण्यास सांगितले व सर्वांना सोडून देण्याचे आदेश दिलेत.

**पर्यावरणाच्या संवर्धनाकरिता आदिवासींची आंदोलने**

आदिवासी लोक आदि काळापासूनच पर्यावरण संवर्धनाचे कार्य करीत आलेले आहेत. कारण ते त्यांचे निवासस्थान आहे. वेगवेगळया राज्यामध्ये आदिवासींनी पर्यावरणाचे जतन करण्याकरिता आंदोलन केले असल्याचे इतिहासामध्ये व वर्तमानाच्या संशोधनातून आढळून येते. शासन हे खाजगी कंपन्यांना कंत्राट देऊन फार मोठया प्रमाणात वृक्षतोड करीत असते. चिपको आंदोलन हे भारतात सर्वश्रुत आहे. दि. २७ मार्च १९७३ मध्ये या आंदोलनाची सुरूवात झाली होती. गोपेश्वर या गावाजवळ ही चळवळ सुरू झाली होती. या चळवळीचा इतका प्रभाव पडला की, ठेकेदाराला वृक्षतोड थांबवावी लागली. हिमालयात ३५०० फूट उंचीवर नवजीवन आश्रम चालविणारे कार्यकर्ते सुंदरलाल बहुगुणा यांनी ही चळवळ करण्यास आदिवासींना प्रेरित केले होते.

याच प्रेरणेतून आदिवासींची "जंगल बचाव – मानव बचाव" ही चळवळी उभी झाली. या आंदोलनाला श्री. सुखदेवबाबू उईके, वडसा येथील कार्यकर्ते श्री. मोहन हिराबाई हिरालाल, श्री. जोगा मडावी (नागेपल्ली) यांच्या सहकार्याने हे आंदोलन सक्रिय करून शासन फार मोठ जागा व्यापणार होते. त्या शासनाच्या धोरणाला या आंदोलनाने थांबविले.

**सुधारणावादी आंदोलने**

आदिवासी समाजामध्ये सामाजिक व धार्मिक सुधारणा घडवून आणण्याच्या दृष्टिकोनातून आदिवासींची आंदोलने दिसून येतात. उदा. गडचिरोली जिल्हयामध्ये डॉ. अभय बंग, ॲड. पारोमिता गोस्वामी यासारख्या कार्यकर्त्यांनी दारूबंदीचे आंदोलन चालविले. या आंदोलनामध्ये स्त्रियांचा फार मोठा सहभाग असतो. चंद्रपूर जिल्हयामध्ये ॲड. पारोमिता गोस्वामी यांनी दारूबंदीची घोषणा करून चिमूर ते नागपूर असा लाँगमार्च काढला होता. या आंदोलनामध्ये महिलाच सहभागी होत्या. या आंदोलनाचा प्रभाव इतका पडला की शासनाला चंद्रपूर जिल्हा हा दारूबंदी जिल्हा करावा लागला. परंतू शासनाच्या दुटप्प्या धोरणामुळे या आंदोलनावरती पाणी फेरल्या गेले व चंद्रपूर जिल्हयामध्ये झालेली दारूबंदी शासनाने उठविली.

अमरावती जिल्हयामध्ये डॉ. कोल्हे दाम्पत्य, गडचिरोली जिल्हयामध्ये बाबा आमटे व आमटे परिवार इत्यादी समाज कार्यकर्त्यांनी आदिवासी समाजामध्ये परिवर्तनाचे कार्य केले. डॉ. गोगुलवार, डॉ. अभय बंग हे सुध्दा आदिवासी समाजातील आरोग्याच्या सेवाविषयी आपले योगदान देत आहेत.

गडचिरोली जिल्हयात इ.स. १९८५ च्या दरम्यान धानोरा तहसिलीमधील लेखा–मेंढा या गोंड बहूल गावामध्ये आदिवासींच्या अन्यायमुक्ती आणि विकासाकरिता स्थानिक चळवळ श्री. देवाजी तोफा यांच्या नेतृत्वात उभी राहिली. श्री. देवाजी तोफा यांच्यावरती श्री. मोहन हिराबाई हिरालाल यांच्या कार्याचा प्रभाव पडला असल्याचे बोलले जाते. आदिवासी समाजामध्ये श्री. मोहन हिराबाई हिरालाल यांनी प्रामाणिकपणाने आदिवासी समाजाला मार्गदर्शन व सहकार्य केले. विविध आदिवासी योजना आणि जंगल विषयक कायद्यामध्ये बदल करण्यात आला असला तरी प्रत्यक्षात मात्र आदिवासीचे अधिकार लिखित स्वरूपात हे अधिकाऱ्यांकडे होते.



Scanned with OKEN Scanner

देवाजी तोफांच्या नेतृत्वामध्ये "मावा नाटे – मावा राज" अर्थात आमच्या गावात आमचे राज्य या मागणीसाठी चळवळ झाली. ग्रामाविषयी निर्णय घेण्याचे व जंगलातील उत्पादनाबाबत निर्णय घेण्याचे अधिकार हे ग्रामसभेलाच असावेत अशी त्यांनी मागणी केली. आदिवासींच्या विकासासाठीचा पैसा हा सरळ दिल्ली ते गल्ली म्हणजे ग्रामसभेकडे पाठवावा असे श्री. देवाजी तोफा आपले विचार आपल्या चळवळीच्या माध्यमातून मांडीत असतात. सन २०१८ मध्ये संशोधनकर्ता समाजशास्त्र विषयातील ५० विद्यार्थ्यांसमवेत भेट देऊन श्री. देवाजी तोफा यांच्या चळवळीचा परिचय करून घेता व गावाचा समाजशास्त्रीय अभ्यास केला गेला. एकही वर्ग न शिकता देवाजी तोफा यांनी लेखामेंढा या गावामध्ये जो सामाजिक, धार्मिक, आर्थिक बदल घडवून आणला त्या बदलाचे कारण म्हणजे भारतीय संविधानातील 'आम्ही' या शब्दांचा देवाजी तोफा यांच्यावरती पडलेला प्रभाव. जंगल, जमीन व जल ही आदिवासींची सामूहिक संपत्ती असून तिचे व्यवस्थापन हे ग्रामसभेकडे असावे असा त्यांचा आग्रह आहे.

**आदिवासी समाजातील आंदोलनाचा प्रभाव**

- आदिवासी समाजातील लोकांना अधिकार व कर्तव्याची जाणीव.
- आदिवासी समूदायामध्ये स्वाभिमान व आत्मसन्मान निर्माण झाला.
- भारतीय संविधानाविषयी माहिती.
- शासकीय सवलती व आरक्षणाविषयी जागरूकता.
- स्वतंत्र राज्याची निर्मिती व मागणी.
- फुले, शाहू, आंबेडकर आंदोलनाविषयी जवळीकता.
- आदिवासी समाज संघटीत व नियमाविषयी जागरूकता.

**निष्कर्ष**

वरील शोध निबंधाच्या अनुषंगाने संशोधनकर्त्याला आदिवासी आंदोलन निर्माण होण्याकरिता आदिवासी समाजाचे ब्रिटिशकालीन व स्वातंत्र्योत्तर शोषण, अन्याय, अत्याचार झालेत. त्यांना भूमिहीन व जगण्याकरिता मजबूर करण्यात आले. जेव्हा की, हा समाज कुणाचेही शोषण करीत नाही. अन्याय, अत्याचार, शोषणाच्या विरोधामध्ये आदिवासी चळवळी निर्माण झाल्यात. देशाच्या विकासामध्ये आदिवासी आंदोलनाचे योगदान महत्वपूर्ण आहे.

**संदर्भ सूची**


१. *डॉ. देवगावकर एस. जी. (२००१) सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन, साईनाथ प्रकाशन, नागपूर*

२. *शाह जी. एन. (२००८) भारतातील सामाजिक चळवळी, डायमंड पब्लिकेशन, पुणे.*

३. *प्राचार्य काचोळे दा. धो. (२००५) समाजशास्त्रीय विचारांचा मुलाधार, कैलाश पब्लिकेशन, औरंगाबाद.*

४. *Desai A. R. (1979) Pesant Struggle in India, Bombay, Oxford University Press.*

५. *Dhanagare D. N. (1983) Pesant Movement in India, 1950, Delhi Oup.*

६. *Rao M.S.A. (1979) Social Movement in India, New Delhi.*




Scanned with OKEN Scanner

VOLUME - XI, ISSUE - I - NOVEMBER - APRIL - 2022-23
**GALAXY LINK - ISSN 2319 - 8508 - IMPACT FACTOR - 6.495 (www.sjifactor.com) CC-2**

# ३. डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांचे सामाजिक आणि शैक्षणिक योगदान

**प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे**
प्रमुख समाजशास्त्र विभाग, डॉ. म. वा. पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर.

**गोषवारा**

भारतातील सर्वच राज्यामध्ये महाराष्ट्र हे राज्य एक सुधारक व क्रांतीचे राज्य समजले जाते. या राज्याला एका परिवर्तनवादी विचाराची परंपरा आहे. छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील, डॉ. पंजाबराव देशमुख, संत गाडगेबाबा, संत तुकडोजी महाराज आदि महान समाज सुधारक याच महाराष्ट्राच्या भूमी जन्मले. यापैकी काहींची कर्मभूमीही महाराष्ट्र राहिली. कर्मवीर भाऊराव पाटील त्यापैकी एक. महान समाज सुधारक आणि शिक्षण महर्षि ज्यांच्या कार्याने येथील सर्व बौध्दीक जणांना विचार करावा लागतो. जवळ कोणतेही भांडवल नसतांना, त्यांनी आपल्या शैक्षणिक आणि सामाजिक कार्याची छाप येथील जनमानसांवर टाकली. ध्येयाने झपाटलेला माणूस, बहुजनाच्या प्रगतीचे रात्र–दिवस स्वप्न बघणारा एक समाज सुधारक कर्मवीर भाऊराव पाटील यांनी महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रामध्ये अभूतपूर्व क्रांती घडवून आणली. स्वावलंबन, स्वाभीमानी, स्वाध्याय आणि स्वातंत्र्य ही त्यांच्या शिक्षणाची चतु:सूत्री होती. त्यांच्या विचारावरती छत्रपती शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फूले, यांचा विचारांचा प्रभाव होता. महात्मा गांधीजी आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर, शाहू महाराज यांच्याशी त्यांचा संपर्क आलेला होता. त्यांच्याही विचाराने कर्मवीर भाऊराव पाटील फार प्रभावित झाले होते. त्यांनी इ.स. 1910 मध्ये सांगली जिल्हयातील दूधगाव येथे शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली. त्यांच्या कार्यावरून असे दिसून येते की, ते सत्यशोधक समाजाचे पाईक होते. इ.स. 1912 मध्ये कराड तालुक्यातील काळे या गावी रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली. त्याचप्रमाणे त्यांनी आश्रमाची स्थापना, वसतीगृहाची स्थापना, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये इत्यादीची स्थापना करून या महाराष्ट्रातील सर्व लोकांना शिक्षण मिळालेच पाहिजे हा विचार उराशी बाळगून त्यांनी सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्रात फार क्रांती घडवून आणली. त्यांचे हे कार्य नेत्रदिपक आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रातील सर्व लोकांना शिक्षण घेऊन प्रगती करता आली. बहुजनांच्या, वंचितांच्या कल्याणाकरिता, प्रगतीकरिता खऱ्या अर्थाने त्यांनी आपले आयुष्य पणाला लावून विशेष करून ग्रामीण क्षेत्रातील विद्यार्थांनी शिक्षण घेतले पाहिजे या अर्थाने त्यांनी अनेक ठिकाणी रयत शिक्षण संस्थेच्या अंतर्गत शिक्षणाची दारे उघडे केलीत. पालकांचे दारिद्रिय आड येऊ देऊ नका, शिक्षण घ्या, शहाणे व्हा, समाजाच्या हितासाठी, उपयोगिताकरिता शिका, शिक्षण हे माणसाच्या विकासाचे एक महत्वाचे मुळ साधन आहे, शिक्षणामुळे माणसाला सर्व गोष्टींची माहिती प्राप्त करता येते. व्यक्ती बहुश्रूत होतो अशा प्रकारचा दृढ निश्चय त्यांनी शिक्षण घेण्यामागे व्यक्त केला. शिक्षणातून नवचैतन्य, नवमानव आणि नवसमाज निर्माण झाला पाहिजे असा आशावाद त्यांनी व्यक्त केला होता. या हेतूनेच त्यांनी शिक्षणाची मुळे मागासलेल्या समाजाच्या कल्याणाकरिता रोवली. आज रयत शिक्षण संस्थेचा वटवृक्ष झाला आहे. छत्रपती शाहूजींच्या प्रेरणेने त्यांना सत्यशोधक समाजाची दिक्षा मिळाली होती. त्यांना जातीभेद, अन्यायाची प्रचंड चीड होती. शिक्षणामुळेच माणसाचा विकास होतो, माणूस बहुश्रृत होतो, घाम गाळून शिका,



Scanned with OKEN Scanner

समाजाच्या उपयोगिकाकरिता शिका, अशी शिक्षणाची तळमळ त्यांची होती. समाज परिवर्तनाचे एक महत्वपूर्ण साधन म्हणजे शिक्षण होय असे डॉ. कर्मवीर भाऊराव पाटीलांना वाटायचे. त्यांनी 'कमवा व शिका' अर्थात स्वावलंबनाचा मार्ग त्यांनी शिक्षण घेण्याकरिता प्रसारित केला. सामाजिक समता आणि एकता ही शिक्षणामागील उद्दिष्टये ठरविली. ज्ञानसाधना हे साधन समाज परिवर्तनाकरिता उपयोग करून डॉ. भाऊराव पाटीलांना शिक्षणाची दारे गरीब व वंचितांच्या घरापर्यंत पोहोचवली. शैक्षणिक क्षेत्रामध्ये त्यांनी ज्या पध्दतीने कार्य केले त्यांच्या कार्याला आज महाराष्ट्रामध्ये वंदन केले जाते. म्हणूनच आज ते सर्वांकरिता वंदनिय ठरलेत. त्यांच्या शैक्षणिक कार्य हे अजरामर राहील.

**प्रमुख शब्द**

समाज सुधारक, शिक्षण महर्षि, स्वावलंबन, रयत शिक्षण संस्था, सत्यशोधनक समाज, ज्ञानसाधना.

**प्रस्तावना**

मानवी समाजातील परिवर्तनाकरिता शिक्षण हे एक महत्वाचे साधन आहे. हे सुर्य प्रकाशाइतके स्पष्ट असतांना या देशामध्ये मानव शिक्षणापासून वंचित राहिला आहे. जातिव्यवस्थेच्या असमान रचनेमुळे येथील मानवाला शिक्षण घेता आले नाही. अज्ञानाच्या खाईमध्ये त्याला ढकलण्यात आले. माणसानेच माणसाला गुलाम केल्याचे चित्र हे पेशवाईच्या काळामध्ये दिसून आले. ब्रिटिशांच्या राजवटीमध्ये आपल्याला पेशवाईचा अंत झाल्याने शिक्षणाची दारे सुरू झाली. इंग्रजांनी शिक्षण देणे सुरू केल्यामुळे अनेक लोकांना शिक्षण घेता आले व समाजातील अज्ञान व अंधार दूर करण्याकरिता काही शैक्षणिक संस्था समाज सुधारकांच्या प्रयत्नाने उभ्या राहिल्यात. यामध्ये समाज सुधारकांचे कार्य हे समाजाच्या प्रगतीकरिता महत्वाचे ठरले असल्याचे आपल्याला दिसून येते. त्यापैकी डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या कार्याची दखल बौध्दिक विचारवंताना घ्यावीच लागेल. शिक्षणाचा अभाव हे बहुजन समाजाच्या मागासपणाचे कारण आहे, असे त्यांना वाटत होते. भाऊरावांचा संपर्क हा कोल्हापूरच्या छत्रपती शाहू महाराजांसोबत आल्याने त्यांच्यावरती सुधारणावादी विचारांचा प्रभाव पडला. तसेच सामाजिक क्रांतीचे अग्रदूत महात्मा ज्योतिबा फूले यांचे विचारकार्यानी ते झपाटलेले होते. म्हणून महात्मा फूल्यांचे शैक्षणिक कार्य हे पूढे नेले पाहिजे या विचारांशी ते बांधील झाले आणि समाजामध्ये परिवर्तनाच्या दृष्टिकोनातून शैक्षणिक कार्याला महत्व देवून त्यांनी आश्रम, रयत शिक्षण संस्था, वसतीगृह, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, बोर्डिंग हाऊस स्थापन करून समाजामध्ये शैक्षणिक कार्य सुरू केले. या त्यांच्या शैक्षणिक कार्यामुळे महाराष्ट्रामध्ये अभूतपूर्व एक क्रांती घडून आली. त्यांच्या शैक्षणिक संस्थांमधून अनेक प्रकारचे लोक हे वेगवेगळया पदावर रूजू झाले असल्याचे दिसून येते. त्यांच्या शैक्षणिक कार्याची प्रशंशाही राष्ट्रपिता महात्मा गांधी, डॉ. बी. आर. आंबेडकर, थोर सुधारक गाडगेबाबा यांनी केली असल्याचे दिसून येते. कर्मवीर भाऊराव पाटीलांनी सातारा येथे जे वसतीगृह काढले होते त्या वसतीगृहाचे गांधीजींच्या हस्ते ''श्री छत्रपती शाहु बोर्डिंग'' असे नामविधान केले गेले. त्यावेळी महात्मा गांधीजी म्हणाले भाऊराव जे मला साबरमती आश्रमामधून जमले नाही ते तुम्ही येथे यशस्वी करून दाखविलात. तुमच्या या कार्यास माझे शुभाशिर्वाद, असे म्हणून त्यांनी या कार्याकरिता वार्षिक रू. 500/– (अक्षरी पाचशे रूपये) हरिजन सेवक फंडामधून वर्गणी देण्याचे जाहीर केले. त्याचप्रमाणे डॉ. आंबेडकरांनी 28 जुलै 1928 ला या वसतीगृहाला भेट दिली व 25 रू. वर्गणी दिली. त्यावेळी डॉ. आंबेडकर म्हणले ''ही एकमेव अशी संस्था आहे की, राष्ट्र कल्याणाची काळजी वाहणाऱ्या प्रत्येक माणसाने तिच्या



Scanned with OKEN Scanner

उत्कर्षासाठी हातभार लावला पाहिजे'' अशा प्रकारचे विचार हे महान विचारवंतांकडून आपणास ऐकावयाला मिळाल्याने याचाच अर्थ असा की डॉ. भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक कार्य हे खऱ्या अर्थाने समाजाच्या परिवर्तनाकरिता, समाजाच्या हिताकरिता स्थापित झाले असल्याचे आपणाला दिसून येते. महाराष्ट्रातील तमाम लोकांच्या सामाजिक व शैक्षणिक जीवनातील परिवर्तनाकरिता डॉ. भाऊराव पाटील यांचे योगदान हे अतिशय महत्वपूर्ण आणि उल्लेखणीय आहे. त्यांनी केलेल्या कार्याची येथील प्रत्येकजण प्रशंसा करण्याशिवाय राहणार नाही. त्यांनी आपल्या संस्थेचे बोधचिन्ह जे वटवृक्ष ठेवले होते त्याचप्रमाणे त्यांनी या शैक्षणिक संस्थेच्या शाखा महाराष्ट्रामध्ये फार मोठया प्रमाणात स्थापन केल्यात. त्याचे हे कार्य कशाप्रकारे नवीन पिढीकरिता प्रेरणादायी आहे तसेच आजच्या शिक्षण संस्था चालकांना, शिक्षण सम्राट समजणाऱ्या संस्था चालकांना नक्कीच दिशा देणारे आहे. या विषयीचा विचार प्रस्तुत शोधनिबंधामध्ये व्यक्त करण्यात आला आहे. महाराष्ट्रातील जनतेने त्यांना कर्मवीर पदवी देऊन त्यांच्या कार्याचा सन्मान केला.

**अध्ययनाची उद्दिष्टये**

- कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या व्यक्तित्वाचा परिचय करणे.
- कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केलेल्या सामाजिक आणि शैक्षणिक कार्याचा आढावा घेणे.

**साहित्य समिक्षा**

प्रा. प्रफुल अशोक टाले यांनी महाराष्ट्रातील समाज सुधारक साई ज्योती पब्लिकेशन, नागपू, (2018) या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या कार्याविषयी धावता आलेख स्पष्ट केलेला आहे. महाराष्ट्रातील अनेक समाज सुधारकांचा त्यांनी अभ्यास केला असल्याचे दिसून येते. परंतू डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्याविषयी जी माहिती ग्रंथामध्ये रेखांकित केली आहे ती माहिती काही प्रमाणामध्ये अपुरी दिसून येते.

डॉ. के. यु. घोरमोडे, डॉ. कला घोरमोडे यांनी शैक्षणिक विचारवंत (भारतीय व पाश्चात्य) विद्या प्रकाशन, रूईकर रोड, महाल, नागपूर (2006) या ग्रंथामध्ये समाजामध्ये ज्या विचारांच्या आधारे परिवर्तन होऊ शकते. त्या विचारांचा आणि विचारवंतांचा शोध घेतला आहे. महाराष्ट्रातील काही समाज सुधारकांचा शोध घेण्याचा त्यांनी प्रयत्न केला. काही पैलू हे अध्ययनापासून वंचित राहिले असल्याचे दिसून येते.

डॉ. एस. जी. देवगावकर यांनी सामाजिक चळवळी, परंपरागत आणि नवीन, साईनाथ प्रकाशन नागपूर या ग्रंथामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील व इतर सुधारकांच्या कार्यावरती प्रकाश टाकला असल्याचे दिसून येते, परंतू पाहिजे त्या प्रमाणात भाऊरांवाच्या शैक्षणिक कार्याचा उल्लेख करण्यात आलेला नाही. या दृष्टीने या शोध लेखात महाराष्ट्रातील समाज शोध घेण्याचा प्रयत्न करण्यात आला

व्ही. एन. स्वामी यांनी महाराष्ट्रातील समाज सुधारक, संत साहित्यिक आणि थोर भारतीय विचारवंत, विद्याभारती प्रकाशन, 2011 या ग्रंथामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जीवन कार्यावरती प्रकाश टाकण्यात आलेला नाही. शैक्षणिक क्षेत्रातील भाऊराव पाटील यांचे कार्य हे उल्लेखनीय आणि अजरामर आहे. त्यांच्या शैक्षणिक कार्यावरती प्रकाश टाकणे हे अतिशय महत्वाचे आहे. ा दृष्टिकोनातून प्रस्तुत शोधनिबंधामध्ये डॉ. भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्याचा प्रभाव स्पष्ट करण्याचा प्रयत्न केलेला आहे.



Scanned with OKEN Scanner

अनिल कठारे यांनी महाराष्ट्रातील समाज सुधारक, विद्या बुक्स पब्लिशर्स, औरंगाबाद, जानेवारी 2014 या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील समाज सुधारकांविषयी आपणाला माहिती आढळून येते. परंतु भाऊराव पाटील यांच्या विषयीची माहिती अपूरी वाटत असल्याने प्रस्तुत शोध निबंधामध्ये डॉ. भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक कार्यावरतील प्रकाश टाकण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधन पध्दत**

प्रस्तुत शोधनिबंधाकरिता संशोधनग्रंथ, वर्तमानपत्र, आत्मचरित्र, इंटरनेट, अहवाल इत्यादी माध्यमाचा उपयोग करण्यात आलेला आहे.

**व्यक्तीपरिचय : कर्मवीर भाऊराव पाटील**

डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील हे महाराष्ट्राच्या मातीतील व्यक्तिमत्व, समाजातील अन्याय, अत्याचार, जातीभेद या विषयीची त्यांना चीड निर्माण होऊन ग्रामीण भागातील लोकांच्या कल्याणाकरिता शिक्षण हे महत्वाचे मानतात व प्रत्यक्षात गाव तिथे शाळा आणि प्रत्येक शाळेत प्रशिक्षित शिक्षक अशा प्रकारचा बेत आखून शिक्षणाची बीजे पेरायला सुरूवात करतात. अशा या महान शिक्षण महर्षिचा जन्म 22 सप्टेंबर 1887 रोजी कोल्हापूर जिल्हयातील कुंभोज या गावी एका जैन कुटुंबामध्ये झाला. त्यांचे वडील इस्ट इंडिया कंपनीमध्ये कारकून म्हणून नोकरीस होते. सांगली जिल्हयातील ऐतवडे बुद्रुक हे त्यांचे मूळ गाव होय. त्यांच्या वडिलांचे नाव पायगौंडा पाटील असे होते. वडील शासकीय महसूल खात्यात नोकरीला असल्यामुळे त्यांची नेहमी बदली व्हायची. त्यामुळे मुलांना चांगले शिक्षण घेण्यापासून मुकावे लागले. भाऊरावांचे प्राथमिक शिक्षण हे कुंभोज, दाहवडी, विटे इत्यादि ठिकाणी झाले. पुढील शिक्षणासाठी त्यांना कोल्हापूरच्या राजाराम हायस्कुलमध्ये दाखल करण्यात आले. त्यांची राहण्याची सोय जैन बोर्डिंगमध्ये करण्यात आली. लहाणपणापासून त्यांच्या स्वभावामध्ये बंडखोर वृत्ती दिसत होती. जैन बोर्डिंगमध्ये विद्यार्थ्यांवर धार्मिक नियमांचे पालन करण्याची सक्ती केली जात होती. पण भाऊराव पाटीलांना ही सक्ती योग्य वाटत नव्हती म्हणून त्यांनी त्या नियमांचे उल्लंघन केल्यामुळे त्यांना शिक्षा भोगावी लागत असे, त्यामुळे त्यांनी दहावी होण्यापूर्वी शिक्षण सोडले. त्यांनी कुस्ती, व्यायाम या सारख्या गोष्टीकडे लक्ष दिले तेव्ह ते कोल्हापूरला वास्तव्याला होते. यावेळी राजर्षी शाहू महाराज कोल्हापूरच्या गादीवर होते. याच कालावधीमध्ये त्यांच्यावरती शाहू महाराजांच्या विचारांचा व कार्याचा प्रभाव पडला. काही काळानंतर भाऊराव पाटील यांनी साताऱ्याला मदवान मास्तर, भाऊसाहेब कुदळे, नानासाहेब येडेकर आणि इतर मंडळीबरोबर दुधगावमध्ये ''दुधगाव शिक्षण मंडळ'' स्थापन केले. याच संस्थेमार्फत सर्व जाति धर्माच्या मुलांसाठी एक वसतिगृह सुरू केले. आज महाराष्ट्रभर रयत शिक्षण संस्थेचे जे शैक्षणिक कार्य दिसून येते त्याचे बीज प्रथम दूधगावामध्ये पेरले असल्याचे दिसून येते. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ओगलाच्या काच कारखान्यात काम केले आहे. त्याचप्रमाणे किलोस्कर ब्रदर्स लिमिटेड या कंपन्यामध्ये फिरते विक्रेते म्हणून त्यांना काम करावे लागले. या कामामुळे त्यांना महाराष्ट्रातील सामाजिक, शैक्षणिक परिवर्तनाचे अवलोकन करण्याची संधी मिळाली. त्यांच लक्षात आली की बहुजन समाज हा अजूनही अन्याय, अत्याचार आणि अज्ञानाच्या वाटेवर आहे. या समाजाला त्यांच्या कल्याणाकरिता काहीतरी करण्याची तळमळ त्यांच्या मनात सुरू झाली. त्यांना अशी जाणीव झाली की, बहुजन समाजामध्ये शिक्षणाचा प्रसार केल्याशिवाय त्यांचा विकास होऊ शकत नाही. त्यामुळे त्यांनी बहुजन समाजाच्या उन्नतीकरिता गावोगावी शाळा स्थापन करून स्वतःचे जीवन या कार्याला वाहून घेतले.



Scanned with OKEN Scanner

मॅट्रीक नसतांनाही ऐवढे महान शैक्षणिक कार्य आज भारतामध्ये आपणाला दिसून येते. शिक्षण प्रसार करण्याकरिता ऑक्टोबर 1919 मध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना केली.

**कर्मवीर भाऊराव पाटील यांचा शैक्षणिक दृष्टिकोन**

**जनसामान्यांची मुक्तता करण्याकरिता**

इंग्रजांचे भारतावर वर्चस्व होते, साम्राज्य होते, अर्थात भारत पारतंत्र्यात होता. त्यामुळे भारताला स्वतंत्र करणे हे आवश्यक होते. याकरिता सर्वसामान्य माणसाला जागृत करावयाचे असेल तर शिक्षण घेणे हे अतिशय महत्वाचे आहे. या दृष्टिकोन अंगी बाळगून भाऊरावांनी जनसामान्यांना शिक्षण देऊन परकिया सत्तेविरूध्द असंतोष निर्माण करणे महत्वाचे मानले. याकरिता त्यांनी अशाचीही तमा न बाळगता अहोरात्र मेहनत करून शिक्षणाची मूळे रोवणे सुरू केले.

**समानतावादी समाज स्थापन करणे**

लोकशाहीमध्ये विचार, स्वातंत्र्य, मत व्यक्त करणे, एकप्रकारचे व्यक्तीला स्वातंत्र्य असते, तो कोणत्याही विषयावरती आपले मत व्यक्त करू शकतो. श्रेष्ठ, कनिष्ठता असा भेदभाव केला जात नाही. म्हणून भाऊरावांनी सर्व सामान्य जनांकरिता शिक्षण देऊन समानतावादी समाज स्थापन करणे महत्वाचे मानले आणि त्यांनी त्या दृष्टीने आपले प्रयत्नही केलेत. त्यामध्ये ते यशस्वीही झालेत.

**स्वावलंबनाकरिता शिक्षण**

भाऊरावांनी आपल्या संस्थेची जी उद्दिष्टे सांगितली आहेत त्यामध्ये स्वालंबनाला विशेष महत्व दिले आहे. स्वालंबनाने शिक्षण घेतले पाहिजे. या गोष्टींवरती भाऊरावांचा विशेष जोर होता. 'कमवा आणि शिका' हा त्यांनी मुलमंत्र दिला आहे. ग्रामीण भागातील मागास व गरीब मुलांना शिक्षण घेणे शक्य व्हावे या दृष्टिकोनातून 'कमवा व शिका' ही योजना सुरू करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी उपलब्ध करून दिली.

**एकात्मतेची पूर्णबांधणी**

भारतीय समाज हा जातीमध्ये विभाजीत झाला आहे. जाती–जातीमध्ये उपजाती आहेत. जाती आणि त्याच जातीतील उपजातींचे सुध्दा रोटी बेटी व्यवहार होत नाहीत. भारतीय समाज हा पूर्णपणे जातीमध्ये विभागला गेला. मानवतावादी मुल्ये ही केव्हाचीच या देशाच्या मातीतून ऱ्हास झाली होती. परंतू काही मानवतावादी विचारवंत व समाज सुधारक यांच्या प्रयत्नातून एकात्मतेचे काम करण्यास सुरूवात झाली. त्यामध्ये कर्मवीर भाऊराव पाटील यांनी अतिशय महत्वाची भूमिका निभावली. शिक्षणाच्या आधारे जाती आणि जमाती यांच्यात एकात्मतेचा समन्वय आपण साधु शकतो.

**बालकांचा सर्वांगीण विकासाकरिता**

शिक्षणाच्या आधारे बालकाचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक असते. त्याकरिता त्यांनी वसतिगृहाच्या स्तरावर आश्रम पध्दतीचा उपयोग केला होता. बालकांनी स्वतःच्या उपजीविकेसाठी व प्रगतीकरिता जनावरांची काळजी घेणे, शेती करणे, शेतीसाठी आणि पिण्यासाठी पाण्याची सोय योग्य प्रकारे करणे, स्वतः स्वयंपाक करणे आणि इतर आश्रमीय कामे करणे इत्यादी गोष्टींवरती भर दिला होता. विद्यार्थ्यांच्या दैनंदिन कामामुळे आत्मनिर्भरता, उद्योग प्रियता, समाजसेवा, इतर कोणाच्याही श्रमाचा फायदा न घेणे, त्यामुळे मुलांमध्ये या गुणांची जोपासना होत असे. त्यामुळे 'कमवा आणि शिका' ही भावना मुलांमध्ये विकसित होऊन मोफत शिक्षणास चालना मिळत असे.



Scanned with OKEN Scanner

**कार्यवाद आधारित शिक्षण**

डॉ. भाऊराव पाटील यांचे तत्वज्ञान, मानवतावादावर आधारित होते. त्यांच्या विचारावरती महान समाज सुधारकांचा प्रभाव असल्यामुळे त्यांनी शैक्षणिक कार्यामध्ये प्रयोगातून शिक्षणाकडे कसे वळले पाहिजे या युक्तीने त्यांनी शिक्षणाची दारे गरीब, वंचित, श्रीमंताकरिता सताड उघडे केलीत. जातीभेद, अन्याय, शोषण हयासारख्या गोष्टी समाजामध्ये घडायला नकोत. पॉल फ्रेअरी या शिक्षण शास्त्रज्ञाच्या मते, ''भाऊराव पाटील हे मानवतावादी सामाजिक मुक्तीचे पुरस्कर्ते होते, त्यांच्या तत्वज्ञानाच्या आधारे काही शिक्षण शास्त्रज्ञांना ते कार्यवादी वाटतात, त्यामुळे त्यांनी प्रयोगाद्वारे आपले शैक्षणिक विचार मांडले आहेत. निरक्षरांना साक्षर करून अज्ञानाच्या खाईतून बाहेर काढून लोकशाहीयुक्त माणूस, लोकशाहीयुक्त समाज घडविण्याकरिता त्यांची धडपड असल्याचे त्यांच्या कार्यावरून दिसून येते.''

**रयत शिक्षण संस्थेची स्थापना**

बहुजन समाजामध्ये शैक्षणिक परिवर्तन घडवून आणण्याकरिता कर्मवीर भाऊराव पाटील यांनी आपले आयुष्य वेचले. कराड तहसिल येथील काले या गावी 25 सप्टेंबर 1919 रोजी सत्यशोधक समाजाची परिषद आयोजित करण्यात आली होती. या परिषदेमध्ये रयत शिक्षण संस्थेची स्थापना करण्यात आली होती. ग्रामीण आणि मागास क्षेत्रातील विद्यार्थ्यांना शिक्षणामध्ये रूची निर्माण करून त्यांना शिस्त, काटकसर, उद्योग प्रियता, चारित्र्य, संस्कार, संघशक्ती इत्यादी गुणांचा विकास करण्याच्या दृष्टिकोनातून रयत शिक्षण संस्था स्थापन करण्यात आली. मागसलेल्या वर्गातील मुलांना मोफत शिक्षण देण्याचा प्रयत्न करण्यात आला. सामान्य स्थितीतील विद्यार्थ्यास त्याच्या खर्चाने किंवा फार तर निम्म्या खर्चाने संस्थेत शिक्षण घेण्याकरिता ठेवणे, ''स्वावलंबी शिक्षण हेच आमचे ब्रीद वाक्य'' हे शिक्षण संस्थेचे ब्रीद वाक्य होते. तर वटवृक्ष हे बोधचिन्ह होते. प्रारंभी संस्थेचे मुख्य कार्यालय काले येथे होते. त्यानंतर ते सातारा येथे मुख्य कार्यालय बनविण्यात आले. शैक्षणिक अनुदानाकरिता 25 एप्रिल 1935 ला रजिस्ट्रेशन करण्यात आले. या संस्थेला प्रारंभी डॉ. नागनाथ अण्णानायकवाडी यांनी 1,11,111 रूपये देणगी दिली होती. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी या संस्थेच्या अंतर्गत वसतीगृहे, प्रथमिक शाळा, माध्यमिक शाळा, महाविद्यालये, शिक्षकांसाठी प्रशिक्षण विद्यालये सुरू केली. आजच्या या घडील 749 शाखा आणि 4 लाख 46 हजार विद्यार्थी शिक्षण घेत आहे. स्वावलंबन हे डॉ. भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विचारांचे सुत्र होते. त्यांनी स्वावलंबन शिक्षणाला ब्रीद, श्रमाला पूजा आणि श्रमाच्या मोबदल्यात शिक्षण यास त्यांनी घोषवाक्य संबोधिले. त्यांनी समाजामध्ये लोकांच्या सहकार्याने शैक्षणिक कार्य किती समाजाच्या हिताकरिता आवश्यक आहे हे आपणाला त्यांच्या कृतीद्वारे दिसून येते. समाजाच्या उन्नतीकरिता शिक्षणाशिवाय दूसरे प्रभावी साधन कोणतेच नाही याविषयीची त्यांना पूर्णपणे जाणिव होती. म्हणून दलित, वंचित व उपेक्षित घटकापर्यंत शिक्षणाची दारे खूले करण्याचे महान कार्य कर्मवीर भाऊराव पाटील यांनी केले होते. तसेच त्यांनी हुशार व होतकरू मुलांना परदेशी उच्च शिक्षणासाठी पाठवून आपले श्रेष्ठत्व सिध्द करून दाखविले.त्यांनी विद्यार्थ्यांना स्वावलंबनाकरिता शिक्षणाचा उपयोग करण्यास सांगितले. हा त्यांचा मुलमंत्र होता.

**भाऊराव पाटील यांच्या शैक्षणिक विचार आणि सामाजिक कार्याचे मूल्यमापन**

डॉ. भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक आणि सामाजिक कार्य फार मोठे आहे. ते एक थोर शिक्षणतज्ञ होते. महात्मा ज्योतिबा फूले, महात्मा गांधी, शहू महाराज, डॉ. आंबेडकर यांच्या विचारांचा प्रभाव त्यांच्या कार्यामधून दिसून



Scanned with OKEN Scanner

आला. त्यांनी समाजाच्या हिताकरिता, समाजाच्या उन्नतीकरिता जे कार्य सहज नव्हते, कसल्याही प्रकारचे खूप भांडवल नव्हते. आश्रम निवास, वसतीगृह, शाळा, माध्यमिक शाळा चालवितांना अनेक संकटे आली पण भाऊराव पाटील हे डगमगले नाहीत. त्यांच्या पत्नी लक्ष्मीबाईंनी आपल्या अंगावरील दागिणे गहाण ठेवून शैक्षणिक संस्थांच्या संकट कार्यास हातभार लावला आहे. त्यांची विचारसरणी कार्यवादावर आधारित होती. त्यांचे शिक्षण हे खूप नसले तरी त्यांनी लाखो–करोडो लोकांना शिक्षण उपलब्ध करून दिले. शिक्षणाबरोबर विद्यार्थी हा स्वावलंबी बनला पाहिजे यावर भाऊराव पाटील यांचा फार जोर होता. स्वावलंबन, स्वाभिमान, स्वाध्याय आणि स्वातंत्र्य ही शिक्षणाची चतुःसूत्री त्यांनी आपल्या शैक्षणिक विचारामध्ये समाविष्ट केली होती. शिका आणि कमवा हा त्यांचा हेतू शिक्षणामधून साकार करण्यावर अधिक भर होता. परंतू तो फार मोठया प्रमाणामध्ये फलद्रूप झाल्याचे आढळून येत नाही.

बहुजन समाजाच्या उन्नतीकरिता त्यांनी शिक्षणाकरिता रयत शिक्षण संस्थेची स्थापना करून त्यांच्यामध्ये परिवर्तन घडवून आणण्याकरिता संपूर्ण आपले आयुष्य वेचले. आज रयत शिक्षण संस्था ही एक महान शिक्षण संस्था असून या संस्थेने समाजामध्ये आमूलाग्र बदल घडवून आणला आहे. त्यांनी आपल्या शिक्षण संस्थेमध्ये प्री–प्राथमिक शिक्षणापासून उच्च शिक्षणापर्यंत संस्था वृध्दिंगत केली. त्यांच्या शैक्षणिक कार्याचा आणि सामाजिक कार्याचा लाभ हा सर्व समाजाच्या हिताकरिता महत्वाचा ठरला. त्यांनी महाराष्ट्राच्या कानाकोपऱ्यात शिक्षणाची गंगोत्री पोहचविली. येणारी प्रत्येक पिढी त्यांच्या कार्याला सलाम करेल व त्यांना नेहमीच आठवणीत ठेवील. त्यांच्या कार्याला सलाम!

**संदर्भग्रंथ सूची**

1. प्रा. टाले प्रफू अशोक (2018), 'महाराष्ट्रातील समाज सुधारक', साई ज्योती पब्लिकेशन, कसारपूरा, नागपूर.
2. डॉ. कऱ्हाडे बी. एम. (2011), 'सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन' श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
3. डॉ. देवगांवकर एस. जी. (2009), 'सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
4. डॉ. घोरमोड के. यु., डॉ. घोरमोडे के. के., (2006), 'शैक्षणिक विचारवंत भारतीय व पाश्चात्य' विद्या प्रकाशन, रूईकर रोड, नागपूर.
5. https://mr.phondis.com.karmaveerbhauraopatil
6. https://mr.m.kikipedia.org
7. https://www.biographymarathi.com



Scanned with OKEN Scanner

# आधुनिक विदर्भाच्या महिला शिल्पकार

(सामाजिक व राजकीय परिप्रेक्ष्य)



संपादक

**डॉ. धनंजय सोनटक्के**

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# आधुनिक विदर्भाच्या महिला शिल्पकार


## संपादक

डॉ. धनंजय के. सोनटक्के

प्राध्यापक व समाजशास्त्र विभाग प्रमुख

प्रियदर्शिनी महिला महाविद्यालय, वर्धा


आधार नॅशनल पब्लिकेशन, अमरावती.

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# अनुक्रमणिका


| अ. क्र. | लेख | लेखक | पु.क्र. |
|---|---|---|---|
| १ | प्रस्तावना | डॉ. धनंजय के. सोनटक्के | १ |
| २ | प्रतिभाताई पाटिल एक राजकीय नेतृत्व | प्रा.डॉ.प्रशांत वामनराव खेडकर | ११ |
| ३ | आधुनिक विदर्भाच्या महिला शिल्पकार: डॉ. विभा गुप्ता | डॉ. प्रभाकर पुसदकर | ३५ |
| ४ | सत्यशोधक चळवळीच्या कृतीशील पाईक – शैलताई जैमिनी | प्रदीप ग. शेंडे | ५२ |
| ५ | पारोमिता गोस्वामी | डॉ जयश्री कापसे | ७१ |
| ६ | प्रेरणादायी सुमनताई बंग | डॉ. माधुरी झाडे | ८६ |
| ७ | तृतीय पंथी मोहिनी के जीवन व कार्य कि संघर्षगाथा | कु. दिव्या हरीश पारेकर | १०७ |
| ८ | अमरावती जिल्हयातील अचलपूर विधानसभा मतदारसंघाचे माजी आमदार वसुधाताई देशमुख यांचे राजकीय योगदान विश्लेषणात्क अध्ययन | डॉ.प्रशांत दि.सातपुते | १३४ |
| ९ | चिखली मतदारसंघ विकासाच्या शिल्पकार - आ. सौ. श्वेताताई महाले पाटील | प्रा. डॉ. अनंत मदन आवटी, | १४ |
| १० | डॉ. सीमा साखरे यांचा स्त्री चळवळीतील संघर्ष | प्रा.डॉ.कमलाकर पी. तागडे | १६ |
| ११ | डॉ.रजनी हजारे — एक अपराजिता | प्रा.डॉ.ज्योती प्रमोद राखुंडे | १८ |
| १२ | Dr Satyabala Tayal: A Pioneer In Social Work Education In Vidarbha | Dr. Jyoti Niswade, | १९ |


Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

# डॉ. सीमा साखरे यांचा स्त्री चळवळीतील संघर्ष

प्रा.डॉ.कमलाकर पी. तागडे
प्रमुख समाजशास्त्र विभाग डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर
मोबा. ९४२३६३४६५० Email : kptagde123@gmail.com

---

**प्रस्तावना :**

१५ ऑगस्ट १९३३ ला जिल्हा यवतमाळ येथील सोनेगाव या गावामध्ये डॉ. सीमा साखरे यांचा जन्म झाला. या सोनेगावमध्ये त्यांचे वडील लहानुजी तानबाजी आकोलकर शिक्षक होते. त्यांनी सीमा साखरेला बऱ्याच गोष्टींविषयी परिवर्तनवादी विचाराचे धडे दिले. स्वत:ची शैक्षणिक प्रगती, मुलांच्या जीवनाला आकार देण्यासाठी करावी लागणारी कसरत आणि बालपणापासून त्यांच्या मनामध्ये घट्ट दडून बसलेल्या स्त्री जीवनातील वेदना त्यांनी त्यांच्या आईच्या व समाजातील इतर महिलांच्या बघितल्यामुळे त्यांनी स्वत:च्या मनामध्ये त्यांच्या वेदनेला एक आवाज, एक हुंकार देण्याचे ठरविले. ज्या आवाजामध्ये स्त्रीयांच्या अधिकार आणि स्वातंत्र्य यांच्या गुणाकार असेल. स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी आपण चळवळ उभी केली पाहिजे हा विचार त्यांना मनोमनी बोचत रहायचा. शेवटी त्यांनी महिलांच्या अन्याय, अत्याचाराला एक आवाज म्हणून आपली चळवळ सुरू केली. फुले—आंबेडकरी विचारांवर आधारित, समता आणि न्यायाच्या या चळवळीमध्ये सीमा साखरे यांनी आपल्या जीवाची कधीही तमा बाळगली नाही. रात्रं—दिवस त्या महिलांच्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधात संघर्ष करीत राहल्या. स्त्रियांच्या स्वातंत्र्याच्या, न्यायाच्या, अधिकाराच्या आणि हक्काच्या गोष्टी हया पुरूषप्रधान समाजाला धमक्या वाटतात? परंतू सीमाताईंनी मात्र त्या दृष्टिकोनातून आपला लढा उभारला नाही. स्त्रियांनाही कुठेतरी मोकळा श्वास घेता यायला पाहिजे. विशेष म्हणजे ग्रामीण, असुरक्षित, अशिक्षित स्त्रियांच्या विकासामध्ये सीमाताईचा लढा योग्यपणे, यशस्वीपणे विदर्भातच नव्हे तर त्यांनी केलेल्या कार्याची दखल आंतरराष्ट्रीय पातळीवर घेण्यात आली. त्यांच्या विचारावरती गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, डॉ. आंबेडकर, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, डॉ. पंजाबराव



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

देशमुख, सानेगुरूजी, कमलाबाई होस्पेट, मदर टेरेसा, डॉ. मनमोहन वर्मा इत्यादि विचारवंताचा प्रभाव होता तसेच त्यांनी या सर्व महान लोकांना बघितले व त्यांचा संपर्क आला. पंडित जवाहरलाल नेहरू समवेत झेंडा वंदनाच्या कार्यक्रमाला हजर होत्या. तसेच त्या आंबेडकरांच्या धर्मांतर साहित्याचे ते साक्षीदार आहेत. त्यांच्या वडिलांनी त्यांना हा धर्मांतर सोहळा दाखविण्याकरिता बैलबंडीने नागपूरला आणले होते. असे मला त्यांनी मुलाखत घेतांना सांगितले. सन १९४२ मध्ये गांधीजींची चलेजावची चळवळीमध्ये असहकार म्हणून सीमा साखरे यांच्या वडिलांनी नोकरी सोडून दिली. लहानपणापासूनच त्यांना संघर्ष आणि परिवर्तन संकल्पनाविषयीचे अनुभव त्यांनी प्रत्यक्षपणे बघितले होते. त्यांनी लिहिलेल्या संग्राम या आत्मचरित्रामधून त्यांच्या चळवळीची प्रचिती प्राप्त होते.

विदर्भामध्ये स्त्रियांच्या अन्याय अत्याचाराला वाचा फोडण्याचे काम डॉ. सीमा साखरे यांच्या चळवळीने केले आहे. हे कुणीही नाकारू शकत नाही. स्त्रियांच्या न्याय, अधिकारासाठी उभी केलेली ही चळवळ आहे. या चळवळीने स्त्रियांना स्वत:ची एक ओळख, एक परिचय दिला आहे. ही चळवळ उभी करतांना डॉ. सीमा साखरे यांना अनेक प्रश्नांना सामोर जावे लागले, तरीही ताई डगमगल्या नाही. संसार सांभाळून अनेक स्त्रियांच्या अन्याय अत्याचाराला न्याय देण्यासाठी सीमाताईला खूप जिवाचा आटापिटा करावा लागला. स्त्रियांवरती फार मोठया प्रमाणात अत्याचार व्हायला लागले होते. विदर्भामध्ये अशा काही घटना घडल्या की त्या घटनांकरिता सीमाताईने स्वत:ला समाजातील दु:ख वेचण्याकरिता झोकून दिले. विशेषत: स्त्रीयांवर झालेले बलात्कार, अल्पवयीन मुलींवर अत्याचार व मृत्यू या विरोधात सीमाताई रात्रंदिवस झटत राहिल्या.

नागपूरातील मनोरमा हत्याकांड, २६ मार्च १९७२ रोजी घडलेल्या विदर्भातील देसाईगंज वडसा पोलीस स्टेशनमध्ये मथुरा नावाच्या १५ वर्षाच्या आदिवासी मुलींवर गणपत व तुकाराम या दोघा पोलीस शिपायांनी बलात्कार केला होता. त्यानंतर १९७८ मध्ये वरूडजवळ एका ६८ वर्षाच्या म्हातारीवर दोन तरूणांनी बलात्कार केला होता. १९८१ मध्ये नागपरूच्या एका पोलीस ऑफिसरविरूध्द लढा उभारला होता, त्याने एका नवविवाहितेवर बलात्कार केलेला होता. हैद्रबादला रमिझाबरोबर पोलिसांनी केलेल्या बलात्काराचे प्रकरण खूप



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

गाजत होते. त्या प्रकरणामध्ये सीमाताईच्या चळवळीने पूर्ण सहभाग दर्शविला. बिहारमधील माया त्यागी नावाच्या महिलेवर पोलीसांनी केलेल्या बलात्काराच्या केसमध्ये प्रत्यक्षपणे ताईने स्थळाला भेट देऊन संघर्षाची भूमिका स्वीकारली.

महाराष्ट्रामध्ये आणि महाराष्ट्राच्या बाहेर ही डॉ. सीमा ताईंनी आपले आंदोलन सक्रिय केले होते. त्यांनी भारतातील जवळपास १५०० केसेस करिता खूप मेहनत घेतली आणि सारखा पाठपूरावा करत राहिल्या. काही केसेसमध्ये आरोपीला निर्दोष सुटका व्हायची तर काही केसेसमध्ये आरोपींना शिक्षा पण झाली आहे. निर्दोष सुटलेल्या आरोपीविरूध्द त्या सुप्रिम कोर्टात जाऊन अन्याय झालेल्या महिलेविषयी न्याय मिळवून दिलेला आहे. अनेक अल्पवयीन, छोटया छोटया बालिकांना त्यांच्यात जवळच्या नातेवाईकांनी लैंगिक शोषण करून त्यांना मारून टाकले. अशा घटनांविषयी सीमाताईंनी आपली चळवळ निडरपणे उभी केली आणि त्या लढल्यात. आज ही त्यांनी ९० वी मध्ये पदार्पन केले आहेत, त्यांना अनेक पुरस्कारांनी, आंतरराष्ट्रीय पुरस्कारांनी सन्मानित करण्यात आले आहे. आजही त्यांच्यातील महिलांच्या अन्याय अत्याचाराविरूध्दचा आवाज तेवढाच ताकदीचा आहे. त्यांच्या चळवळीविषयीची माहिती आपणाला त्यांनी केलेल्या वेगवेगळया आंदोलनावरून निश्चितच प्राप्त होते. त्या कशा वाढल्या, त्यांच्या जीवनात कोणकोणते प्रश्न घडले, या सर्वांवरून त्यांच्या व्यक्तिमत्वाचा परिचय होतो.

**महान प्रबोधनकार संत गाडगेबाबांचा सहवास**

सीमा साखरे यांच्या जीवनात असे काही प्रसंग आणि घटनांमुळे त्यांना स्त्रियांच्या न्यायायकरिता तसेच स्त्रियांच्या अन्याय अत्याचाराच्या विरोधात लढा उभारला. कधी—कधी मान—अपमान सहन करावा लागला. तरी त्यांनी आपला लढा थांबविला नाही. याचे कारण म्हणजे त्यांना अशा काही वैचारिक विचारांचा सहवास लाभला त्यामुळे त्यांच्यामध्ये समाजाकरिता काहीतरी करण्याची ऊर्जा मिळाले याचे प्रथम कारण म्हणजे गाडगेबाबा हे कळंबला आले होते. ते गाडगेबाबांची वाट बघत असतांनाच, त्यांच्या पाठामगून गाडगेबाबांनी त्यांच्या डोक्यावर हळूवार स्पर्श करून म्हणतात काय ''अव पोरी काय पाहते?'' त्या म्हणाल्या गाडगेबाबांना पहायचे आहे, गाडगेबाबा म्हणाले, ''गाडगेबाबांना काय पहायचे माणसांसारखा माणूस'' ''शाळे



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

जाय, शिक, मोठी हो, ती पहा शाळा'' गाडगेबाबांनी सीमताईचा हात धरून शाळेत नेले. समोर उभ्या असलेल्या शाळेतील मास्तरीनबाईला म्हणाले, ''मास्तरीनबाई, हिले शिकवा, हुशार आहे ही.'' ''शाळेत जाऊन शिकल्याने मोठे होता येते'' हे गाडगेबाबांनी मनावर बिंबवल्याने सीमाताईनी पूर्ण हकीकत आपल्या आईला सांगितली. आई म्हणाली काय म्हणाले गाडगेबाबा. ''ते मला म्हणाले की, शाळेत जा, शिक आणि मोठी हो'' या गाडगेबाबांच्या संदेशामुळे सीमाताईच्या आईला पण वाटायला लागले होते की, मुलगी शिकली पाहिजे. पण थोडी चिंता वाटायची. सीमाताईच्या आई म्हणाल्या उद्यापासून ताक विकून शाळेत जात जा. सीमाताईची शाळा सुरू झाली याचा त्यांना फार आनंद झाला, जरी त्या डोक्यावर ताक विकून जात होत्या, पण त्याच त्यांना शल्य नव्हत कारण त्या हिम्मतवान होत्या. पाटी–पुस्तके मास्तरीनबाईनी दिले. गाडगेबाबांनी दाखविलेला मार्ग हा त्यांच्या जिवनातील ज्ञानाचा प्रकाश ठरला. या प्रकाशामुळे त्यांना समाजाच्या हिताकरीता काहीतरी करता आले याचा त्यांना सार्थ अभिमान आहे.

**डॉ. सीमा सारखे आणि महिला चळवळ :**

समाजातील स्त्रियांच्या वाटयाला आलेला अपमान, तसेच अन्यायकारक जगणे बघून महिलांच्या हिताकरिता, महिलांचा एक आवाज, उभा करण्याची आवश्यकता वाटली. या देशामध्ये जाती व्यवस्थेने इथल्या मातीमध्ये शोषणाची व अपमानाची अन्याय, अत्याचाराची बीजे पेरल्या गेली आहेत. ताई एक स्त्रीवादी आहेत. स्त्रीवाद हा एक स्वातंत्र्य, समानता आणि न्यायाची विचारसरणी आहे. या विचारसरणीने स्त्रीयांना बोलके केले आहे. ही विचारसरणी समाजातील होणाऱ्या शोषणाविरूध्द प्रश्न निर्माण करते. शोषणापासून मुक्तता करण्याकरिता नवीन मार्ग दाखविते. पुरूषप्रधान जेथे स्त्रियांचे शोषण केल्या जाते त्या शोषणाविरूध्द एक आवाज उभा राहिला पाहिजे, या देशामध्ये पुरूषांना जेवढे अधिकार आहेत, तेवढेच अधिकार भारतीय संविधानाने महिलांना दिले आहेत. मग पुरूष वर्गाकडून महिलाचे शोषण का करण्यात येते. या प्रश्नाला निरूत्तर करण्यासाठी ही चळवळ उभी केली आहे. डॉ. सीमाताई स्पष्टपणे सांगतात. आज महिला स्वत:च्या अधिकाराचा वापर करून न्याय मागून राहिल्यात, पोलीस यंत्रणेचे आणि न्यायव्यवस्थेचे स्वतंत्रपणे दार ठोठावू लागल्यात आहे. स्वत:वरील अन्यायाविरूध्द आवाज उठविण्याची जी काही



Scanned with OKEN Scanner

प्रमाणात जागृती स्त्रियांमध्ये आली ते या चळवळीचे यश आहे असे म्हणणे अतिशयोक्ती होणार नाही. स्त्रियां जेव्हा स्वत:ला व्यक्ती समजू लागतील, माणूस समजू लागतील आणि स्वतंत्रपणे जगण्याची हिम्मत ठेवतील तेव्हाच खऱ्या अर्थाने स्त्रीचळवळीची एक ताकत म्हणून पुरूषासमोर उभी होणार. असा विचार त्यांनी स्पष्ट केला आहे.

या देशामध्ये आपणाला असे दिसून येते की, स्त्रीला कधीच स्वतंत्र व्यक्ती म्हणून समजले गेले नाही. मातृत्वाच्या भूमिकेमध्येच तिला नेहमी आपले आयुष्य खर्च करावे लागले. शिक्षणापासून तसेच अनुभवापासून स्त्री वंचित राहिली त्यामुळे ती आर्थिकदृष्टया कमकूवत होत गेली व परावलंबीही झाली. अनेक समाजसुधारकांनी स्त्रियांच्या शिक्षणाचा, स्वातंत्र्याचा व न्यायाचा विचार समाजामध्ये पेरला परंतू अजूनही समाजामध्ये पाहिजे त्या प्रमाणात महिलांच्या अन्याय अत्याचारा विरोधात जनजागृती आढळून येत नाही. येथील भारतीय समाज हा पुरूषप्रधान संस्कृतीला अधिक महत्व देतो. पुरूषांना अनेक बाबतीत स्वातंत्र्य आहे, मुलांनाही स्वातंत्र्य दिसून येते परंतू स्त्रियांना तसेच मुलींना अनेक गोष्टींच्या बाबतीत अनेक प्रकारची बंधने आढळून येतात. परिवर्तनाच्या क्षेत्रात कुठेही बघितले तरी स्त्रिया कमी नाहीत. अनेक प्रकारच्या शोध व संशोधन कार्यातही स्त्रिया कमी नाहीत, राजकारणी, लेखिका, पत्रकार, प्राध्यापक, कुलगुरू, शास्त्रज्ञ आदि वेगवेगळया प्रकारची पदे प्राप्त करून स्त्रियांनी त्यांच्यातील कर्तबगारीपणा पुरूषप्रधान संस्कृतीला दाखवून दिला. परंतू या पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये अजूनही स्त्रियांना पाहिजे त्या प्रमाणामध्ये समाजामध्ये मानाचे स्थान प्राप्त झाले नाही. पुरूषप्रधान संस्कृतीमध्ये महिलांना किती घुटमळत जीवन जगावे लागते. आपण किती दिवस अन्याय सहन करीत जीवन जगायचे हा प्रश्न प्रत्येक स्त्रीने स्वत:ला विचारला पाहिजे. स्त्रियांच्या मनात परिवर्तनाचे विचार रूजविण्याकरिता सीमा साखरे यांनी महिलांमध्ये चर्चा घडवून आणल्यात. समविचारी, मैत्रीणीचे एक संघटन यामधून निर्माण झाले. या संघटनेच्या समोर स्त्रियांवरती जे अन्याय, अत्याचार, लैगिंक छळ हया घटना घडत होत्या, या घटनामुळे सीमताईनी अत्याचाराच्या नोंदी करणे सुरू केले. अन्यायाविरूध्द लढण्याकरिता डॉ. सीमा साखरे यांनी महिलांच्या हिताकरिता संघटन उभे केले. या संघटनाने खूप मेहनम करून अन्याय अत्याचार पिडीत महिलांना न्याय मिळवून दिला आहे. वेळप्रसंगी डॉ.



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

सीमाताई यांनी सुप्रिम कोर्टात सुध्दा प्रत्यक्षपणे जाऊन न्यायाधीशाची परवानगी घेऊन काही क्रिटीकल केसेसना न्याय मिळवून दिला आहे. १९७५ पासून सुरू झालेले ताईंचे हे संघटन १९८० पर्यंत बऱ्याच प्रमाणात विस्तृत झाले व चर्चेत आले.

**स्त्रियांच्या न्यायाकरिता वर्तमान पत्रातून लेखन :**

डॉ. सीमा साखरे यांनी १९७८ मध्ये प्रसिध्द दैनिक लोकमतचा 'मधुमालती' नावाचा स्त्रियांकरिता कॉलम सुरू करण्यात आला. या लिखाणामुळे स्त्रियांच्या विचारांमध्ये परिवर्तन, जनजागृती करण्याचा प्रयत्न करण्यात आला. अजिबात काही न शिकलेल्या स्त्रियांना सुध्दा त्यांच्या जीवनातील उणिवांच्या जाणिवा होऊ लागल्या होत्या. चार भिंतीच्या आतच आनंद शोधणाऱ्या स्त्रियांनाही हळूहळू या कॉलमकडे लक्ष देऊन अन्याय अत्याचाराच्या विरोधामध्ये ताईंनी आपली चळवळ उभी केली. मोठया प्रमाणात स्त्रियां बोलू लागल्यात. जीवनाबद्दल विचार करू लागल्यात. घरामध्येच आनंद मानणाऱ्या स्त्रियांनीही जीवनाला आकार देता येते, केवळ कुटुंबामध्येच नवऱ्याकडून मारहान किंवा कुटुंबातील इतर व्यक्तीकडून छळ सहन किती दिवस करायचा अशा प्रकारचा विचार स्त्रियांच्या मनामध्ये यायला लागला. इतर महिलांच्याच जीवनातील होणारे अन्याय अत्याचार या विषयी स्त्रीया आता काही बोलण्याकरिता तयार होऊ लागल्या. स्त्रीयांवरील अत्याचाराला समाजासमोर मांडणे हे इतके साधे सरळ काम नव्हते. परंतु डॉ. सीमा साखरे आणि त्यांचे इतर सदस्य या सर्व लोकांनी ही चळवळ अतिशय प्रामाणिकपणाने उभी केली.

**अत्याचाराविरूध्दची पहिली लढाई**

मिश्रा, शुक्ला यांना मंत्रांनी शिक्षणाच्या काही योजना आखल्या. त्यामध्ये असे होते की, जे शिक्षक होणार (डी.टी.) (Dipoma in Teaching) त्या सर्व डी.टी.च्या प्रशिक्षणार्थ्यांना प्रौढ शिक्षणाचे वर्ग चालविणे सक्तीचे होते. ही सर्व शिबिरे उन्हाळयाच्या काळामध्ये खेडोपाडी आयोजित केली जात होते सीमाताईंनी सुध्दा एक कॅम्प एका खेडयात लावून घेतला, त्यांची यमू नावाची एक मैत्रीण त्यांच्याबरोबर होती. या कॅम्पची तपासणी करायला एक ॲडिशनल डिस्ट्रिक्ट इन्स्पेक्टर ऑफ स्कूल येत होता. त्याने आपल्या अधिकाराचा वापर करून यमूसोबत सलगी करण्याचा प्रयत्न केला. यमूला तो अधिकारी छळतो असे यमूने सीमाताईला सांगितले, या कॅम्पवर



Scanned with OKEN Scanner

सिमाताईचे बरेच भावंडे व नातेवाईक होती. ताईने त्या ऑफीसरला धमकावले, ''साहेब इथे यमू एकटी नाही, आम्ही दोघे आहोते. यमूची तुमच्याबद्दल तक्रार आहे'' पण तो निर्लज्ज अधिकारी काहीतरी बहाणे शोधून त्यांचा पाठलाग करायचा. एक दिवशी त्याने यांच्या कॅम्पची मिटिंग रात्रीला ठेवली. तरीपण सीमाताई घाबरल्या नाहीत. ताईने यमूला धीर दिला. तेवढयातच तो अधिकारी तिथे आला आणि मी पण येतो म्हणून त्यांच्या बैलबंडीमध्ये जबरदस्तीने बसला. त्याने यमूला स्पर्श करताच सिमाताईने त्याला धमकावले व त्याचा हात झटकला. अंधारामध्ये सिमाताई व यमू पायी चालू लागल्या तो अधिकारी बैलगाडीतून उतरेना. शेवटी सिमाताईने त्या अधिकाऱ्याला बैलबंडीतून हात धरून बाहेर ओढले. सीमाताईला आणि तिच्या मैत्रीनीला कॅम्प अर्ध्यातून सोडावा लागला. त्यांनी घरी जाऊन आपल्या वडिलांना सर्व हकीकत सांगितली. वडिलांनी त्यांना सहकार्य करून रिपोर्ट देण्यात आली. त्या ऑफिसरची चौकशी झाली व त्याला निलंबीत करण्यात आले. येथूनच सीमाताईला अन्याय अत्याचाराविषयी न्यायाची दरवाजे उघडे कसे करावे लागतात या विषयीची त्यांना माहिती व हिंमत मिळाली.

**बलात्कारविरोधी मंचाची स्थापना केली :**

स्त्रीयांवरील जे अन्याय अत्याचार त्यांच्याच कुटुंबाकडून होत होते किंवा समाजातील इतर लोकांकडून महिलांवरती अन्याय, अत्याचार, बलात्कार इत्यादी घटना दिवसेंदिवस भारतभर घडत होत्या, लहान मुली वासनेच्या बळी ठरायच्या, अनेक स्त्रियांना हुंडयाकरिता त्यांच्या सासरच्या लोकांकडून व पतीकडून नेहमी छळ व्हायचा या त्रासाला कंटाळून अनेक स्त्रियांनी आपली जीवनयात्रा संपविली. हया सगळया घटना डॉ. सीमाताईना झोपू देत नसत. २६ मार्च १९७२ रोजी विदर्भातील देसाईगंज वडसा येथील पोलीस स्टेशनमध्ये मथुरा नावाच्या १६ वर्षाच्या आदिवासी मुलींवर तेथील गणपत व तुकाराम या दोन पोलीसांनी बलात्कार केला होता. जून १९७४ मध्य जेव्हा चंद्रपूरच्या जिल्हा आणि सेशन कोर्टसमोर मथुरावरील बलात्काराची केस सुनावणीकरिता आली तेव्हा न्यायाधिशांनी केसचा निकाल उलटा दिला. ते म्हणाजे मथुरावर बलात्कार झालाच नाही. ती (मथुरा) खोटारडी आहे आणि तिचा व पोलीसांचा शरीरसंबंध झालाही असेल तरी तो तिच्या मर्जीनेच झाला असावा, असे म्हणून त्या दोन पोलीस शिपयांना



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

बलात्काराच्या अपराधामधून मुक्त केले होते. परंतु डॉ. सीमाताईंनी ही केस नागपूरच्या हायकोर्टसमोर रिव्हयूकरिता आणली. नागपूरच्या उच्च न्यायालयाने या केसमध्ये गणपत आणि तुकाराम या दोन्ही पोलीस शिपायांना सजा सुनावली, हे सीमाताईच्या स्त्री अत्याचाराविरूध्द लढण्याच्या प्रयत्नाचे पहिले यश होते. त्यामुळे नागपूरातील ८० स्त्री संघटनांना एकत्र करून सीमाताईंनी बलात्कार मंचाची स्थापना केली.

**अश्लील साहित्याचा निषेध :**

सीमाताईच्या चळवळीने स्त्रीयांवर होणाऱ्या अन्या, अत्याचाराच्या विरोधामध्ये अश्लील साहित्याचा निषेध केला आहे. स्त्रियांच्या सन्मानाला इजा पोहोचविणारे साहित्याच्या विरोधामध्ये ताईच्या अन्याय अत्याचार परिषदेने तीव्रपणे प्रतिकार केला. थिएटरवरची अश्लील पोस्टर्स फाडलीत. भोगसम्राटसारख्या नाटकाचे प्रयोग बंद पाडलेत. ब्यलू लगून चित्रपटातील अश्लील पोस्टर्सचे सार्वजनीकरित्या होळी केली. मारली लाईन तर तबियत फाईन या सारख्या नाटकावर बहिष्कार टाकला. एकंदरीत स्त्रियांविरूध्द अपप्रचार करणाऱ्या साहत्यांचा चळवळीद्वारे निषेध करण्यात आला.

**स्त्री अत्याचाराविरोधी परिषदेती स्थापना :**

स्त्रीयावरील अत्याचाराच्या वाढत्या घटना लक्षात घेऊन १९८१ मध्ये बलात्कार विरोधी मंचाच्या कक्षा वाढविण्यात आल्या. स्त्रियावरील वाढत्या अत्याचारांविषयी विचार आणि कृती करण्याकरिता स्त्री अत्याचार विरोधी परिषदेची स्थापना सीमाताईने केली. या परिषदमध्ये विदर्भाबाहेरील महाराष्ट्रातील प्रसिध्द सामाजिक कार्यकर्त्या गेल ऑम्वेट, सौदामिनी राव, मेरून्निसा दलवाई, मुमताज राहमतपुरे तसेच कोल्हापूर, सांगली, सातारा, रत्नागिरीपासून सामाजिक कार्यकर्त्या स्त्रियांना या परिषदेला आमंत्रित करून एक मोठी संघटना बनविण्यात आली. या संघटनेचे 'स्त्री अत्याचार विरोधी परिषद' असे नाव ठेवण्यात आले.

**हुंडा विरोधी चळवळीविषयी जनजागरण व आंदोलने :**

स्त्री अत्याचार विरोधी परिषदेच्या स्थापनेनंतर सीमाताईकडे स्त्रियांवरील अत्याचारांविषयी वेगवेगळया प्रकारच्या केसेस यायला लागल्या. १९८१ मध्ये जून महिन्यात आर्वी येथे चांदा चोरडिया नावाच्या १८ वर्षाच्या नववविाहित तरूणीला तिच्या सासरच्या लोकांनी विवाहाच्या पाचव्या दिवशी चांदीची काही भांडी हुंडयाच्या रूपाने



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

मिळाली नाही म्हणून तिला जिवंत जाळले गेले. ही तरूणी जेव्हा होती तेव्हा ती बचाव बचाव असे म्हणत शेकडो लोकांनी तिला पाहिले. नागरीकांनी न्याय मागण्याकरिता पाचारण केले. १९८५ पर्यंत सीमाताईकडे हुंडयासाठी जळालेल्या नवविवाहित तरूणींच्या १२०० केससेचे सर्वेक्षण, एक धक्कादायक सर्वेक्षण तयार झाले होते. नैरोबी येथे तिसऱ्या जागतिक महिला परिषदेमध्ये सीमाताईंनी नवविवाहित तरूणी ज्या हुंडयाकरिता जळालेल्या होत्या त्यावर भाष्य करून तेथील महिलांचे लक्ष वेधून घेतले. सीमाताईच्या चळवळीने समाजामध्ये जागृती निर्माण व्हायला लागली होती. काही मुली हुंडा मागणाऱ्या नवरदेवाला लग्नाकरिता नकार देऊन पोलीसांना लग्न मंडपामध्ये आमंत्रित करून नवरदेवाला अटक करण्यात यशस्वी झाल्यात. आंधप्रदेशातील एक घटना म्हणजे धर्मावरमच्या कोटीनामणी या पदवीधर तरूणीची सासरच्या लोकांनी जाळून हत्या केली, ही हत्या आंधप्रदेशामध्ये फार गाजली. एका कार्यकर्त्याने ही केस ताईकडे सोपविल्यानंतर ताईने ही केस चालवून आरोपींना सजा करण्यास भाग पाडले. मध्यप्रदेशातील रायपूर, बिलासपूर, छिंदवाडा येथील हुंडाबळीच्या केसमध्ये येथील पोलीसांचे सहकार्य लाभल्यामुळे घटनांना न्याय देता आला. १९८१ तेग १९९० ही दहा वर्षे हुंडा विरोधी चळवळीविषयी फार चर्चीत होती.

**अंधश्रध्दा विरूध्द तीव्र लढा :**

सीमाताई साखरे यांच्या चळवळीचा मुळ उद्‌देश हा होता की, स्त्रियांविरूध्द जे अन्याय अत्याचार होत होती त्या अन्याय अत्याचारांची कारणे शोधून काढण्याचा प्रयत्न केला. समाजामध्ये रूढी आणि परंपरा यांचे प्राबल्य फार जास्त आहे. त्या आधारे समाजामध्ये अंधश्रध्दा जन्म घेतला. अंधश्रध्देच्या आधारेही स्त्रियांवरती समाजातील भोंदू लोक अन्याय अत्याचार करतात. त्या अत्याचाराचा या चळवळीने पूर्ण ताकदीने प्रतिकार केला. याचे एक उदाहरण म्हणजे, बुलडाणा जिल्हयात चिखलीजवळ दीर्घकाळापासून वसलेल्या सैलानी दर्ग्यात स्त्रियांचे लैंगिक शोषण फार मोठया प्रमाणात होत होते. परंतू ते धार्मिक स्थळ असल्यामुळे लोकांच्या मनात किंतू परंतू येत नव्हते. परंतू लोकांच्या या अंधश्रध्देमुळे कोणीच बोलत नव्हते. १९८४ मध्ये बबीता सोमानी नावाच्या एका नवविवाहित तरूणीवर दर्ग्यातील मुजावरची मुले आणि त्यांचे नातलग या सर्वांनी त्या तरूणीवर



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

बलात्कार करून खूण केला. सीमाताईनी दर्ग्यात जाऊन संपूर्ण चौकशी करून हे प्रकरण न्यायायलयापर्यंत पोहाचवले. त्या निमित्ताने तेथील २६५ झोपडयांची वसाहत उचलावी लागली आणि तेथे येणाऱ्या वेडसर महिला आणि अन्याय करणाऱ्या लोकांवरती वचक बसविला इतक्या ताकदीने सीमाताईने आपली चळवळ चालविली आहे.

**मृत्यूयात्रेला निघालेल्या नऊ नन्स :**

सन १९८७ मध्ये आंधप्रदेशातील एल्लोर येथे एका बंद मॉनिस्ट्रीत नऊ गरीब नन्सना तेथील धर्मगुरूने जिवंत समाधी देण्याचे कटकारस्थान रचले होते. त्याला मॉनिस्ट्री तोडण्याचे आव्हान देऊन आंधप्रदेशचे गव्हर्नर कुमुदबेन जोशीच्या मार्फत त्या मिनिस्ट्रीत कायद्याचा आधार घऊन सीमाताईने प्रवेश केला. मॅजेस्ट्री तोडली गेली आणि मृत्युमार्गाला निघारलेल्या त्या नऊ नन्सला जिवंतपणे सुटका करण्यात आली.

**मनोरमा कांबळे : बलत्कार आणि हत्याकांड :**

१४ फेब्रुवारी २००९ ला छिंदवाडा न्यायालयाने बलात्कार—खून खटल्याच्या संदर्भात जो निर्णय दिला तो धक्कादायक होता. १९९४ च्या रंगपंचमीच्या दिवशी मनोरमा कांबळे देवानीच्या घरी कामाला गेली, ती बाहेरच्यांना पुन्हा जिवंत दिसलीच नाही. लहान मुलांची आई आपल्या मुलांना अचानकपणे सोडून जाते अर्थात तिला तिच्या संसारातून कायमचे उठविले जाते. पोलीसांनी घटनेचा पंचनामा न करताच तिचे प्रेम पोस्टमार्टमसाठी मेयो हॉस्पीटलला कुलरचा धक्का लागुन ती मेली असे सांगून पाठविले होते. पण पोस्टमार्टम करणाऱ्या डॉक्टरच्या लक्षात आले की, मनोरमावरती बलात्कार झालेला आहे आणि तिचा गळा दाबून खून झालेला आहे. मनोरमाच्या केसमध्ये देवानीच्या घरात जाऊन त्यांना मनोरमाच्या खूनाविषयी जाब विचारणारी डॉ. सीमाताई ही पहिली कार्यकर्ती होती. हे आंदोलन बरेच दिवस चालले. ८१ साक्षीदारांची साक्ष या खटल्यात नोंदविण्यात आली होती. देवानीच्या घरातूनच मनोरमाचे प्रेत बाहेर काढण्यात आले होते. मनोरमाच्या निमित्ताने दलित संघटनांनी फार मोठे जनआंदोलन उभे केले. यामध्ये वा. को. गाणार यांनी फार महत्वाची भूमिका बजावली. मनोरमा कांबळे हे प्रकरण न्यायाकरिता छिदंवाडाच्या कोर्टामध्ये नेण्यात आले होते. या केसेसकरिता सीमाताईनी बराच प्रवास केला. आरोपींना पाहिजे त्या प्रमाणात शिक्षा झाली नाही.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

**इंदोरची साध्वी इंद्रप्रथा जैनला सुरक्षितता मिळवून दिली :**

इंद्रप्रभा जैन या नावाच्या तरूण साध्वीला १९८७ मध्ये पळविण्यात आले होते. या प्रकरणाच्या विरूध्द इंदौर आणि माळवा भागातील जैनांनी फार मोठया प्रमाणावर तीव्र आंदोलन केले होते. वास्तविकत: अशी होती की, या साध्वीला वैवाहिक जीवन जगायचे होते. एक तर ती वयाने तरूण होती. त्यामुळे तिने तो निर्णय घेतला असावा, परंतू समाजामध्ये या प्रकरणाविषयी आगळेवेगळे बोलले जात होते. या तरूणीने स्वत:चा तो माझा प्रोटेक्टर आहे म्हणून तिने स्वत:च पोलीस स्टेशनमध्ये गेली होती. या मुलीला कायद्याची मदत देऊन तिचे पूनर्वसन करण्याकरिता सीमाताईची चळवळ खंबीरपणे उभी राहिली.

**सारांश :**

डॉ. सीमाताई साखरे यांनी स्त्रियांच्या जीवनाला एक वेगळया प्रकारच्या उंचीवर नेले. स्त्री जीवनातील वेदनांसाठी काहीतरी केलेच पाहिजे या जिद्दीने व पोटतिडकिडीने स्वातंत्र्य, समता आणि सामाजिक न्यायासाठी चालविलेली डॉ. सीमा साखरे यांची चळवळ खरच संपूर्ण भारतामध्ये एक आगळीवेगळी चळवळ आहे. त्यांनी अनेक आंदोलने केलीत. येथे संपूर्ण आंदोलनाचा उल्लेख करणे शक्य नाही. आजही त्यांच्या विचारांची धार कमी झालेली नाही. त्यांनी आपल्या उभ्या आयुष्यात कुणालाही न डगमगता स्त्रियांच्या अन्याय, अत्याचाराच्या विरोधामध्ये जे रणशिंग फुंकले ते विचाराधीन आहे. एक महिला काय करू शकते, याचे जिवंत चित्रण डॉ. सीमा साखरेची महिला चळवळ होय. या चळवळीने अनेक मुली आणि निराधार महिलांचे पूनर्वसन केले आहे. त्यांच्या कार्याला सलाम!

**संदर्भग्रंथ सूची :**

१) डॉ. साखरे सीमा (२००८), 'संग्राम' (आत्मचरित्र), सीमा प्रकाशन, कोतवाल नगर, नागपूर.
२) डॉ. साखरे सीमा (२००८), 'न्याय हवा स्त्रीला', सीमा प्रकाशन, कोतवाल नगर, नागपूर.
३) डॉ. साखरे सीमा (२०१०), 'आमची पस्तीस वर्षाची वाटचाल', सीमा प्रकाशन, कोतवाल नगर, नागपूर.
४) डॉ. साखरे सीमा (२०११), 'कुंतीच्या लेकी', सीमा प्रकाशन, कोतवाल नगर, नागपूर.



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

आज़ादी का अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor: 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 8, Vol.I, Issue-LXVIII, 1 October 2022



# Thoughts and Works of Indian Social Reformers

## भारतीय समाजसुधारकांचे विचार व कार्य



Editor in Chief
**Dr. Ramkishan N. Dahiphale**

## Quarterly Research Journal

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 72. | पेरियार रामस्वामी यांचे भारतीय समाज सुधारणेतील योगदान | प्रा. डी. एन. रिठे | 271 |
| 73. | सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य | डॉ. वनिता सावळे | 274 |
| 74. | सामाजिक चळवळीतील समाजसुधारकांचे योगदान | डॉ. शिला सखाराम सहाने | 277 |
| 75. | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टिकोन | प्रा. संतोष जाधव येंडाळकर | 280 |
| 76. | महात्मा जोतीबा फुले यांच्या मराठी साहित्यातील सामाजिकता | प्रा. डॉ. संतोष देशमुख | 285 |
| 77. | समाजसुधारकांचे शिक्षणविषयक विचार | प्रा. सौ. कांबळे सुनिता शंकरराव | 289 |
| 78. | सामाजिक चळवळीतील समाज सुधारकांचे योगदान | प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे | 294 |
| 79. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचारासंबधीचा दृष्टीकोन | डॉ. बबन आमले | 301 |
| 80. | मानवमुक्तीसाठी वर्णव्यवस्थेला छेद करणारे संत साहित्य | डॉ. मथुरा मेवाड | 304 |
| 81. | भारतातील ग्रंथालय चळवळ आणि स्त्री उद्धारासाठी समाजसुधारकांचे योगदान | स्वप्ना प्रकाश गायकवाड<br>डॉ. पल्लवी ज्ञानोबा मुंढे | 308 |
| 82. | महात्मा गांधी यांचे सामाजिक व राजकीय कार्य | डॉ. सुनील गुलाबराव पिंपळे | 311 |
| 83. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठी साहित्याला योगदान | प्रा. डॉ. सर्वगोड एन. सी. | 314 |
| 84. | बंजारा समाज सुधारक : संत सेवालाल महाराज | प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव | 318 |
| 85. | महात्मा ज्योतिराव फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य | प्रा. राजकुमार मोरे | 322 |
| 86. | समाजसुधारक आणि स्त्री शिक्षणाचा लढा | प्रा. सुनिल आर. बाघमारे | 325 |
| 87. | भारतीय अर्थव्यवस्थेत समाजसुधारकांचे योगदान | डॉ. रामेश्वरी नरेशराव कमठम | 329 |
| 88. | भारतीय महिला समाज सुधारक पंडिता रमाबाई यांचे विचार व कार्य | डॉ. अब्दुलसमद बादशहा शेख | 333 |
| 89. | समाजसुधारकांचा समासुधारणेच्या कार्याचा आढावा – लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज! | प्रा. वंदना शामराव खोराटे | 337 |




Scanned with OKEN Scanner

# सामाजिक चळवळीतील समाज सुधारकांचे योगदान

प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे
प्रमुख समाजशास्त्र विभाग
डॉ. म. वा. पी. डब्ल्यू. एस. कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**गोषवारा :**

सामाजिक चळवळ हा एक सामुहिक प्रयत्न आहे. या सामुहिक प्रयत्नामुळे मानवी समाजामध्ये परिवर्तन घडवून आणता येते. त्याकरिता आपल्याला चळवळ निर्माण करून समाजातील लोकांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मानवी मुल्यांचा उपयोग सर्वांना झाला पाहिजे असा विचार हा कल्याणकारी चळवळीचा असतो. ह्या कल्याणकारी चळवळी समाज सुधारकांनी निर्माण करून समाजामध्ये लोकउपयोगी कार्य केले आहेत. त्यामुळे समाजाला आपला सामाजिक, आर्थिक, राजकीय, सांस्कृतिक दर्जा उंचावता आला. समाजातील प्रत्येक घटकाला शोषणमुक्त जीवन जगता यावे. प्रत्येकाला स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मानवी मुल्ये मिळावी. त्याकरिता धर्म, जात, वंश, लिंग, भेद या गोष्टींच्या पलीकडे जाऊन तार्किकतेच्या आधारावर समाजामध्ये परिवर्तन करण्याकरिता समाज सुधारकांनी अहोरात्र प्रयत्न केलेत. त्यांनी समाजमन जपले, आयुष्यभर समाजाच्या हिताकरिता स्वतःच्या कुटुंबाकडे लक्ष न दिल्याने त्यांच्या कुटुंबावरती आभाळ कोसळले, तरी या समाज सुधारकांनी लोककल्याणाचे कार्य थांबविले नाही. पेशवाईचा नायनाट होऊन महाराष्ट्रामध्ये ब्रिटिश सत्ता प्रस्थापित झाली. 1819 ते 1827 या काळामध्ये ब्रिटिश सत्तेची मजबूत पकड होती आणि त्या काळात समाजव्यवस्था ही जातीभेद, लिंगभेद, बालविवाह, सती पध्दती, अंधश्रध्दा ह्या अनिष्ट रुढी परंपरांनी ग्रासलेला होता. त्यामुळे समाज सुधारकांनी लोकांचे सामाजिक मानसिक, बौध्दिक स्वास्थ्य टिकविण्याकरिता सुधारक कार्य करणे सुरु केलेत. याकरिता इंग्रजांनी सहकार्य करून योग्य पध्दतीने प्रशासन केल्यामुळे समाज सुधारकांच्या कार्याला गती प्राप्त झाली. ब्रिटिश सत्तेची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये आधुनिकतेची पायाभरणी करण्याचे कार्य माऊंट स्टूअर्ट एलफिंस्टन यांनी केले.

**प्रमुख शब्द :**

सामाजिक चळवळ, समाज सुधारक, जातीभेद, लोककल्याणकारी, प्रस्थापित व्यवस्था.

**प्रस्तावना :**

भारतातच नाही तर संपूर्ण विश्वामध्ये जेव्हा आपण समाज व्यवस्थेतील परिवर्तनाविषयी बोलतो तेव्हा आपल्याला परिवर्तनवादी विचाराला अभिवादन करावेसे वाटते. कारण या समाजातील परिवर्तन ही कोणत्याही दैवीदेवतेने घडवून आणली नाहीत. वर्तमान युगातील समाजामध्ये जे परिवर्तन आपणाला दिसते आहे त्या परिवर्तनामध्ये समाज सुधारकांच्या प्रयत्नांची बीजे पेरल्या गेली आहेत. त्यांनी आपल्या कुटुंबाकडे लक्ष न देता समाजाकडे लक्ष दिले. समाजाच्या हिताकरिता काही समाज सुधारकांनी संघटना आणि साहित्याची निर्मिती केली. प्रस्थापित समाजव्यवस्था जेव्हा समाजातील इतर घटकांचे शोषण करते तेव्हा समाजातील इतर घटक एकत्र येऊन सामुहिक कृतीद्वारे प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधामध्ये मोर्चे, संप, संघटन उभे करतात. या सामुहिक कृतीच्या माध्यमातून त्यांना शोषण करणाऱ्या व्यवस्थेला संपवायचे असते. या सामुहिक कृतीला एक विचार असतो, एक उद्दिष्ट असते, एक स्वप्न बघायचे असते की, समाज व्यवस्थेमध्ये श्रेष्ठ–कनिष्ठता, असमानता, विषमता या गोष्टींना मुल्य मानणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेला पुन्हा निर्माण न होऊ देणे किंवा मानवतेला डिवचणाऱ्या व्यवस्थेला कधीच जन्म घेऊ न देणे. समाज व्यवस्थेमध्ये काही विशिष्ट घटक हे स्त्रिया, पुरुष, दलित, श्रमिक यांचे शोषण करीत असतात. समाजामध्ये सर्वच माणसे असताना काही माणसांना माणुसकीपासून दूर लोटल्या गेले. अशा वेळी समाजातील समाज सुधारकांचे योगदान हे अतिशय महत्वाचे ठरले. शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, पेरियार रामास्वामी, महात्मा गांधी, ताराबाई शिंदे, लोकहितवादी, न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, कर्मवीर भाऊराव पाटील, शिवराम जानबा कांबळे, प्रबोधनकार ठाकरे इत्यादी सुधारकांच्या कार्यामुळे समाजातील लोकांना मानसन्मानाचे जीवन जगता आले.

**अध्ययनाची उद्दिष्टये :**

- समाज सुधारकांच्या चळवळींविषयी परिचय करणे
- समाज सुधारकांनी केलेल्या योगदानामुळे समाजव्यवस्थेतील परिवर्तनाचा आढावा घेणे

अध्ययन पध्दत :

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे. वर्तमानपत्रातील लेख, सुधारकांचे लिखित साहित्य, अहवाल, डायरी इत्यादिंचा उपयोग करण्यात आला आहे.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

**साहित्य समिक्षा :**

डॉ. एस. जी. देवगावकर यांनी 'सामाजिक चळवळी' परंपरागत आणि नवीन या पुस्तकामध्ये सामाजिक चळवळीविषयी आपले विचार व्यक्त केले आहे. या पुस्तकामध्ये त्यांनी सामाजिक चळवळीचे दृष्टिकोन तसेच वेगवेगळ्या प्रकारच्या चळवळींचा आढावा घेतला आहे. समाज सुधारकांच्या कार्याविषयी अल्प प्रमाणात शोध घेतला आहे.

डॉ. बी. एम. कराडे लिखित समाजिक चळवळीचे समाजशास्त्र या ग्रंथामध्ये विविध प्रकारच्या चळवळीविषयी भाष्य केल्याचे दिसून येते. सामाजिक सुधारकांचा योगदानाविषयी आपणाला काही प्रमाणामध्ये माहिती दिसून येते.

प्रा. प्रफुल अशोक टाले यांनी महाराष्ट्रातील समाज सुधारक या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील समाज सुधारकांचा परिचय तसेच त्यांनी केलेल्या कार्याचा अल्प प्रमाणात विश्लेषण केले आहे.

सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळ या पुस्तकामध्ये डॉ. सुधा काळदाते, डॉ. नारायण चौधरी, प्रा. अविनाश डोळस, डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रा. अरूणा पेंडसे इत्यादि लेखकांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे प्रकाशित झालेल्या पुस्तकामध्ये मुक्त व्यक्तिगत विचार मांडले असून या प्रकरणामध्ये सुधारकांच्या चळवळी व योगदानाविषयी सखोल असे विश्लेषण दिसून येते. परंतू काही महत्वपूर्ण पैलू आणखी अध्ययनाच्या दृष्टिकोनात आवश्यक आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महत्वपूर्ण पैलूचा समावेश करून समाज सुधारकांच्या चळवळी व योगदानाचा नवीन पिढीला परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक चळवळींचे प्रकार :**

काही समाजशास्त्रज्ञांच्या मते सामाजिक चळवळीमध्ये इतर चळवळीही समाविष्ट असतात. इतर चळवळीचे स्थान वेगळे असतात. त्यांचा दृष्टिकोन हा असतो की, राजकीय बदल घडवून आणणे, मागासवर्गीय चळवळीचे उद्दिष्ट हे असते की, त्यांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दर्जा उंचावणे. 'रूडाल्फ' या प्रसिध्द विचारवंताने असे म्हटले आहे की, 'प्रत्येक चळवळ ही राजकीय आहे. कारण प्रत्येक चळवळीतील सभासद हा राजकीय सत्ता मिळविण्याकडे प्रयत्न करीत असतो. वास्तविकपणे आपल्याला असे स्पष्टपणे म्हणता येते की, 'सामाजिक चळवळींचा राज्यसत्ता प्राप्त करणे असा उद्देश नसतो, परंतू समाजातील एका घटकांना सर्व मिळते व दुसऱ्या घटकांना विकासाच्या गोष्टी प्राप्त करण्याकरिता सतत संघर्ष करावा लागतो. अशा विषमतावादी विचारांमुळे चळवळींचा उदय होत असतो. हर्बर्ट ब्लूमरने चळवळीचे दोन प्रकार सांगितले आहे. 1) सुधारणावादी 2) क्रांतीकारी. ब्लूमरने हया व्यतिरिक्त इतरही काही प्रकार सांगितले आहेत. अ) अविष्कृत चळवळ ब) धर्मपंथीय चळवळ क) फॅशन चळवळ ड) मूलभूत चळवळ इ) पुनरूज्जीवन चळवळ फ) देशीवादी चळवळ.

**सामाजिक चळवळीच्या संदर्भात समाजशास्त्रीय सिध्दांत :**

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक चळवळीच्या संदर्भात भाष्य करतांना विचारवंतांच्या अध्ययनावरून हे दिसून येते की, समाजातील सर्व लोकांना विकासाकरिता समान संधी मिळत असतील तर आंदोलने होत नाही. संघटनाचा उद्देश हाच असतो की, जर त्या समूहाला विकासाच्या गोष्टीपासून वंचित ठेवत असेल किंवा इतर कुणीही त्या समूहाला विकासाच्या गोष्टीपासून दूर लोटत असेल तर अशा वेळेला तो समूह आपल्या संघटनाच्या द्वारे आंदोलन निर्माण करून इतर लोकांचे लक्ष वेधून घेतो. शासनालाही त्या आंदोलनाचा विचार करावा लागतो.

**सैध्दांतिक परिप्रेक्ष्य, सापेक्ष वंचितता :**

समाजव्यवस्थेमध्ये जेव्हा विशिष्ट स्तरातील लोकांना इतर लोकांच्या तुलनेमध्ये तफावत किंवा भेद दिसून येतो तेव्हा सापेक्ष वंचितता निर्माण होऊन त्यातून चळवळी उदयास येतात. स्त्रियांच्या चळवळी, दलित चळवळी, विद्यार्थ्यांच्या चळवळी, अल्पघटकांचे आंदोलन, ग्रामीण आदिवासी क्षेत्रातील चळवळी, कधीकधी हे आंदोलन एकदम क्रांतीकारी आंदोलनाचे रूप धारण करीत असते. इंग्रजांशी संघर्ष करतांना काही चळवळींनी एकदम क्रांतीकारी रूप धारण केले असल्याचे आढळते. एखाद्या समूहास किंवा गटास अपेक्षित साधने मिळत नसल्यामुळे त्यांना त्यांची उद्दिष्ट साध्य करता येत नाही. मुख्यतः समाज सुधारणेच्या चळवळी हया वरील प्रकारच्या अर्थात सापेक्ष वंचितता हया समाजशास्त्रीय सिध्दांतांशी संबंधित आहेत.

**सामाजिक चळवळींचा अर्थ व परिभाषा :**

सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याकरिता सामुहिक दृष्टिकोनातून प्रयत्न करणे हे तितकेच महत्वाचे असते. सामाजिक चळवळी हया समाजामध्ये नवीन परिवर्तन घडवून आणतात. समाजशास्त्रामध्ये सामाजिक चळवळींचा अभ्यास करतांना बऱ्याच गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. जातीव्यवस्था, वर्ग, रूढी, नियम, कुटुंब व्यवस्था इत्यादींच्या संदर्भात चळवळीचा आपणाला अभ्यास करणे महत्वाचे ठरते. समाजातील समाज घटकांच्या सामुहिक प्रश्नांना लक्षात घेऊन सामाजिक चळवळ जन्म घेत असते. समाजातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

सामुहिक दृष्टिकोनातून गरजांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो. संप, मोर्चे, घोषणा, मिरवणूका अ प्रकारच्या विविध स्वरूपाच्या कृती आकाराला येत असतात.

समाजशास्त्रातील काही विचारवंताना सामाजिक चळवळीविषयी काही शास्त्रीय विचार व्यक्त केले आ त्या विचाराचा खालीलप्रमाणे उल्लेख करण्यात आला आहे.

हर्बर्ट ब्लूमरच्या मते "रूढ सामाजिक संबंधामधील एखाद्या क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी करण् येणारे संक्षिप्त प्रयत्न म्हणजेच "सामाजिक चळवळ" होय.

टर्नर आणि एल. फिलीनच्या मते "समाजात किंवा समाजाच्या घटक असलेल्या एखाद्या समूह बाबतीत बदल करण्यासाठी किंवा बदलाचा विरोध करण्यासाठी सातत्याने करण्यात आलेले सामूहिक प्र म्हणजे सामाजिक चळवळ होय."

एम. ए. ए. राव "आधीच निश्चित केलेल्या अथवा नंतर उदित झालेल्या एखाद्या आदर्शवादावर आध सामुहिक संघर्षाद्वारे जे अविरत प्रयत्न होत असतात त्यांना चळवळ हे नाव देणे योग्य होईल."

भारतामध्ये विशेषतः जातीवादाच्या संघर्षातून अनेक गोष्टी घडल्यात. जाती–जातीमध्ये संघर्ष इ धर्मा–धर्मामध्ये संघर्ष दिसून आला. इथे माणूस जाती आणि जातीवादाच्या पिंजऱ्यात अडकलेला दिसतो. माणसं या विषमतावादी व्यवस्थेमध्ये अडकलेले आहेत असे नाही. परंतु काही माणसे निश्चितच जातिभे पिंजऱ्यात अडकलेले होते. म्हणून काही समाज सुधारकांनी ज्या–ज्या समाज घटकांवरती अन्याय, अत्याचार होता. त्या त्या समाज सुधारकांनी आपल्या प्रयत्नांच्या द्वारे सामुहिक दृष्टिकोनातून सर्वांच्या हिताकरिता चळ उभ्या केल्यात. शिवाजी महाराजांच्या कार्यकाळामध्ये बहुजन समाजाला चळवळी उभ्या कराव्या लागल्या न कारण छत्रपती शिवाजी महाराज हे लोक कल्याणकारी राजे होते. त्यांनी सर्व जाती धर्मांच्या लोकांचा मानस केला. कुणालाही जाती आणि धर्मांच्या नावावर अपमानित केले नाहीत. त्यांच्या मंत्रीमंडळात सर्व जाती ध लोक होते. महात्मा ज्योतिबा फुले म्हणायचे बहुजनांनो जेव्हापर्यंत इंग्रज येथे आहेत तेव्हापर्यंत लवकरात ल स्वतंत्र व्हा. इंग्रज गेल्यानंतर शेठजी आणि भटजी हे बहुजन समाजाला मुक्त करणार नाहीत. या देश बहुजन समाजाला परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करायला प्रवृत्त करण्यासाठी समाज सुधारकांना खूप त्रागा, सहन करावे लागलेत. अनेक प्रकारचे वाईट अनुभव समाज सुधारकांना आलेत. समाजाला योग्य दाखविणाऱ्या लोकांनाही येथे शांतपणे जगू दिल्या जात नाही. तरीपण समाज सुधारकांनी आपल्या प्राणाची प बाळगता समाजाच्या कल्याणकारी कार्याची मुहूर्तमेढ रोवत राहिले. भारतातील वेगवेगळया राज्यामध्ये काही स सुधारक झाले, त्यांनी दिवसरात्र मेहनत केली. त्यांच्या विचाराचा प्रभाव आजही भारतीय जनमानसांवरती फरक एवढाच आहे की, काही लोक महापुरूषांचे विचाराला अभिवादन करून आचरणामध्ये आणतात तर लोक समाज सुधारकांच्या विचाराला पाहिजे त्या प्रमाणात महत्व देतांना दिसत नाही. याचे एकमेव कारण म जे लोक अखंडपणे समाजाच्या प्रथा परंपरेमध्ये अडकून पडले आहेत. त्यांच्याकडून आपण परिवर्तनाची अ करणे म्हणजे अतिशयोक्ती होणार. कारण त्यांच्या मेंदूमध्ये इतकी ताकद नाही की योग्य काय आहे, अयोग्य आहे. अंध, धार्मिकपणा त्यांच्या विचारामध्ये असल्यामुळे ते लोक विकासाच्या मार्गापासून खूप दूर जात अ त्यांना विकासाकरिता समाजा सुधारकांच्या विचाराशिवाय दूसरा पर्याय नाही.

**आधुनिक काळातील समाज सुधारकांचे योगदान :**

समाज सुधरकांनी तार्किकतेच्या आधारावर समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, चालीरितींना पारखून अनिष्ट चालिरितींना कायमचे पायबंद करून समाजामध्ये सामाजिक स्वारथ हे हितकारक असणे अति आव आहे, त्याकरिता समाज सुधारकांनी कल्याणकारी गोष्टींचा उपयोग करून समाजामध्ये सुधारणा घ आणण्याचा प्रयत्न केला. सामाजिक सुधारणा म्हणजे समाजाची सर्वांगीण सुधारण अशा प्रकारचा दृष्टि सामाजिक विचारवंताचा असतो. समाज सुधारकांच्या कार्याचा जेव्हा आपण आढावा घेतो तेव्हा आपणाला दिसून येते की, समाज सुधारक लोक हे समाजातील लोकांचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय सांस्कृतीक दृष्टिकोनातून बदल व्हायला पाहिजे अशा प्रकारचा आशय लक्षात घेऊन सतत आपले समाजाच्या विकासाच्या दिशेने कार्य करीत असतात. समाज सुधारकाच्या कार्याचा मध्यबिंदू हा मानवच त्याच्या आंदोलनाचा मुख्य उद्देश हाच आहे की, समाजातील अनिष्ट रूढी, प्रथाम, परंपरा, हुंडाबळी, प्रा बळी, मानवांचा बळी इत्यादिविषयी आजही समाजामध्ये धार्मिकतेचे, अंधश्रध्देचे समाजमन संपलेले नाही. आपल्याला समाज सुधारकांच्या कार्यांचा मानसन्मान करून त्याचे विचार नवीन पिढीकडे हस्तांतरीत अतिशय महत्वाचे आहे.

भारतीय समाजामध्ये आज जे काही सकारात्मक परिवर्तन दिसून येते, त्या परिवर्तनामागे स सुधारकानी केलेल्या प्रयत्न आणि संघर्षांचा गुणाकार आहे. आपल्या या देशामध्ये विविध राज्यामध्ये



Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

समाज सुधारक होऊन गेलेत. परिवर्तनवादी संत आणि साहित्याचीही भूमिका तितकीच महत्वाची परिवर्तनवादी समाज सुधारक होऊन गेलेत. याबरोबरच भारतात इंग्रज आल्यामुळे अर्थात ब्रिटिश राजवटीपासून (1818) चातुर्वण्य वरथेला धक्क सुरुवात झाली. नव्या इहवादी शिक्षणाचा प्रसार होऊ लागल्यामुळे प्राचीन धर्मकल्पनांचा बदलत्या दृष्टिकोनातून विचार व्हायला लागला. मानवी मुल्ये जन्माला यायला लागली. बंधुता, स्वातंत्र्य, मानवी हक्कांची इत्यादी गोष्टींचा विचार व्हायला लागला. इंग्रजांनी जे परिवर्तनवादी धोरण आखले होते त्या धोरणाचा बहुजन समाजावरती हा सकारात्मक झाला. सुधारणा, कायदे इत्यादीमुळे समाजामध्ये बदल होऊन 1818 पेशवाईचा अंत झाला. मध्ययुगीन संस्कृतीचा अंत होऊन ब्रिटिश राजवटीपासून (1818) भारतामध्ये एका आधुनिक युगास प्रारंभ झाला. इंग्रजाच्या धोरणामुळे आधुनिक सुक्षितांना एक नवी दृष्टी प्राप्त झाली. एक नवी वैचारिकता प्राप्त झाली. या वैचारिकतेमधूनच ब्राम्हो समाज, मानवधर्म सभा, आर्य समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन यासारखे हिंदू धर्मामध्ये सुधारणा घडविणारे समाज स्थापन झालेत. 1828 मध्ये राजा राममोहन रॉय यांनी कलकत्त्यामध्ये ब्राम्हो समाज स्थापन केला. "Fatherhood of God, Brotherhood of Men" हे या समाजाचे ब्रीदवाक्य होते. या समाजाने स्त्री–पुरुष समानतेकडे लक्ष दिले. राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेला विरोध करून सतीप्रथा मोडीस काढली. परंतू या समाजाने समाजामध्ये असलेले जातिभेदाच्या गोष्टीकडे लक्ष दिले नाही. आर्य समाजामध्ये स्वामी दयानंद यांनी अस्पृश्यांबरोबर सहभोजन करण्यास सकारात्मकता दर्शविली होती. तसेच त्यांनी अस्पृश्यांना वेद–मंत्राचे अधिकार देण्याची तयारी दर्शविली होती. ब्राम्हो समाजामधून पुढे प्रार्थना समाज अस्तित्वात आला. न्यायमूर्ती म. गो. रानडे, डॉ. य. गो. भांडारकर प्रभृतींनी मुंबईमध्ये या समाजाची 1867 मध्ये शाखा काढली. दादोबा पांडुरंग यांनी मानवधर्म सभा नावाची एक संस्था 1867 च्या पूर्वी स्थापन केली होती. हे सर्व लोक समाजातील अस्पृश्योध्दाराच्या कार्यामध्ये प्रत्यक्षपणे सहभागी झाले नाहीत. परंतू त्यांच्या उदारमतवादी दृष्टिकोनामुळे वैचारिक पातळीवरून अस्पृश्यांच्या प्रश्नाला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. लोकहितवादी (गोपाळराव हरी देशमुख), न्या. रानडे, भांडारकर, गोपाळ आगरकर, दादोबा पांडुरंग आदि व्यक्तींनी समाजामध्ये सुधारणावादी विचार करण्यास पुढाकार घेतला. गोपाळराव आगरकरांचे विचार हेत अतिशय प्रगल्भ व पुरोगामी होते. त्यांनी 'सुधारक' या वृत्तापत्रातून लिहिले की, आपण पक्षपातीपणा नाकारला पाहिजे. शाळेमध्ये आपल्या शेजारी इतर जातीच्या लोकांना बसण्यास मोकळीक दिली पाहिजे. ब्राम्हणांची आणि महारांची पंगत एक झाली पाहिजे. महारांची स्थिती सुधारली पाहिजे अशा विचारांचा त्यांनी नेहमी आग्रह धरला ओह. तरीपण आपल्याला असे म्हणावे लागते की, अस्पृश्य वर्गाच्या सुधारणेसाठी या लोकांनी केलेले कार्य हे अपूरे ठरले. या सुक्षितांचा सुधारणावाद तात्वीक दृष्टिकोनातून कितीही व्यापक असला तरी प्रत्यक्षपणे स्त्री शिक्षण, पुनर्विवाह, प्रौढविवाह यासारख्या उच्चवर्णीय सुधारणापूरताच मर्यादित होता. तो सर्वकष नव्हता. त्याच्या कक्षा ह्या सर्व समाजाच्या परिवर्तनाकरिता रुंदावू शकल्या नाहीत. परंतू काही विभूती, काही व्यक्तित्त्व, काही विचार असे झालेत की, त्यांचा विचार, त्यांच्या विचारांमध्ये असलेली ताकद हा सर्व समाजाच्या उन्नतीकरिता महत्वपूर्ण ठरली. त्यांच्या विचारामध्ये सर्व भारतीय समाजाचे कल्याणकारी योजनांचे, कल्याणकारी विचारांचे बीज पेरली आहेत. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, डॉ. बी. आर. आंबेडकर, पेरियार, रामास्वामी, कायकर, नारायण गुरू, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, भाऊसाहेब देशमुख, पंडीता रमाबाई, गोपालबूवा वलंगकर, सयाजीराव गायकवाड, संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, नरेंद्र दाभोळकर इत्यादींच्या कार्यामुळे समाजामध्ये आपणाला भारतामध्ये परिवर्तनात्मक कार्य दिसून आल्यामुळे भारतीय समाजामध्ये आज बहुजन समाजाची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक प्रगती होताना दिसते आहे. या प्रगतीमध्ये सुधारकांच्या तत्वज्ञानाचे आणि कार्यांचे योगदान तितकेच महत्वाचे ठरले आहे. समाज सुधारकांनी केलेल्या कार्याची समाजाने आणि शासनाने सुध्दा दखल घेतल्यामुळे आपणाला भारतीय समाज व्यवस्थेमध्ये गुणात्मक परिवर्तन दिसून येते.

भारतीय समाज सुधारकांच्या योगदानाचा शोध घेतला असता असे स्पष्टपणे लक्षात येते की, सर्वच क्षेत्रात आपणाला समाज सुधारक व संत आणि त्याच्या साहित्याचा प्रभावामुळे समाजामध्ये आपणाला परिवर्तन झालेले दिसून येते. महावीर जैन, तथागत गौतम बुध्द, येशू खिस्त, मोहम्मद पैगंबर, गुरू गोविंदसिंग, संत ज्ञानेश्वर, संत कबीर, संत तुकाराम, संत नामदेव, चक्रधर स्वामी, संत एकनाथ, संत जनाबाई इत्यादी लोकांनी समाजामध्ये परिवर्तनाचे कार्य केलेत.

**महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या चळवळीचे योगदान :**

भारतातील इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रातील समाज सुधारक समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये अग्रेसर दिसून येतात. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांनी जात, धर्माच्या पलीकडे जाऊन परिवर्तनाची बिजे पेरलीत. त्यामुळे महाराष्ट्र हे वैचारिक विकासाच्या दृष्टिकोनातून इतर राज्याच्या तुलनेमध्ये प्रथम क्रमांकावर दिसून येते. इथे काही संतापजनक घटना घडतात त्या विषमतावादी विचारांच्या कुटील कारस्थानामुळे. महाराष्ट्रामध्ये काही समाज



Scanned with OKEN Scanner

सुधारकांचे कार्य इतके प्रभावी राहिले की, त्यांच्या कार्याचा प्रभाव महाराष्ट्रातच नाही तर भारतात व इ देशामध्ये त्यांच्या विचाराला सलाम केला गेला त्यामध्ये आपणाला शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी श महाराज, सयाजीराव गायकवाड, डॉ. बी. आर. आंबेडकर, सावित्रीबाई फुले, अन्नाभाऊ साठे, कर्मवीर भाऊ पाटील, किसन फागुजी बनसोडे, प्रबोधनकार के. सी. ठाकरे, शिवराम जानबा कांबळे, नारायण मेघाजी लोख डॉ. भाऊ दाजी लाड, इत्यादींनी महाराष्ट्रामध्ये अतुलनीय समाज सुधारकांचे कार्य केले आहे. त्यामुळेच बहु समाज आपली प्रगती करू शकला. पूर्णपणे बहुजन समाजाची प्रगती झाली असे नाही. परंतू त्यांच्या कार्या इथल्या जनमानसाला काहीतरी करण्याची उर्जा मिळाली. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बी. आर. आंबेडक गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, सावित्रीबाई फुले यांचे कार्य तर समाजाच्या सर्वांगीण विकासाचा एक परिप आहे. एक मॉडेल, एक प्रतिमान आहे, त्यांनी केलेल्या समाजसुधार कार्यांचा इतिहास हा अजरामर आहे. तसेच प्रत्येक नवीन पिढीकरिता प्रेरणादायी आहे त्यामुळे हे सर्व समाज सुधारक राष्ट्रीय आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहोच महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या कार्याचा येथे संक्षिप्तपणे आढावा घेण्याचा संशोधनकर्त्यांने प्रयत्न केला आहे.

इंग्रजी राजवटीमध्ये सुधारणा आणि शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे भारतीयांच्या मनात इंग्रजांविष आदराची भावना निर्माण होत होती. महात्मा ज्योतिबा फुल्यांनी आपल्या विचाराच्या आधारे हे स्पष्ट केले व 'ब्राम्हण लोकांचा या देशाशी काहीही संबंध नाही. वेद हे मुळात भेद निर्माण करणारे आहेत. हा विचार त्या प्रसारित करून वेदोक्त धर्मास त्यांनी विरोध केला.

1873 साली फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून या सत्यशोधक चळवळीच्या द्वारे समाजाम परिवर्तन करण्याच्या दृष्टिकोनातून अनेक बाबतीमध्ये कृतीशील कार्यक्रम करण्यात आला. उच्च–नीच भ जातीभेद, अस्पृश्यता इत्यादी मानू नये. स्त्री–पुरुषमध्येही भेद मानू नये. धर्माच्या नावाखाली गुलामी जे लो लादत असतील त्या लोकांची मध्यस्ती नाकारली पाहिजे. ब्राम्हणाशिवाय आपण आपले संस्कार केले पाहिज अशा विचाराचा प्रसार महात्मा ज्योतिबा फुले यांनी केला. 1848 मध्ये पुणे येथे प्रथम मुलींची शाळा काढले विविध जातीच्या मुली येथे शाळा शिकायच्या. स्वत: सावित्रीबाई या शाळेच्या शिक्षिका होत्या. 1852 मध्ये फुल्यां अस्पृश्य मुलींसाठी शाळा केली. काही सनातनी ब्राम्हणांनी या गोष्टीला विरोध केला. मात्र इंग्रज सरकारने दक्षि प्राईस फंडातून या उपक्रमाला अर्थसहाय्य केले.

स्त्री शिक्षणामध्ये महात्मा फुल्यांनी पुढाकार घेतल्यामुळे इंग्रज सरकारने 1852 मध्ये त्यांचा पुण्याती विश्राम बागवाडयात शालजोडी अर्पण करून सत्कार केला. 1863 मध्ये महात्मा फुले यांनी बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थाना करण्यात आली. त्यांनी 1863 मध्ये विधवा पुनर्विवाह घडवून आणले पाहिजेत. या विचारसरणीच पुरस्कार करण्यासाठी पहिला विधवा पुनर्विवाह घडवून आणला. 1868 मध्ये जोतिरावांनी आपल्या घरातील पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला केला. त्यामुळे सनातन्यांनी जोतिबाकडे मारेकरी पाठविले. पण जोतिब डगमगले नाहीत. त्यांच्या निश्चयी व आत्मिक बळामुळे मारकऱ्यांना चालते व्हावे लागले. शुद्र वर्गाचा सामाजिक आर्थिक, अधिकार प्राप्त झाले पाहिजे या हेतूने सत्यशोधक समाजाचे कार्य फार प्रभावी व गतीशील राहिले त्यामुळे महात्मा फुल्यांना आधुनिक काळातील सामाजिक क्रांतीचा अग्रदूत म्हटले जाते. सावित्रीबाई मुलींच्या शाळेमध्ये जेव्हा शिकवायला जायच्या तेव्हा सभ्य समजली जाणारी माणसं शिव्या द्यायचे, अचकट, विचकट बोलायचे. अंगावरती शेण फेकायचे. तरीही सावित्रीबाईंनी आपल्या कार्याला विराम दिला नाही. त्यांनी आपल्या कार्याला एका वेगळया उंचीवर नेऊन ठेवले आहे. स्त्रियांतील अंधश्रध्दा नष्ट करून त्यांना त्यांच्या हक्काची जाणीव करून देण्याच्या दृष्टीने सावित्रीबाईंनी महिला सेवा मंडळाची सुरूवात 1852 मध्ये केली. सावित्रीबाईंनी स्त्री शिक्षणाद्वारे स्त्रियांचे शोषण करणाऱ्या रूढी, परंपराच्या विरोधामध्ये लोकमत जागृत केले, सतीप्रथा, केशवपण, विधवा विवाह, बंदी, इत्यादी स्त्री विरोधी रूढी परंपराच्या विरोधामध्ये त्यांनी आपली चळवळ उभी केली होती. स्त्रियांचे जीवन हे गुलामगिरीचे जीवन आहे, त्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता तसेच त्यांना त्यांचे अधिकार मिळवून देण्याकरिता त्यांनी आपला संघर्ष नेहमीच सुरू ठेवला. 'स्त्री ही माणूस असून पुरूषाप्रमाणे तिला अधिकार मिळायला पाहिजे', हा विचार समाजामध्ये पेरणारी ही प्रथम महिला होय. त्यांच्या कार्यामुळे आज महिलांनी शैक्षणिक कार्यामध्ये आपला विकास केला असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घडवून आणली. त्यांच्या विचारांवरती राजर्षी शाहू महाराजांचा प्रभाव असल्याचे आढळते. 1910 मध्ये कर्मवीर भाऊराव पाटलांनी सांगली जिल्हयातील दुधगाव येथे शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली व ते महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजाचे पाायिक होते. त्यांनी 1912 मध्ये कराड तालुक्यातील काले या गावी 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना केली. तसेच सातारा येथे छत्रपती शाहू बोर्डिंग काढले. शिक्षकांचे प्रशिक्षण केंद्र, प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्यालये त्यांनी सुरू करून समाजामध्ये सुधारात्मक, कल्याणकारी दृष्टिकोन रूजविण्याचा प्रयत्न केला.



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

छत्रपती शाहू महाराजांच्या चळवळीतील एक प्रमुख व्यक्तिमत्व म्हणजे भास्करराव जाधव. त्यांनी आपल्या विचार व कार्याच्या आधारे बहुजन समाजामध्ये जागृती निर्माण केली. त्यांनी मराठा एज्युकेशन सोसायटीची स्थापना केली. विदर्भामध्ये बहुजन समाजामध्ये जागृती व शिक्षणाचा प्रसार करण्याच्या दृष्टिकोनातून डॉ. पंजाबराव देशमुख याच व्यक्तिमत्वाची एक आगळी वेगळीच ओळख झाली. त्यांनी शिवाजी शिक्षण संस्थेची स्थापना करून खेडोपाडी शाळा, महाविद्यालय उघडलीत. विदर्भातील शेतकऱ्याकरिता त्यांनी महत्वाच्या सुधारणा व कार्य केलेत. केंद्रिय कृषिमंत्री असताना त्यांनी शेतकऱ्याकरिता अनेक प्रकारच्या योजना राबविल्यात. विदर्भातील शैक्षणिक योगदानामध्ये डॉ. पंजाबराव देशमुखाचे नाव अग्रक्रमाने घ्यावे लागेल. अनेक सुधारकांनी लोकोपयोगी कार्य केल्यानंतरही समाजातील अनेक लोकांना त्यांचा फायदा झाला नाही, परंतू सर्व लोकांच्या गरजांची पूर्ती करण्याची ताकद ही संविधानामध्ये असून संविधानाच्या माध्यमातून संपूर्ण भारतातील सर्व जाती धर्माच्या लोकांना सर्व दृष्टिकोनातून सुरक्षितता मिळण्याकरिता तसेच लोकांचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय व सांस्कृतिक विकासाच्या दृष्टिकोनातून संविधानाची अमलबजावणी हे महत्वपूर्ण असते. डॉ. आंबेडकरांनी केल्या कार्यामुळेच भारत खऱ्या अर्थाने प्रजासत्ताक होऊ शकला.

ज्या लोकांना रस्त्यावरून चालण्याची मनाई होती त्या लोकांना डॉ. आंबेडकरांनी मान–सन्मान मिळवून दिला. डॉ. आंबेडकरांनी केलेले समाज सुधारकाचे कार्य हे खूप महान आहे. त्यांनी समाजातील लोकांना शिक्षणाकरिता प्रेरणादायी केलेत. डॉ. आंबेडकरांनी शिक्षणाचे महत्त्व ओळखल्यामुळे त्यांनी सर्वांना शिक्षण घेण्याकरिता सांगितले विशेषतः ज्या समाजाला शिक्षणाची दारे बंद होती त्या समाजाने शिक्षण घेतलेच पाहिजे तरच कुठे त्या समाजाची प्रगती होऊ शकते. अन्यथा गुलामगिरीचे जीवन किंवा भांडवलदाराच्या हाताखाली आपले जीवन व्यतीत केल्याशिवाय पर्याय नाही. डॉ. आंबेडकरांनी जातीचे निर्मूलन हा ग्रंथ लिहून भारतातील जातीचे वस्तुनिष्ठ विश्लेषण केले आहे. त्यांनी हे स्पष्ट केले की "जात हा शब्द समान दर्जाचा नाही. जात असमानतेवर आधारित आहे" म्हणून जातीचे निर्मूलन करणे आवश्यक आहे हे एक राष्ट्रीय कार्य आहे असे डॉ. आंबेडकर स्पष्ट करतात. प्रत्येक स्त्री–पुरुषाला धर्मशास्त्राच्या गुलामीतून मुक्त करा. धर्मशास्त्राच्या पायावर आधारलेल्या उपायकारक कल्पनापासून त्यांची मने स्वच्छ करा. जेव्हापर्यंत जाती आपण नष्ट करणार नाहीत तेव्हापर्यंत सुधारणा घडून येणार नाही. डॉ. आंबेडकरांनी नागपूरच्या दीक्षाभूमीवर 5 लाख अनुयायांसोबत बौध्द धम्माची दिक्षा घेतली, याचे कारण म्हणजे हिंदू धर्मामध्ये असलेली विषमता. अस्पृश्यतेच्या कलंकाचे निर्मूलन केले आणि त्यांना अस्मिता व स्वाभीमानाची ओळख करून दिली. संविधानाच्या माध्यमातून डॉ. आंबेडकरांनी सर्व जाती धर्माच्या लोकांना न्याय मिळवून दिला आहे, असे महान कार्य डॉ. आंबेडकरांनी केल्यामुळे आज समाजामध्ये बऱ्याच प्रमाणात आपणाला सुधारणा दिसून येतात. आजही संविधानाच्या माध्यमातून सर्वच लोकांना त्यांनी अधिकार आणि कर्तव्याची जाणीव करून दिली आहे.

महाराष्ट्रामध्ये समाजिक प्रबोधनासाठी वृत्तपत्रासारखे साधन नाही म्हणून आचार्य जांभेकरांची बंगाली वृत्तपत्रातून प्रेरणा घेऊन मराठी वृत्तपत्राचे जनक म्हणून त्यांनी केलेले कार्य हे समाज प्रबोधनाचे आहे. त्यांनी दर्पण नावाचे वृत्तपत्र काढून समाजामध्ये जागृती, ज्ञान, प्रसाराचे कार्य केलेत. त्याचप्रमाणे गोपाळ हरी देशमुख उर्फ लोकहितवादी यांनी भारतीय समाजातील वर्णव्यवस्था व जातिभेद समाजाच्या अधोगतीला कारणीभूत ठरल्या आहेत असा विचार त्यांनी मांडला. वर्णव्यवस्थेमध्ये स्वतःला उच्च समजल्या जाणाऱ्या ब्राम्हणांनी हाव सोडून देवून एक नवीन आचार–विचार स्वीकारावा व समाज परिवर्तनाच्या कार्यात पुढाकार घ्यावा अशाप्रकारे त्यांनी आवाहन केले. धर्माच्या नावाखाली केल्या जाणारे कर्मकांड, उपवास, सोवळे, पारायण ह्या सर्व गोष्टी सोडून दिल्या पाहिजेत असा लोकहितवादीचा आग्रह होता. त्यांनी हे स्पष्ट केले की, ब्राम्हणांनी अनेक संस्काराचे समारंभाचे विनाकारण महत्त्व वाढविले.

महाराष्ट्रामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचे कार्य हे विशेष रूपाने समाजाच्या कल्याणाकरिताच होते. याविषयी आपणाला त्यांच्या कार्याचा परिचय होणे आवश्यक आहे. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या राजपदाचा उपयोग त्यांनी लोक कल्याणाकरिता केला. त्यांनी कोणत्याही समाजाचा भेद केला नाही. बहुजन समाजाला आर्थिक सुरक्षितता प्रदान करण्याच्या दृष्टिकोनातून त्यांनी 1902 मध्ये आरक्षणाची सुरूवात त्यांच्या संस्थानातून केली आपल्या राज्यातील प्रजा ही सुखी आणि समाधानी कशाप्रकारे राहील याचा विचार करून त्यांनी आपले कार्य नेहमीच प्रजेच्या कल्याणाकरिता केले आहे. राजर्षी शाहू महाराजांना छत्रपती शिवाजी महाराजांच्या व्यक्तिमत्वाविषयी अत्यंत आदर होता. शिवाजी महाराजांनी धाडसीपणाने समाज परिवर्तनाचे जे कार्य केले त्या कार्याचा प्रभाव राजर्षी शाहूजी महाराजांवरती पडलेला होता. त्याप्रमाणे शाहू महाराजांनी महात्मा फुल्यांच्या विचाराला अधिक महत्त्व दिले होते. आजही त्यांच्या कार्यालया भारतभर अभिवादन केले जाते. जातीभेद, अस्पृश्यता निवारण, स्त्रीजीवन सुधार, क्रीडा, कला, औद्योगिक, आर्थिक, कृषी, जलसिंचन इत्यादी कार्य केलेत



Scanned with OKEN Scanner
Scanned with OKEN Scanner

त्यांनी डॉ. आंबेडकराना बरेच सहकार्य केले. जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. आंबेडकर हे तीन र रत्न आपल्या कार्याच्या द्वारे भारतात आणि इतर देशातही ओळखले जातात. भारतातील समाज सुधारक कार्यालया परत एकदा सलाम! आणखी काही समाज सुधारकांचा आपणाला उल्लेख करता येईल. त्य कार्यामुळे समाज मनाला कल्पनाचे जीवन जगता आहे.

**मुल्यांकन :**

महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या योगदानाचा वरील संशोधन निबंधामध्ये विचार व्यक्त करण्यात अ आहे. वर्तमान परिस्थितीमध्ये भारतामध्ये जे काही परिवर्तन घडून येत आहे, त्यामागे निश्चितच त्यांच्या का फलित आहे. महाराष्ट्रामध्ये इतर राज्याच्या तुलनेत सर्वाधिक समाज सुधारक झाल्याने आज महाराष्ट्र हे इ राज्याच्या तुलनेत वैचारिक दृष्टिकोनातून अधिक प्रगल्भ आढळते. समाज सुधारकांचा त्याग, त्यांनी सहन केल हालअपेष्टा, मानअपमान यामुळे समाजातील लोकांना मान–सन्मानाचे जीवन मिळाले. अस्मिता व स्वाभिमान प्र झाला, हे सर्व समाज सुधारकांच्या योगदानाचे फलित होय.

**संदर्भग्रंथ सूची :**


1) प्रा. टाले पफ. अशोक (2018). 'महाराष्ट्रातील समाज सुधारक', साई ज्योती पब्लिकेशन, कसारपुरा, नागपूर
2) डॉ. आगलावे प्रदिप (2017). 'मुलभूत समाजशास्त्रीय विचार, पाश्चात्य आणि भारतीय', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
3) डॉ. कऱ्हाडे बी. एम. (2011). 'सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर
4) डॉ. देवगावकर एस. जी. (2009). 'सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
5) डॉ. काळदाते सुधा, प्रा. अविनाश डोळस, डॉ. शरणकुमार लिंबाळे, (2002). 'सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळव
य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक




Scanned with OKEN Scanner

Scanned with OKEN Scanner

आज़ादी का अमृत महोत्सव

MAH/NAN/10936/2015
ISSN : 2454-7905
SJIF 2022 - Impact Factor: 7.479

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

(A Peer Reviewed)

Year - 8, Vol.I, Issue-LXVIII, 1 October 2022



# Thoughts and Works of Indian Social Reformers

## भारतीय समाजसुधारकांचे विचार व कार्य



Editor in Chief
**Dr. Ramkishan N. Dahiphale**

**Quarterly Research Journal**

(Arts - Humanities - Social Sciences - Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical, Ayurveda, Pharmaceutical, Journalism, Mass Communication, Library Science Faculty's)

Scanned with OKEN Scanner

ISSN: 2454 – 7905

*SJIF Impact Factor: 7 . 479*

# Worldwide International Inter Disciplinary Research Journal

*A Peer Reviewed Referred Journal*

**Quarterly Research Journal**

(Arts-Humanities-Social Sciences- Sports, Commerce, Science, Education, Agriculture, Management, Law, Engineering, Medical- Ayurveda, Pharmaceutical, MSW, Journalism, Mass Communication, Library sci., Faculty's)

www.wiidrj.com

Vol. I ISSUE - LXVIII Year – 8 01 Oct. 2022

**Janata Shikshan Prasarak Mandal's**

## MAHILA KALA MAHAVIDYALAY, AURANGABAD

**(Shreemati Nathibai Damodar Thackersey Women's University, Mumbai)**

**Organized One Day Interdisciplinary National Conference**

**on**

# Thoughts and Works of Indian Social Reformers

**:: Editor in Chief ::**

**Dr. Ramkishan N. Dahiphale**

Principal

Mahila Kala Mahavidyalay, Aurangabad

**Address for Correspondence**

**Website: www.wiidrj.com**

House No.624 – Belanagar, Near Maruti Temple, Taroda (KH), Nanded – 431605 (India – Maharashtra) **Email:** shrishprakashan2009@gmil.com / umbarkar.rajesh@yahoo.com

**Mob. No:** +91-9623979067



Scanned with OKEN Scanner

| | | | |
|---|---|---|---|
| 72. | पेरियार रामस्वामी यांचे भारतीय समाज सुधारणेतील योगदान | प्रा. डी. एन. रिठे | 271 |
| 73. | सावित्रीबाई फुले यांचे विचार व कार्य | डॉ. वनिता साबळे | 274 |
| 74. | सामाजिक चळवळीतील समाजसुधारकांचे योगदान | डॉ. शिला सखाराम मद्दाने | 277 |
| 75. | राजर्षी छत्रपती शाहू महाराजांचा शैक्षणिक दृष्टिकोन | प्रा. संतोष जाधव येंडाळकर | 280 |
| 76. | महात्मा जोतीबा फुले यांच्या मराठी साहित्यातील सामाजिकता | प्रा. डॉ. संतोष देशमुख | 285 |
| 77. | समाजसुधारकांचे शिक्षणविषयक विचार | प्रा. सौ. कांबळे सुनिता शंकरराव | 289 |
| 78. | सामाजिक चळवळीतील समाज सुधारकांचे योगदान | प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे | 294 |
| 79. | डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शैक्षणिक विचारासंबधीचा दृष्टीकोन | डॉ. बबन आमले | 301 |
| 80. | मानवमुक्तीसाठी वर्णव्यवस्थेला छेद करणारे संत साहित्य | डॉ. मथुरा मेवाड | 304 |
| 81. | भारतातील ग्रंथालय चळवळ आणि स्त्री उद्धारासाठी समाजसुधारकांचे योगदान | स्वप्ना प्रकाश गायकवाड<br>डॉ. पल्लवी ज्ञानोबा मुंढे | 308 |
| 82. | महात्मा गांधी यांचे सामाजिक व राजकीय कार्य | डॉ. सुनील गुलाबराव पिंपळे | 311 |
| 83. | डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे मराठी साहित्याला योगदान | प्रा. डॉ. सर्वगोड एन. सी. | 314 |
| 84. | बंजारा समाज सुधारक : संत सेवालाल महाराज | प्रा. डॉ. गजानन पांडुरंग जाधव | 318 |
| 85. | महात्मा ज्योतिराव फुले यांचे सामाजिक व शैक्षणिक कार्य | प्रा. राजकुमार मोरे | 322 |
| 86. | समाजसुधारक आणि स्त्री शिक्षणाचा लढा | प्रा. सुनिल आर. वाघमारे | 325 |
| 87. | भारतीय अर्थव्यवस्थेत समाजसुधारकांचे योगदान | डॉ. रामेश्वरी नरेशराव कमठम | 329 |
| 88. | भारतीय महिला समाज सुधारक पंडिता रमाबाई यांचे विचार व कार्य | डॉ. अब्दुलसमद बादशहा शेख | 333 |
| 89. | समाजसुधारकांचा समासुधारणेच्या कार्याचा आढावा – लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज! | प्रा. वंदना शामराव खोराटे | 337 |




Scanned with OKEN Scanner

# सामाजिक चळवळीतील समाज सुधारकांचे योगदान

प्रा. डॉ. कमलाकर पी. तागडे
प्रमुख समाजशास्त्र विभाग
डॉ.म.वा.पी.डब्ल्यू.एस., कला व वाणिज्य महाविद्यालय, नागपूर

**गोषवारा :**

सामाजिक चळवळ हा एक सामुहिक प्रयत्न आहे. या सामुहिक प्रयत्नामुळे मानवी समाजामध्ये परिवर्तन घडवून आणता येते. त्याकरिता आपणाला चळवळ निर्माण करून समाजातील लोकांना स्वातंत्र्य, समता, बंधुता व न्याय या मानवी मुल्यांचा उपयोग सर्वांना झाला पाहिजे असा विचार हा कल्याणकारी चळवळीचा असतो ह्या कल्याणकारी चळवळी समाज सुधारकांनी निर्माण करून समाजामध्ये लोकउपयोगी कार्य केले आहेत. त्यामुळे समाजाला आपला सामाजिक, आर्थिक, राजकीय, सास्कृतिक दर्जा उंचावता आला. समाजातील प्रत्येक घटकाला शोषणमुक्त जीवन जगता यावे, प्रत्येकाला स्वातंत्र्य, समता, बंधुता ही मानवी मुल्ये मिळावी, त्याकरिता धर्म, जात वंश, लिंग, भेद या गोष्टीच्या पलीकडे जाऊन तार्किकतेच्या आधारावर समाजामध्ये परिवर्तन करण्याकरिता समाज सुधारकानी अहोरात्र प्रयत्न केलेत. त्यानी समाजमन जपले, आयुष्यभर समाजाच्या हिताकरिता स्वतःच्या कुटुंबाकडे लक्ष न दिल्याने त्याच्या कुटुंबावरती आभाळ कोसळले, तरी या समाज सुधारकानी लोककल्याणाचे कार्य थांबविले नाही. पेशवाईचा नायनाट होऊन महाराष्ट्रामध्ये ब्रिटिश सत्ता प्रस्तावित झाली. 1819 ते 1827 या काळामध्ये ब्रिटिश सत्तेची मजबूत पकड होती आणि त्या काळात समाजव्यवस्था ही जातीभेद, लिंगभेद, बालविवाह, पडदा पध्दती, अंधश्रध्दा ह्या अनिष्ठ रूढी परंपरानी ग्रासला होता. त्यामुळे समाज सुधारकानी लोकांचे सामाजिक, मानसिक, बौध्दिक स्वास्थ्य टिकविण्याकरिता सुधारक कार्य करणे सुरू केलेत. याकरिता इंग्रजानी सहकार्य करून योग्य पध्दतीने प्रशासन केल्यामुळे समाज सुधारकांच्या कार्याला गती प्राप्ती झाली. ब्रिटिश सत्तेची स्थापना झाल्यानंतर महाराष्ट्रामध्ये आधुनिकतेची पायाकरणी करण्याचे कार्य माऊंट स्टूअर्ट एलफिस्टन यानी केले.

**प्रमुख शब्द :**

सामाजिक चळवळ, समाज सुधारक, जातीभेद, लोककल्याणकारी, प्रस्थापित व्यवस्था.

**प्रस्तावना :**

भारतातच नाही तर संपूर्ण विश्वामध्ये जेव्हा आपण समाज व्यवस्थेतील परिवर्तनाविषयी बोलतो तेव्हा आपणाला परिवर्तनवादी विचाराला अभिवादन करावेसे वाटते, कारण या समाजातील परिवर्तन ही कोणत्याही देवीदेवतेने घडवून आणली नाहीत. वर्तमान युगातील समाजामध्ये जे परिवर्तन आपणाला दिसते आहे, त्या परिवर्तनामध्ये समाज सुधारकांच्या प्रयत्नांची बीजे पेरल्या गेली आहेत. त्यांनी आपल्या कुटुंबाकडे लक्ष न देता समाजाकडे लक्ष दिले, समाजाच्या हिताकरिता काही समाज सुधारकानी संघटना आणि साहित्याची निर्मिती केली. प्रस्थापित समाजव्यवस्था जेव्हा समाजातील इतर घटकांचे शोषण करते तेव्हा समाजातील इतर घटक एकत्र येऊन सामुहिक कृतीद्वारे प्रस्थापित व्यवस्थेच्या विरोधामध्ये मोर्चे, संप, संघटन उभे करतात. या सामुहिक कृतीच्या माध्यमातून त्यांना शोषण करणाऱ्या व्यवस्थेला संपवायचे असते. या सामुहिक कृतीला एक विचार असतो, एक उद्दिष्ट असते, एक स्वप्न बघायचे असते की, समाज व्यवस्थेमध्ये श्रेष्ठ–कनिष्ठता, असमानता, विषमता या गोष्टींना मुल्य मानणाऱ्या प्रस्थापित व्यवस्थेला पुन्हा निर्माण न होऊ देणे किंवा मानवतेला डिवचणाऱ्या व्यवस्थेला कधीच जन्म घेऊ न देणे. समाज व्यवस्थेमध्ये काही विशिष्ट घटक हे स्त्रिया, पुरूष, दलित, श्रमिक यांचे शोषण करीत असतात. समाजामध्ये सर्वच माणसे असताना काही माणसाना माणुसकीपासून दूर लोटल्या गेले. अशा वेळी समाजातील समाज सुधारकांचे योगदान हे अतिशय महत्वाचे ठरले. शिवाजी महाराज, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, शाहू महाराज, डॉ. आंबेडकर, पेरियार रामास्वामी, महात्मा गांधी, ताराबाई शिंदे, लोकहितवादी न्या. रानडे, गोपाळ गणेश आगरकर, कर्मवीर भाऊराव पाटील, शिवराम जानबा कांबळे, प्रबोधनकार ठाकरे इत्यादी सुधारकांचा कार्यामुळे समाजातील लोकांना मानसन्मानाचे जीवन जगता आले.

**अध्ययनाची उद्दिष्टये :**

- समाज सुधारकांच्या चळवळीविषयी परिचय करणे
- समाज सुधारकानी केलेल्या योगदानामुळे समाजव्यवस्थेतील परिवर्तनाचा आढावा घेणे.

**अध्ययन पध्दत :**

प्रस्तुत शोधनिबंधामध्ये प्राथमिक आणि द्वितीय स्त्रोतांचा उपयोग केलेला आहे. वर्तमानपत्रातील लेख सुधारकाचे लिखित साहित्य, अहवाल, डायरी इत्यादिचा उपयोग करण्यात आला आहे.



Scanned with OKEN Scanner

**साहित्य समिक्षा :**

डॉ. एस. जी. देवगावकर यांनी 'सामाजिक चळवळी' परंपरागत आणि नवीन या पुस्तकामध्ये सामाजिक चळवळीविषयी आपले विचार व्यक्त केले आहे. या पुस्तकामध्ये त्यांनी सामाजिक चळवळीचे दृष्टिकोन तसेच वेगवेगळया प्रकारच्या चळवळींचा आढावा घेतला आहे. समाज सुधारकाच्या कार्याविषयी अल्प प्रमाणात शोध घेतला आहे.

डॉ. बी. एम. कराडे लिखित समाजिक चळवळीचे समाजशास्त्र या ग्रंथामध्ये विविध प्रकारच्या चळवळीविषयी भाष्य केल्याचे दिसून येते. सामाजिक सुधारकांचा योगदानाविषयी आपणाला काही प्रमाणामध्ये माहिती दिसून येते.

प्रा. प्रफुल अशोक टाले यांनी महाराष्ट्रातील समाज सुधारक या ग्रंथामध्ये महाराष्ट्रातील समाज सुधारकांचा परिचय तसेच त्यांनी केलेल्या कार्यांचा अल्प प्रमाणात विश्लेषण केले आहे.

सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळ या पुस्तकामध्ये डॉ. सुधा काळदाते, डॉ. नारायण चौधरी, प्रा. अविनाश डोळस, डॉ. शरणकुमार लिंबाळे, प्रा. अरूणा पेंडसे इत्यादि लेखकांनी यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाद्वारे प्रकाशित झालेल्या पुस्तकामध्ये मुक्त व्यक्तिगत विचार मांडले असून या प्रकरणामध्ये सुधारकाच्या चळवळी व योगदानाविषयी सखोल असे विश्लेषण दिसून येते. परतू काही महत्वपूर्ण पैलू आणखी अध्ययनाच्या दृष्टिकोनात आवश्यक आहेत. प्रस्तुत शोधनिबंधामध्ये महत्वपूर्ण पैलूचा समावेश करून समाज सुधारकांच्या चळवळी व योगदानाचा नवीन पिढीला परिचय करून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**सामाजिक चळवळीचे प्रकार :**

काही समाजशास्त्रज्ञाच्या मते सामाजिक चळवळीमध्ये इतर चळवळीही समाविष्ट असतात. इतर चळवळीचे स्वप्न वेगळे असतात. त्यांचा दृष्टिकोन हा असतो की, राजकीय बदल घडवून आणणे, मागासवर्गीय चळवळीचे उदि्दष्ट हे असते की, त्यांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक दर्जा उचावणे. 'रूडाल्फ' या प्रसिध्द विचारवंताने असे म्हटले आहे की, 'प्रत्येक चळवळ ही राजकीय आहे. कारण प्रत्येक चळवळीतील सभासद हा राजकीय सत्ता मिळविण्याकडे प्रयत्न करीत असतो. वास्तविकपणे आपल्याला असे स्पष्टपणे म्हणता येते की, 'सामाजिक चळवळीचा राज्यसत्ता प्राप्त करणे असा उद्देश नसतो, परंतू समाजातील एका घटकाना सर्व मिळते व दुसऱ्या घटकांना विकासाच्या गोष्टी प्राप्त करण्याकरिता सतत संघर्ष करावा लागतो. अशा विषमतावादी विचारांमुळे चळवळींचा उदय होत असतो. हर्बर्ट ब्लूमरने चळवळीचे दोन प्रकार सांगितले आहे. 1) सुधारणावादी 2) क्रांतीकारी. ब्लूमरने ह्या व्यतिरिक्त इतरही काही प्रकार सांगितले आहेत. अ) अविष्कृत चळवळ ब) धर्मपंथीय चळवळ क) फॅशन चळवळ ड) मूलभूत चळवळ इ) पुनरूज्जीवन चळवळ फ) देशीवादी चळवळ.

**सामाजिक चळवळीच्या संदर्भात समाजशास्त्रीय सिध्दांत :**

समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून सामाजिक चळवळीच्या संदर्भात भाष्य करताना विचारवंताच्या अध्ययनावरून हे दिसून येते की, समाजातील सर्व लोकांना विकासाकरिता समान संधी मिळत असतील तर आंदोलने होत नाही. संघटनाचा उद्देश हाच असतो की, जर त्या समूहाला विकासाच्या गोष्टीपासून वंचित ठेवत असेल किंवा इतर कुणीही त्या समूहाला विकासाच्या गोष्टीपासून दूर लोटत असेल तर अशा वेळेला तो समूह आपल्या संघटनाच्या द्वारे आंदोलन निर्माण करून इतर लोकांचे लक्ष वेधून घेतो. शासनालाही त्या आंदोलनाचा विचार करावा लागतो.

**सैध्दांतिक परिप्रेक्ष्य, सापेक्ष वंचितता :**

समाजव्यवस्थेमध्ये जेव्हा विशिष्ट स्तरातील लोकांना इतर लोकांच्या तुलनेमध्ये तफावत किंवा भेद दिसून येतो तेव्हा सापेक्ष वंचितता निर्माण होऊन त्यातून चळवळी उदयास येतात. स्त्रियांच्या चळवळी, दलित चळवळी, विद्यार्थ्यांच्या चळवळी, अल्पघटकाचे आंदोलन, ग्रामीण आदिवासी क्षेत्रातील चळवळी, कधीकधी हे आंदोलन एकदम क्रांतीकारी आंदोलनाचे रूप धारण करीत असते. इंग्रजांशी संघर्ष करताना काही चळवळींनी एकदम क्रांतीकारी रूप धारण केले असल्याचे आढळते. एखाद्या समूहास किंवा गटास अपेक्षित साधने मिळत नसल्यामुळे त्यांना त्यांची उदि्दष्ट साध्य करता येत नाही. मुख्यतः समाज सुधारणेच्या चळवळी ह्या वरील प्रकारच्या अर्थात सापेक्ष वंचितता ह्या समाजशास्त्रीय सिध्दांताशी संबधित आहेत.

**सामाजिक चळवळींचा अर्थ व परिभाषा :**

सामाजिक परिवर्तन घडवून आणण्याकरिता सामुहिक दृष्टिकोनातून प्रयत्न करणे हे तितकेच महत्वाचे असते. सामाजिक चळवळी ह्या समाजामध्ये नवीन परिवर्तन घडवून आणतात. समाजशास्त्रामध्ये सामाजिक चळवळींचा अभ्यास करताना बऱ्याच गोष्टी विचारात घ्याव्या लागतात. जातीव्यवस्था, वर्ग, रूढी, नियम, कुटुंब व्यवस्था इत्यादींच्या संदर्भात चळवळींचा आपणाला अभ्यास करणे महत्वाचे ठरते. समाजातील समाज घटकांच्या सामुहिक प्रश्नांना लक्षात घेऊन सामाजिक चळवळ जन्म घेत असते. समाजातील लोकांच्या गरजा लक्षात घेऊन

सामुहिक दृष्टिकोनातून गरजांची उकल करण्याचा प्रयत्न केला जातो. संप, मोर्चे, घोषणा, मिरवणूका अशा
प्रकारच्या विविध स्वरूपाच्या कृती आकाराला येत असतात.

समाजशास्त्रातील काही विचारवंतांना सामाजिक चळवळीविषयी काही शास्त्रीय विचार व्यक्त केले आहेत
त्या विचाराचा खालीलप्रमाणे उल्लेख करण्यात आला आहे.

हर्बर्ट ब्लूमरच्या मते "रूढ सामाजिक संबंधामधील एखाद्या क्षेत्रात परिवर्तन घडवून आणण्यासाठी करण्यात
येणारे संक्षिप्त प्रयत्न म्हणजेच "सामाजिक चळवळ" होय.

टर्नर आणि एल. किलीनच्या मते "समाजात किंवा समाजाच्या घटक असलेल्या एखाद्या समूहाच्या
बाबतीत बदल करण्यासाठी किंवा बदलाचा विरोध करण्यासाठी सातत्याने करण्यात आलेले सामूहिक प्रयत्न
म्हणजे सामाजिक चळवळ होय."

एम. ए. ए. राव "आधीच निश्चित केलेल्या अथवा नंतर उदित झालेल्या एखाद्या आदर्शवादावर आधारून
सामुहिक संघर्षाद्वारे जे अविरत प्रयत्न होत असतात त्याना चळवळ हे नाव देणे योग्य होईल."

भारतामध्ये विशेषत: जातीवादाच्या संघर्षातून अनेक गोष्टी घडल्यात. जाती–जातीमध्ये संघर्ष झाला
धर्मा–धर्मामध्ये संघर्ष दिसून आला. इथे माणून जाती आणि जातीवादाच्या पिजऱ्यात अडकलेला दिसतो सर्वच
माणसे या विषमतावादी व्यवस्थेमध्ये अडकलेले आहेत असे नाही. परंतू काही माणसे निश्चितच जातिभेदाच्या
पिजऱ्यात अडकलेले होते. म्हणून काही समाज सुधारकानी ज्या–ज्या समाज घटकावरती अन्याय, अत्याचार होत
होता. त्या त्या समाज सुधारकांनी आपल्या प्रयत्नाच्या द्वारे सामुहिक दृष्टिकोनातून सर्वांच्या हिताकरिता चळवळी
उभ्या केल्यात. शिवाजी महाराजांच्या कार्यकाळामध्ये बहुजन समाजाला चळवळी उभ्या कराव्या लागल्या नाहीत.
कारण छत्रपती शिवाजी महाराज हे लोक कल्याणकारी राजे होते. त्यानी सर्व जाती धर्माच्या लोकांचा मानसन्मान
केला. कुणालाही जाती आणि धर्माच्या नावावर अपमानित केले नाहीत. त्याच्या मंत्रीमंडळात सर्व जाती धर्मांचे
लोक होते. महात्मा ज्योतिबा फुले म्हणायचे बहुजनांनो जेव्हापर्यंत इंग्रज येथे आहेत तेव्हापर्यंत लवकरात लवकर
स्वतंत्र व्हा. इंग्रज गेल्यानंतर शेठजी आणि भटजी हे बहुजन समाजाला मुक्त करणार नाहीत. या देशामध्ये
बहुजन समाजाला परिवर्तनाच्या दिशेने वाटचाल करायला प्रवृत्त करण्यासाठी समाज सुधारकांना खूप त्रागा, कष्ट
सहन करावे लागलेत. अनेक प्रकारचे वाईट अनुभव समाज सुधारकाना आलेत. समाजाला योग्य दिशा
दाखविणाऱ्या लोकांनाही येथे शांतपणे जगू दिल्या जात नाही. तरीपण समाज सुधारकांनी आपल्या प्राणाची पर्वा न
बाळगता समाजाच्या कल्याणकारी कार्याची मुहूर्तमेढ रोवत राहिले. भारतातील वेगवेगळया राज्यामध्ये काही समाज
सुधारक झाले, त्यांनी दिवसरात्र मेहनत केली. त्यांच्या विचाराचा प्रभाव आजही भारतीय जनमानसांवरती आहे
फरक एवढाच आहे की, काही लोक महापुरूषांचे विचाराला अभिवादन करून आचरणामध्ये आणतात तर काही
लोक समाज सुधारकांच्या विचाराला पाहिजे त्या प्रमाणात महत्व देतांना दिसत नाही. याचे एकमेव कारण म्हणजे
जे लोक अखंडपणे समाजाच्या प्रथा परंपरेमध्ये अडकून पडले आहेत. त्यांच्याकडून आपण परिवर्तनाची अपेक्षा
करणे म्हणजे अतिशयोक्ती होणार. कारण त्यांच्या मेंदूमध्ये इतकी ताकद नाही की योग्य काय आहे, अयोग्य काय
आहे. अंध. धार्मिकपणा त्यांच्या विचारामध्ये असल्यामुळे ते लोक विकासाच्या मार्गापासून खूप दूर जात आहेत
त्याना विकासाकरिता समाजा सुधारकांच्या विचाराशिवाय दूसरा पर्याय नाही.

**आधुनिक काळातील समाज सुधारकांचे योगदान :**

समाज सुधरकांनी तार्किकतेच्या आधारावर समाजातील रूढी, प्रथा, परंपरा, चालीरितीना पारखून ह्या
अनिष्ट चालिरितीना कायमचे पायबंद करून समाजामध्ये सामाजिक स्वास्थ हे हितकारक असणे अति आवश्यक
आहे, त्याकरिता समाज सुधारकांनी कल्याणकारी गोष्टीचा उपयोग करून समाजामध्ये सुधारणा घडवून
आणण्याचा प्रयत्न केला. सामाजिक सुधारणा म्हणजे समाजाची सर्वांगीण सुधारण अशा प्रकारचा दृष्टिकोन
सामाजिक विचारवंताचा असतो. समाज सुधारकाच्या कार्याचा जेव्हा आपण आढावा घेतो तेव्हा आपणाला असे
दिसून येते की, समाज सुधारक लोक हे समाजातील लोकांचा सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय आणि
सांस्कृतीक दृष्टिकोनातून बदल व्हायला पाहिजे अशा प्रकारचा आशय लक्षात घेऊन सतत आपले कार्य
समाजाच्या विकासाच्या दिशेने कार्य करीत असतात. समाज सुधारकाच्या कार्याचा मध्यबिंदू हा मानवच आहे
त्याच्या आंदोलनाचा मुख्य उद्देश हाच आहे की, समाजातील अनिष्ट रूढी, प्रथाम, परंपरा, हुंडाबळी, प्राण्याचा
बळी, मानवाचा बळी इत्यादिविषयी आजही समाजामध्ये धार्मिकतेचे, अंधश्रध्देचे समाजमन संपलेले नाही म्हणून
आपल्याला समाज सुधारकांच्या कार्याचा मानसन्मान करून त्यांचे विचार नवीन पिढीकडे हस्तातरीत करणे
अतिशय महत्याचे आहे.

भारतीय समाजामध्ये आज जे काही सकारात्मक परिवर्तन दिसून येते, त्या परिवर्तनामागे समाज
सुधारकानी केलेल्या प्रयत्न आणि संघर्षाचा गुणाकार आहे. आपल्या या देशामध्ये विविध राज्यामध्ये काही

परिवर्तनवादी समाज सुधारक होऊन गेलेत. परिवर्तनवादी संत आणि साहित्यांचीही भूमिका तितकीच महत्वाची ठरते. यावरोवरच भारतात इंग्रज आल्यामुळे अर्थात ब्रिटिश राजवटीपासून (1818) चातुर्वण्य वरथेला धक्क बसायला सुरुवात झाली. नव्या इहवादी शिक्षणाचा प्रसार होऊ लागल्यामुळे प्राचीन धर्मकल्पनांच्या [illegible] दृष्टिकोनातून विचार व्हायला लागला. मानवी मुल्ये जन्माला यायला लागली. बंधुता, स्वातंत्र्य, मानवी हक्कांची जाणीव इत्यादी गोष्टींचा विचार व्हायला लागला. इंग्रजांनी जे परिवर्तनवादी धोरण आखले होते त्या धोरणाचा परिणाम बहूजन समाजावरती हा सकारात्मक झाला. सुधारणा, कायदे इत्यादीमुळे समाजामध्ये बदल होऊन 1818 मध्ये पेशवाईचा अंत झाला. मध्ययुगीन संस्कृतीचा अंत होऊन ब्रिटिश राजवटीपासून (1818) भारतामध्ये एका आधुनिक युगास प्रारंभ झाला. इंग्रजाच्या धोरणामुळे आधुनिक सुक्षितांना एक नवी दृष्टी प्राप्त झाली. एक नवी वैचारिकता प्राप्त झाली. या वैचारिकतेमधूनच ब्राम्हो समाज, मानवधर्म सभा, आर्य समाज, प्रार्थना समाज, रामकृष्ण मिशन यासारखे हिंदू धर्मामध्ये सुधारणा घडविणारे समाज स्थापन झालेत. 1828 मध्ये राजा राममोहन रॉय यांनी बंगालमध्ये ब्राम्हो समाज स्थापन केला. "Fatherhood of God, Brotherhood of Men" हे या समाजाचे ब्रीदवाक्य होते. या समाजाने स्त्री–पुरूष समानतेकडे लक्ष दिले. राजा राममोहन रॉय यांनी सतीप्रथेला विरोध करून सतीप्रथा मोडीस काढली. परंतू या समाजाने समाजामध्ये असलेले जातिभेदाच्या गोष्टीकडे लक्ष दिले नाही. 1875 मध्ये स्वामी दयानंद यांनी अस्पृश्यांबरोबर सहभोजन करण्यास सकारात्मकता दर्शविली होती. तसेच त्यांनी अस्पृश्यांना वेद–मंत्राचे अधिकार देण्याची तयारी दर्शविली होती. ब्राम्हो समाजामधून पुढे प्रार्थना समाज अस्तित्वात आला. न्यायमूर्ती म. गो. रानडे, डॉ. रा. गो. भांडारकर प्रभृतींनी मुंबईमध्ये या समाजाची 1867 मध्ये शाखा काढली. दादोबा पांडूरंग यांनी मानवधर्म सभा नावाची एक संस्था 1867 च्या पूर्वी स्थापन केली होती. हे सर्व लोक समाजातील अस्पृश्योध्दाराच्या कार्यामध्ये प्रत्यक्षपणे सहभागी झाले नाहीत. परंतु त्यांच्या उदारमतवादी दृष्टिकोनामुळे वैचारिक पातळीवरून अस्पृश्यांच्या प्रश्नाला स्पर्श करण्याचा प्रयत्न केला. लोकहितवादी (गोपाळराव हरी देशमुख), न्या. रानडे, भांडारकर, गोपाळ आगरकर, दादोबा पांडुरंग आदि व्यक्तींनी समाजामध्ये सुधारणावादी कार्य करण्यास पुढाकार घेतला. गोपाळराव आगरकरांचे विचार हेत अतिशय प्रगल्भ व पुरोगामी होते. त्यांनी आपल्या 'सुधारक' या वृत्तापत्रातून लिहिले की, आपण पक्षपातीपणा नाकारला पाहिजे. शाळेमध्ये आपल्या शेजारी महार जातीच्या लोकांना बसण्यास मोकळीक दिली पाहिजे. ब्राम्हणांची आणि महारांची पगत एक झाली पाहिजे. महारांची स्थिती सुधारली पाहिजे अशा विचारांचा त्यांनी नेहमी आग्रह धरला ओह. तरीपण आपल्याला असे आढळते की, अस्पृश्य वर्गाच्या सुधारणेसाठी या लोकांनी केलेले कार्य हे अपूरे ठरले. या सुक्षिताचा सुधारणावाद हा तात्वीक दृष्टिकोनातून कितीही व्यापक असला तरी प्रत्यक्षपणे स्त्री शिक्षण, पुनर्विवाह, प्रौढविवाह यासारख्या मध्यमवर्गीय सुधारणापूरताच मर्यादित होता. तो सर्वकष नव्हता. त्याच्या कक्षा हया सर्व समाजाच्या परिवर्तनाकरिता पाहचू शकल्या नाहीत. परतू काही विभूती, काही व्यक्तित्व, काही विचार असे झालेत की, त्यांचा विचार, त्यांच्या विचारामध्ये असलेली ताकद हा सर्व समाजाच्या उन्नतीकरिता महत्वपूर्ण ठरली. त्यांच्या विचारामध्ये सर्व भारतीय समाजाचे कल्याणकारी योजनांचे, कल्याणकारी विचाराचे बीज पेरली आहेत. महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, डॉ. बी. आर. आंबेडकर, पेरियार, रामास्वामी, कायकर, नारायण गुरु, राजर्षी शाहू महाराज, कर्मवीर भाऊराव पाटील, भाऊसाहेब देशमुख, पंडीता रमाबाई, गोपालबूवा वलंगकर, सयाजीराव गायकवाड, संत गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, नरेंद्र दाभोळकर इत्यादींच्या कार्यामुळे समाजामध्ये आपणाला भारतामध्ये सुधारात्मक कार्य दिसून आल्यामुळे भारतीय समाजामध्ये आज बहुजन समाजाची शैक्षणिक, सामाजिक, आर्थिक प्रगती होताना दिसते आहे. या प्रगतीमध्ये सुधारकांच्या तत्वज्ञानाचे आणि कार्याचे योगदान तितकेच महत्वाचे ठरले आहे. समाज सुधारकांनी केलेल्या कार्याची समाजाने आणि शासनाने सुध्दा दखल घेतल्यामुळे आपणाला भारतीय समाज व्यवस्थेमध्ये गुणात्मक परिवर्तन दिसून येते.

भारतीय समाज सुधारकांच्या योगदानाचा शोध घेतला असता असे स्पष्टपणे लक्षात येते की, सर्वच राज्यात आपणाला समाज सुधारक व संत आणि त्यांच्या साहित्याचा प्रभावामुळे समाजामध्ये आपणाला परिवर्तन झालेले दिसून येते. महावीर जैन, तथागत गौतम बुध्द, येशू खिस्त, मोहम्मद पैगंबर, गुरू गोविंदसिंग, संत रविदास, संत कबीर, संत तुकाराम, संत नामदेव, चक्रधर स्वामी, संत एकनाथ, संत जनाबाई इत्यादी लोकांनी समाजामध्ये परिवर्तनाचे कार्य केलेत.

**महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या चळवळीचे योगदान :**

भारतातील इतर राज्यापेक्षा महाराष्ट्रातील समाज सुधारक समाज परिवर्तनाच्या प्रक्रियेमध्ये अग्रसर दिसून येतात. याचे एकमेव कारण म्हणजे त्यांनी जात, धर्माच्या पलीकडे जाऊन परिवर्तनाची बिजे पेरलीत. त्यामुळे महाराष्ट्र हे वैचारिक विकासाच्या दृष्टिकोनातून इतर राज्याच्या तुलनेमध्ये प्रथम क्रमाकावर दिसून येते. इथे काही संतापजनक घटना घडतात त्या विषमतावादी विचाराच्या कुटील कारस्थानामुळे महाराष्ट्रामध्ये काही समाज

सुधारकांचे कार्य इतके प्रभावी राहिले की, त्यांच्या कार्याचा प्रभाव महाराष्ट्रातच नाही तर भारतात व इत देशांमध्ये त्यांच्या विचाराला सलाम केला गेला. त्यामध्ये आपणाला शिवाजी महाराज, महात्मा फुले, राजर्षी शा महाराज, सयाजीराव गायकवाडा, डॉ. बी. आर. आंबेडकर, सावित्रीबाई फुले, अन्नाभाऊ साठे, कर्मवीर भाऊरा पाटीलं, किसन फागुजी बनसोडे, प्रबोधनकार के. सी. ठाकरे, शिवराम जानबा कांबळे, नारायण मेघाजी लोखं डॉ. भाऊ दाजी लाड, इत्यादीनी महाराष्ट्रामध्ये अतुलनीय समाज सुधारकांचे कार्य केले आहे. त्यामुळेच बहुज समाज आपली प्रगती करू शकला. पूर्णपणे बहुजन समाजाची प्रगती झाली असे नाही. परंतू त्यांच्या कार्यामु इथल्या जनमानसाला काहीतरी करण्याची उर्जा मिळाली. महात्मा ज्योतिबा फुले, डॉ. बी. आर. आंबेडक गाडगेबाबा, तुकडोजी महाराज, सावित्रीबाई फुले याचे कार्य तर समाजाच्या सर्वांगीण विकासाचा एक परिणा आहे. एक मॉडेल, एक प्रतिमान आहे, त्यांनी केलेल्या समाजसुधार कार्याचा इतिहास हा अजरामर आहे. तसेच त प्रत्येक नवीन पिढीकरिता प्रेरणादायी आहे. त्यामुळे हे सर्व समाज सुधारक राष्ट्रीव आंतरराष्ट्रीय स्तरावर पोहाचल महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या कार्याचा येथे सक्षिप्तपणे आढावा घेण्याचा संशोधनकर्त्याने प्रयत्न केला आहे.

इंग्रजी राजवटीमध्ये सुधारणा आणि शिक्षणाचा प्रसार झाल्यामुळे भारतीयांच्या मनात इंग्रजांविष आदराची भावना निर्माण होत होती. महात्मा ज्योतिबा फुल्यानी आपल्या विचाराच्या आधारे हे स्पष्ट केले क 'ब्राम्हण लोकांचा या देशाशी काहीही संबंध नाही. वेद हे मुळात भेद निर्माण करणारे आहेत. हा विचार त्यां प्रसारित करून वेदोक्त धर्मास त्यांनी विरोध केला.

1873 साली फुल्यांनी सत्यशोधक समाजाची स्थापना करून या सत्यशोधक चळवळीच्या द्वारे समाजाम परिवर्तन करण्याच्या दृष्टिकोनातून अनेक बाबतीमध्ये कृतीशील कार्यक्रम करण्यात आला. उच्च–नीच भे जातीभेद, अस्पृश्यता इत्यादी मानू नये, स्त्री–पुरूषमध्येही भेद मानू नये. धर्माच्या नावाखाली गुलामी जे लो लादत असतील त्या लोकांची मध्यस्ती नाकारली पाहिजे. ब्राम्हणाशिवाय आपण आपले संस्कार केले पाहिजे अशा विचारांचा प्रसार महात्मा ज्योतिबा फुले यानी केला. 1848 मध्ये पुणे येथे प्रथम मुलीची शाळा काढल विविध जातींच्या मुली येथे शाळा शिकायच्या. स्वतः सावित्रीबाई या शाळेच्या शिक्षिका होत्या. 1852 मध्ये फुल्यां अस्पृश्य मुलींसाठी ाळा केली. काही सनातनी ब्राम्हणानी या गोष्टीला विरोध केला. मात्र इंग्रज सरकारने दक्षि प्राईस फंडातून या उपक्रमाला अर्थसहाय्य केले.

स्त्री शिक्षणामध्ये महात्मा फुल्यांनी पुढाकार घेतल्यामुळे इंग्रज सरकारने 1852 मध्ये त्यांचा पुण्याती विश्राम बागवाडयात शालजोडी अर्पण करून सत्कार केला. 1863 मध्ये महात्मा फुले यांनी बालहत्या प्रतिबंध गृहाची स्थाना करण्यात आली. त्यांनी 1863 मध्ये विधवा पुनर्विवाह घडवून आणले पाहिजेत. या विचारसरणी पुरस्कार करण्यासाठी पहिला विधवा पुनर्विवाह घडवून आणला. 1868 मध्ये जोतिरावांनी आपल्या घराती पिण्याच्या पाण्याचा हौद अस्पृश्यांना खुला केला. त्यामुळे सनातन्यांनी जोतिबाकडे मारेकरी पाठविले. पण जोति डगमगले नाहीत. त्यांच्या निश्चयी व आत्मिक बळामुळे मारकेऱ्याना चालते व्हावे लागले. शुद्र वर्गाचा सामाजि आर्थिक, अधिकार प्राप्त झाले पाहिजे या हेतूने सत्यशोधक समाजाचे कार्य फार प्रभावी व गतीशील राहि त्यामुळे महात्मा फुल्यांना आधुनिक काळातील सामाजिक क्रांतीचा अग्रदूत म्हटले जाते. सावित्रीबाई मुलींच शाळेमध्ये जेव्हा शिकवायला जायच्या तेव्हा सभ्य समजली जाणारी माणसं शिव्या द्यायचे, अचकट, विचक बोलायचे. अंगावरती शेण फेकायचे. तरीही सावित्रीबाईनी आपल्या कार्याला विराम दिला नाही. त्यांनी आपल कार्याला एका वेगळया उंचीवर नेऊन ठेवले आहे. स्त्रियातील अंधश्रध्दा नष्ट करून त्यांना त्यांच्या हक्का जाणीव करून देण्याच्या दृष्टीने सावित्रीबाईनी महिला सेवा मंडळाची सुरूवात 1852 मध्ये केली. सावित्रीबाई स्त्री शिक्षणाद्वारे स्त्रियाचे शोषण करणाऱ्या रूढी. परंपराच्या विरोधामध्ये लोकमत जागृत केले, सतीप्रथा, केशवप विधवा विवाह, बंदी, इत्यादी स्त्री विरोधी रूढी परंपराच्या विरोधामध्ये त्यांनी आपली चळवळ उभी केली होत स्त्रियाचे जीवन हे गुलामगिरीचे जीवन आहे, त्यांना गुलामगिरीतून मुक्त करण्याकरिता तसेच त्यांना त्या अधिकार मिळवून देण्याकरिता त्यांनी आपला संघर्ष नेहमीच सुरु ठेवला. 'स्त्री ही माणूस असून पुरूषाप्रमाणे तिल अधिकार मिळायला पाहिजे', हा विचार समाजामध्ये पेरणारी ही प्रथम महिला होय. त्यांच्या कार्यामुळे आ महिलांनी शैक्षणिक कार्यामध्ये आपला विकास केला असल्याचे दिसून येते.

महाराष्ट्राच्या शैक्षणिक क्षेत्रात अभूतपूर्व क्रांती कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घडवून आणली. त्यांच्या विचारांवरती राजर्षी शाहू महाराजांचा प्रभाव असल्याचे आढळते. 1910 मध्ये कर्मवीर भाऊराव पाटलांनी सांगल जिल्ह्यातील दुधगाव येथे शिक्षण प्रसारक संस्थेची स्थापना केली व ते महात्मा फुल्यांच्या सत्यशोधक समाजा पायिक होते. त्यांनी 1912 मध्ये कराड तालुक्यातील काले या गावी 'रयत शिक्षण संस्थेची' स्थापना केली. तसे सातारा येथे छत्रपती शाहू बोर्डिंग काढले. शिक्षकांचे प्रशिक्षण केंद्र, प्राथमिक, माध्यमिक शाळा व महाविद्याल त्यांनी सुरु करून समाजामध्ये सुधारात्मक, कल्याणकारी दृष्टिकोन रुजविण्याचा प्रयत्न केला.

त्यांनी डॉ. आंबेडकरांना बरेच सहकार्य केले. जोतिबा फुले, राजर्षी शाहू महाराज, डॉ. आंबेडकर हे तीन महा रत्न आपल्या कार्याच्या द्वारे भारतात आणि इतर देशातही ओळखले जातात. भारतातील समाज सुधारकांच्या कार्यालया परत एकदा सलाम! आणखी काही समाज सुधारकांचा आपणाला उल्लेख करता येईल त्यांच्या कार्यामुळे समाज मनाला कल्पनाचे जीवन जगता आहे.

**मुल्यांकन :**

महाराष्ट्रातील समाज सुधारकांच्या योगदानाचा वरील संशोधन निबंधामध्ये विचार व्यक्त करण्यात आले आहे. वर्तमान परिस्थितीमध्ये भारतामध्ये जे काही परिवर्तन घडून येत आहे, त्यामागे निश्चितच त्यांच्या कार्यांचे फलित आहे. महाराष्ट्रामध्ये इतर राज्याच्या तुलनेत सर्वाधिक समाज सुधारक झाल्याने आज महाराष्ट्र हे इतर राज्याच्या तुलनेत वैचारिक दृष्टिकोनातून अधिक प्रगल्भ आढळते. समाज सुधारकांचा त्याग, त्यांनी सहन केलेले हालअपेष्टा, मानअपमान यामुळे समाजातील लोकांना मान–सन्मानाचे जीवन मिळाले. अस्मिता व स्वाभिमान प्राप्त झाला, हे सर्व समाज सुधारकांच्या योगदानाचे फलित होय.

**संदर्भग्रंथ सूची :**


1) प्रा. टाले प्रफू अशोक (2018). 'महाराष्ट्रातील समाज सुधारक', साई ज्योती पब्लिकेशन, कसारपूरा, नागपूर
2) डॉ. आगलावे प्रदिप (2017). 'मुलभूत समाजशास्त्रीय विचार, पाश्चात्य आणि भारतीय', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर
3) डॉ. कऱ्हाडे बी. एम. (2011). 'सामाजिक चळवळीचे समाजशास्त्र', पिंपळापूरे प्रकाशन, नागपूर.
4) डॉ. देवगावकर एस. जी. (2009). 'सामाजिक चळवळी परंपरागत आणि नवीन', श्री साईनाथ प्रकाशन, नागपूर.
5) डॉ. काळदाते सुधा, प्रा. अविनाश डोळस, डॉ. शरणकुमार लिंबाळे, (2002). 'सामाजिक परिवर्तन आणि सामाजिक चळवळी' य.च.म.मु.विद्यापीठ, नाशिक.




Scanned with OKEN Scanner